मनहर ज्ञान



श्री सद्गुरु बोधामृत

सुलभ मराठी भावार्थासह

मनहर ज्ञान



श्री सद्गुरु बोधामृत

सुलभ मराठी भावार्थासह

realpatidar.com

ॐ

- मनहर ज्ञान -

[श्री सदगुरु बोधामृत]

—० प्रकाशक —

गुरुवर्य श्री पुरुषोत्तम गुरु धर्मा बुवा महाराज
श्री सतपंथी मंदिर, फैजपूर

द्वितीयावृत्ति) (सन १९७५

किं. ४ रु.

प्रकाशक–

गुरुवर्य श्री पुरुषोत्तम गुरु धर्मा महाराज
श्री सतपंथी मंदिर, फैजपूर

मुद्रक-
श्री. यशवंत मिठाराम नारखेडे
यशवंत प्रि. प्रेस, भुसावळ

श्रीमत्सद्गुरवे नमः

प्रस्तावना

सहस्त्र पचास भोगवीने । आवे मनखा देह ॥
दया क्षमा धर्म जाण्या नही । जेम उन्हाले वरसे मेह ॥
मनुष्य देही पाम्या शुं थयुं । न जाण्या मुक्तीनो भेद ॥
मा ण क मो ठु मो ल नुं । पड्या है अंतर छेद ॥

नरदेह हे धर्म संपादन करुन जन्माचें सार्थक्य करण्याचें मुख्य साधन आहे. नृदेहमाद्यं खलु धर्मसाधनम् । जगतात स्थावर जंगमादि सर्व जलचर पशु पक्षी तिर्यक् आदि ज्यास शरीर आहे अशा सर्व प्राण्यांचे जे जे देह आहेत त्या सर्वांत नरदेह-मनुष्य-शरीर-मानवजन्म अत्यंत उत्तम आहे. हा मानव जन्म ईश्वरी अनुग्रहावाचून लाभू शकत नाही. प्राण्यावर जेव्हा परमात्म्याची कृपा होते तेंव्हा त्यास हा नरदेह प्राप्त होतो. सर्व देहधारी प्राण्यांत आहार, निद्रा, भय व मैथुन हे प्राणिज धर्म स्वाभाविक असतात. ह्याशिवाय पाचवी जी सद्सद्विवेक बुद्धि-शक्ति मनुष्यात विशेष असते. त्यामुळें तो विशेष होय. या शक्तीचा उपयोग विचारपूर्वक केला तर तो स्वतःच स्वतःचा गुरु बनून स्वतःत काय आहे, त्याचा शोध करतो. या प्रमाणें शोध करता

करता तो स्वस्वरुप पाहतो व त्यांतून परब्रम्ह स्वरुपाचें दर्शन करुन कृतार्थ होऊन चौऱ्यायशी लक्ष जीवयोनीच्या रहाटगाड-ग्यातून मुक्त होऊन जातों तो जीवन्मुक्त होतो व देहाचा विलय झाल्यावर अखंडानंद स्वरुपात लीन होतो हे सर्व मनुष्य देहाच्या योगानेंच प्राप्त होते. यास्तव मनुष्य देह सर्वात उत्तम होय तसेच अजर व अमर असा आत्मा मनुष्य देहाचा संग करुन अनेक सत्कर्मे करुं शकतो, संत्संगति करुं शकतो, सद्विद्या संपादन करुं शकतो व भगवत्भक्तिकरुन परब्रम्ह परमात्म्याचें चरण कमळाचे दर्शनसुद्धा ह्याच नरदेहाच्या संगानें प्राप्त करुं शकतो.

अशा प्रकारच्या अत्युत्तम देहरुप मित्राचा दुर्लभ संग प्राप्त झाला असून जे मानव त्यास फुकट घालवून टाकतात अर्थात त्याचें महत्व समजत नाहीत व उत्तम कृत्यें करुन न घेतां आयुष्य केवळ हसण्या–खेळण्यात, दुसऱ्यांची निंदा द्वेष हेवे दावे करण्यात, विलासात, विषय सेंवनात व अशाच दुसऱ्या अनुचित कार्यात घालवितात त्याजवर निःसंशयच परमात्म्याचा कोप होतो. मोह मायेतून सुटून जाण्यासाठी अर्थात् ह्या संसारसागरातून तरुन जाण्याची साधनें साधून घेण्यासाठीच परमात्मा जीवास नरदेह देतो. तो फुकट घालविल्यास दयाळु प्रभु कां बरें कोपायमान होणार नाही? परमात्म्याच्या कोपामुळे आणि जीवात्म्याच्या कर्मगतिमुळें त्यास दुसऱ्या पशु पक्षी, कीट, पतंग, जलचर आदि निकृष्ट योनींचे देहात म्हणजे ज्यांत आत्मज्ञान प्राप्तीचे सुख नसते व ज्यामधून अनेक प्रकारच्या अधोगतीत जाऊन पडावे लागते अशानीच देहात जन्म घेतल्याने त्या त्या देहात वास करीत असलेल्या आत्म्यास तरण्याचे कांहीं साधन करता येत नाही. सद्गुरु इमामशहा महाराज सांगतात कीं,–

मानव जन्म मुक्तीनो द्वार । ते नही पावो तमे वारंवार ॥
जे क्षण जाये ते पल आवे नही । हरिस्मरण तमे साधो सही ॥

मनुष्य जन्म हे साक्षात् मुक्तीचें द्वार आहे. हे मुक्तिद्वार मनुष्याला वारंवार-वरचेवर मिळूं शकत नाही. हजारो जन्मांचे लाखो प्रारब्ध कर्मभोग भोगून नंतर मग एखादा नरजन्म लाभतो. असा अमोलिक मानवजन्म मिळून जर मनुष्य मुक्तिद्वाराप्रत जाऊं शकला नाही तर ज्या प्रमाणें माणिक रत्न हे अमोलिक मुल्यवान आहे खरे पण त्यास जर अंतरछेद असला तर त्या मुल्यवान पदार्थाचे अवमुल्यन होते, त्या प्रमाणें या नरजन्माची किमत पशुजन्माहूनहि हलक्या प्रतीची होईल या करितां प्राप्त परिस्थितीत मनुष्याने दया, क्षमा, त्याग आदि मूलभूत स्वरुपाच्या धर्मतत्वांचें-मूलभूत मानवी मुल्यांचे अनुसरण करावयास हवे आहे. तसे जर त्याने केले नाही तर उन्हाळ्यात वर्षणाऱ्या मेघ-जलाप्रमाणें त्याचा कांही एक उपयोग नाही. एकदा निघून गेलेला क्षण परत त्याच स्वरुपात कधींच येऊं शकत नाही. कालचक्र सतत बदलत असते. त्या बदलत्या काळाच्या गतीस जाणून मनुष्याने आपलें स्वहीत साधून घ्यावयास हवे. हे स्वहित म्हणजे माया, मोह, ममत्व, लोभाच्या बाबतीत नव्हे-कारण ते विनाशी आहे व मुक्तिमार्गांस बंधनकारक आहे-तर स्वस्वरुपानुसंधान, आत्मज्ञान, हरिनामस्मरण व शास्त्रोक्त शुद्ध निष्काम क्रियाचरण साधून घ्यावयास हवे आहे एका संताने म्हटलेलें आहे की,-

'आ नर काया सोनेंकी । बार बार नही आनकी ।
आयः जब क्या लाया है । अपने किस्मत पाया है ।
एक दिन जावे लाखोंका । अलक पलकमें क्या होता ।'

म्हणूनच सद्गुरु महाराज सांगतात–

'जो दम जावे स्वामीविना सो दम जाणो मुर्दार रे ॥'

साक्षात् मोक्षाचे द्वार नरदेहच असल्याने हा महादुस्तर भवरुपी सागर तरुन जाण्याची उत्तम नाव नरदेहच होय. नरदेह अति दुर्लभ आहे व सर्वांत स्वस्वरुपाचें ज्ञान ही दुर्लभ आहे. नरदेहाच्या संगतीने जीव साक्षात् परम पुरुषाच्या स्वरुपांत, आत्मज्ञानात लीन होऊन स्वस्वरुप असतां स्वरुपरहित होऊन जातो. परमात्मा सर्व शक्तिमान् सर्वान्तिर्यामि व सर्वेश्वर आहे. त्याची आपण सेवा करावी व परमप्रेमानें–भक्तीने सर्वव्यापी प्रभुचें स्वरुपानुसंधान प्राप्त करुन घ्यावे ते कसें साधावे व कोणत्या स्वरुपाच्या क्रियाचरणाने ते सिद्ध होईल याविषयींचें सर्वोत्तम सिद्धान्त सद्गुरु श्री इमामशाहा महाराजांनी 'मनहरज्ञान' या पुस्तिकाद्वारे अत्यंत मार्मिकतेने व संक्षेपानें मांडलेले आहेत. सद्गुरु महाराजांच्या केवळ ५४ पंचकडयांच्या (पांच पांच ओव्यांचा एक समुदाय व त्या खाली दोहा असे मिळून एक कडवे. म्हणून त्यास पंचकडी म्हटलेले आहे त्याच्या) ह्या अत्यंत अल्प परंतु महद् अर्थानें भरलेल्या ग्रंथावर प्रवचनात्मक टिका केल्यास तो एक महान् ग्रंथ होईल. परंतु त्याची मूळ संक्षिप्तता पण महत्वपूर्ण व्यापकता जाणून संक्षिप्तपणेच त्याचा केवळ भावार्थ करण्याचा यथामति प्रयत्न केलेला आहे यथा समयीं या ग्रंथावर प्रवचनात्मक विस्तृत स्वरुपाची टिका करण्याचा आमचा मानस आहे. अंतर्यामि कृपाळू सद्गुरु महाराज आमच्या या विचारास चालना देऊन ते कार्य लवकरच फलद्रूप करतील अशीं त्यांच्या परम पावन चरण कमलाप्रति विनम्र प्रार्थना.

प्रकाशक
श्री पुरुषोत्तम गुरु धर्मा महाराज
श्री सतपंथी मंदिर फैजपूर

श्रीमत्परमात्मने नमः

मनहर ज्ञान

ॐ नमो निकलंकी नारायण जनार्दनम्

श्री सद्गुरु ब्रह्माने करु प्रणाम । स्मरु अेक निरंतर नाम ॥१॥
पिहु स्मरो नीत ज्ञान मलीये । तो मनना सघला कुलक्षण गलीये ॥२॥
सद्गुरु वचन थर थई सुणीये । मनहरज्ञान प्रेमे भणीये ॥३॥
चंचलमन तो थीर थाये । रखेशरो करो स्मरण उपाये ॥४॥
कुमति कुभाव कुबुद्धि परहरीये । पीहु नाम कहेता निश्चे तरीये ॥५॥

पीहु पीहु जेणे भणीया । अने भणीया सद्गुरु नाम ॥
निरंजनसु नेह जेणे लगाया । मळीया अमर ठाम ॥१॥

भावार्थः– परम उज्वल ज्ञानरुप तेजो राशी; अज्ञानांधःकाररुप संसार सागरात निरंतर गोते खाणाऱ्या जीवात्म्यास दीपस्तंभरुप आधारभूत असलेल्या ब्रह्मस्वरुप श्री सद्गुरू महाराजांना प्रथम वंदन करु या नित्य निरंतर साक्षीरुप परममंगल व सुखदायक अशा निष्कलंकी नारायणाचे आपण स्मरण करु या. मनुष्य हा ज्ञानप्रीय आहे, ज्ञान मिळविण्याबरोबरच जर आपण परमेश्वराचे स्मरण केले व धर्मशास्त्रात सांगितल्या प्रमाणें तेजोमय अशा ज्योतीस्वरुपातून त्याचे ध्यान केले तर आपल्या मनाची सर्व कुलक्षणे गळून पडतील मनाचे सर्व विकार नाहीसे होतील. म्हणून ते ज्ञान मिळविण्याकरिता, आपण

सद्गुरु वचनामृत स्थिर चित्ताने श्रवण केले पाहिजे व या 'मनहरज्ञान' शास्त्राचे परमप्रीतीने श्रद्धायुक्त अंतःकरणानें वाचन नित्यपाठ रुपाने पठन व अध्ययन करावयास हवे. आपले मन अतिशय चंचल असते, ते क्षणांत सुविचार करते तर क्षणात कुविचारी बनते. ते फारच फार अस्थिर असल्यामुळें या मायासागरात निरंतर गोते खात असते हे मन शांत व स्थिर झाल्याशिवाय या जंजाळातून आपली सुटका होणार नाही, म्हणून जेंव्हा आपण परमपूज्य सद्गुरुचे व परमेश्वराचे सतत स्मरण करु– त्यांच्या नामाचा मनातल्या मनात एक सारखा ध्यास लावू तेंव्हा आपल्या मनातून कुमति, कुभाव, कुबुद्धि वगैरे समस्त दुर्गुण कुलक्षणे नाहीसे होतील. त्यांच्या नामस्मरणाने आपल्या मनाचा कायापालट होऊन ते सन्मार्गाचा शोध करु लागेल व त्यायोगे आपण निश्चयाने उद्धरले जाऊ. ज्याने पीहु पीहु असे म्हटले, म्हणजे सर्वांठायी निरंतर वास्तव्य करणाऱ्या परमेश्वराचे सतत स्मरण केले आणि सद्गुरुचें स्मरण चिंतन करुन त्यांनी उपदेशिलेल्या महावाक्याचे म्हणजे निरंजन नारायणाची पूर्णपणें ओळख करवून देणाऱ्या सद्गुरु बोधाचे-मनहर ज्ञानाचे प्रेमानें अध्ययन करून त्या प्रमाणें जे वागतील त्यांना वैकुंठ अमरापुर धामाची प्राप्ति होईल असे निश्चयानें समजा.

सघली वातथी वातज सार । मन सुध पामे सकल भवपार ॥१॥
कारण सगलु रे मनज तनु । मुनिवर अेथी शुं कहिये घणुं ॥२॥
काया क्लेश मत करशो जन । थीर करी राखो चंचलमन ॥३॥
ब्रह्मज्ञाने मन थीर थाये । मुनिवर बीजो कोई नथी उपाये ॥४॥
काया काशीने मन छे रे गंगा । गुरुने चरणे जो लागेंरे रंगा ॥५॥

रंग रंगावो दिलमा । काहे फरो वनवास ॥
घटमो तीरथ शोधिये । तो प्रभुजी तारे पास ॥ २ ॥

भावार्थ :– सर्व गोष्टींचे सार हेच आहे की, ज्याचे मन शुद्ध झाले तोच या संसार सागरातून पार उतरून जातो. सर्व गोष्टींचे मूळाशी कारण आपले मनच होय. याकरिता मुनिवरा ! तू आपल्या कायेस व्यर्थ न शिणवता–परमशांतीच्या प्राप्तीकरितां इकड तिकडे न भटकता आपले चंचल मनच फक्त स्थिर कर. हे मन अतिशय चंचल आहे पण त्याला ब्रह्मज्ञानरुप अंकुशाच्या योगाने स्थिर करता येते. ब्रह्मज्ञान म्हणजे आत्म तत्व जाणण्याचे ज्ञान होय. त्या ब्रह्मज्ञानाच्या लाभाशिवाय चंचल मन स्थिर करण्याचा दुसरा अचुक उपाय नाही. जर गुरुचरण कमळी आपले चित्त रंगले अथवा सद्गुरु वचनामृताच्या योगाने तन्मय एकतान झाले तर आपले हे शरीर काशिप्रयाग सारखे पवित्र तीर्थक्षेत्रच होईल आणि मन हे गंगानदी प्रमाणें निर्मळ होईल. मन जरी विकारी व चंचल असले तरी पण स्त्रोत हरीभजनाकडे अथवा ब्रह्मत्व प्राप्तीच्या मार्गाकडे वळविल्यास ते गंगा नदीहून पवित्र आणि निर्मल बनते. याकरिता माझ्या प्रिय सुहृद बंधुनो! तुम्ही परमेश्वर प्राप्तीकरिता घरादारांचा–संसाराचा त्याग न करता, व्यर्थ न भटकता आपल्या शुद्ध व पवित्र मनाच्या योगाने आपल्याच हृदयात असलेल्या श्रीरंगाशीं परमात्म्याशीं रंग म्हणजे ध्यास लावा–त्याचे ध्यान करा. ज्या परमेश्वराच्या प्राप्तीकरिता तुम्ही वनोपवनी आणि तीर्थोतीर्थी भटकत आहांत, तो परमेश्वर तर आपल्याच शरीर रुपी घटात–तीर्थात भरलेला आहे. त्याला आपल्यातच शोधा. त्याला शोधण्याकरिता अन्यत्र भटकण्याची काय बरे आवश्यकता? ते आत्मतत्व तर प्रत्येक जीव प्राणीमात्राच्या हृदयमंदिरात चैतन्यरुपाने व्याप्त आहे

घटमो तीरथ घटमो वन । निर्मल थाये अपनो मन ॥१॥
जहालगी मनसु फरता फरीये । तीरथ बनमो अरथ न सरीये ॥२॥

कारण सगलु मननु जाण । भाई अजाणी शुं बोले वाण ॥३॥
शोधो शास्त्रने वेद पुराण। पुछो पंडितने सद्‌गुरु शुं जाण ॥४॥
सद्‌गुरु शास्त्र जो राखो उथाप। मन थर थाये नहीं शोक संताप ॥५॥

मन थर करोरे मुनिवरो । अने थर वना दुःख अपार ॥
कारण सघलु मन तनु । सद्‌गुरु कहे फुकार ॥३॥

भावार्थ :- आपल्याच शरीररुपी घटात सर्व तीर्थांचा व वनोपवनांचा निरंतर वास आहे. परंतु जो पर्यंत आपले मन स्थिर नाही तो पर्यंत हा घट-हे शरीररुप तीर्थ तरी काय बरे करुं शकेल. त्याकरिता मन निर्मळ व पवित्र ठेवा. जो पर्यंत मन स्थिर नाही व मनुष्य मनाच्या गतीनुसार संकल्पविकल्पाच्या फेऱ्यात गोते खात बसेल-ते सांगेल तसा भटक्या मारील तो पर्यंत त्याचे सार्थक होऊं शकणार नाही.

मन लोभी मन लालची, मन चंचल मन चौर ॥
मन के मत चलीयें नही, पलक पलक मन और ॥

मन हे क्षणिक व परिवर्तनशील आहे. सर्व गोष्टींचे मूळ आपले मन होय. जो पर्यंत ते आपल्या स्वाधीन होत नाही तो पर्यंत ते आपला शत्रुच आहे. दृढ अभ्यासाने व वैराग्याच्या योगाने त्याम आपल्या स्वाधीन करण्याचा प्रयत्न करावा. या करिता, बंधूंनो! अज्ञानपणात राहू नका. वेदशास्त्र पुराणांत शोधून पहा. पंडितांना विचारा, सद्‌गुरुकडून समजावून घ्या, सद्‌गुरुच्या आणि शास्त्रांच्या आज्ञा जर तुम्ही पाळल्या नाहीत तर तुमचे मनहि स्थिर होऊ शकणार नाही व त्यामुळे मनुष्याचा शोक संताप अथवा जन्म-मरणरुप, भव संताप मिटू शकणार नाही. सद्‌गुरु महाराज

गर्जून सांगत आहेत कीं, हे मुनिश्रेष्ठ जिज्ञासु जन हो, तुम्ही आपलें मन स्थिर करा. जर तुम्ही मन स्थिर व शांत ठेवलें नाहीं तर तुम्हाला अपार दुःखें भोगावी लागतील. सर्वप्रकारच्या शुभ अशुभ गोष्टींचे मूळ आपलें मन आहे. याकरितां त्याला जिंका, त्याचे दमन करा. आपण आपल्या मनातून प्रथम कुड, कपट, माया, मोह आदि समस्त दुर्गुण काढून टाकून सर्वांभूति परमात्मा पाहण्याचे वळण आपण आपल्या मनास सदैव लावले पाहिजे.

फरी फरी कीजे येही जतन । जेणे निरमल थाये येही तन ॥१॥
साई स्मरो तजो अभिमान । सद्गुरु चरणे कीजे भक्तिज्ञान ॥२॥
सद्गुरु ज्ञाने सत्संग करीये । माया मोह मत्सर परहरीये ॥३॥
ज्ञान वचन ते हिरदामा धरीये । स्मरण हरीनु चित्तमा धरीये ॥४॥
ओ सतगतीये ब्रह्म गीनान । सगले किजियेरे दृष्टी समान ॥५॥

घट घट हरी व्यापी रह्या । तमे जोई लेजो जाण ॥
देह थकी न अळगो वसे । ॲम सद्गुरु कहे ज्ञान ॥४॥

भावार्थ :– जेणेकरुन आपलें मन निर्मळ होईल असा एकमेव उपाय म्हणजे हरिनामस्मरण होय. वर सांगितलेल्या गोष्टींचे वारंवार जतन केल्यानेच केवळ ते साध्य आहे, याकरितां हे सुहृदांनो! तुम्ही हरीचे स्मरण करा. परंतु तें सुध्दा कसे तर अभिमान सोडून, निरहंकार बुद्धीने. अशारितीने अहंकार रहित होऊन आणि सद्गुरुचरणीं लीन होऊन, त्यांचेकडून ज्ञान संपादन करुन भक्ति करा. मोक्षगतीचें ज्ञान मिळविण्याकरितां सत्संगती करा. सत्संगती करताना माया, मोह व मत्सर या आपल्या आत्मघातकी शत्रुंचा त्याग करा व जी ज्ञानप्राप्तिची वचने-तत्वे-

साधने असतील ती हृदयात धारण करा, सर्वनियंता, सर्व शास्ता अशा एकमेवाद्वितीय परमेश्वराचे चित्तात सतत स्मरण करुन ध्यान करून त्याला आपल्या चित्तात धारण करा. हीच खरी 'सत्' ची भक्ति होय. ह्या सत्भक्तिच्या योगाने आपल्या हृदयात ब्रह्मज्ञानाचा उगम होईल व आपल्या दृष्टीत समता येईल. सर्व घट घटात समस्त विश्वब्रह्मांडात तो परब्रम्ह परमात्मा अंश रुपाने व्यापिलेला आहे तुम्ही त्याची ओळख करून घ्या. प्रत्येक प्राणिमात्राच्या देहात व या ब्रम्हांडातील समस्त जड चेतन वस्तुमात्रात तो परमेश्वर सामावलेला आहे. त्याहून भिन्न नाही. सद्गुरु महाराज सांगतात कीं, मुनिवर हो! आपण त्यालाच जाणून त्याचीच भक्ति करुं या,

ओवे अनुभवे पीहु स्मरीये । सद्गुरु वचने कुबुद्धि परहरीये ॥१॥
जगदिश जगत जगमाही जगदिश । ओवी बुद्धि राखो तमे सालस ॥२॥
सघले पुरण साई प्रकाश । प्रगट ना होवेरे वन विश्वास ॥३॥
विना विश्वासे वसु अफळे । अकळ स्वरुपीने कोई न कळे ॥४॥
विषय विवादमा सर्वे मोही रहे । भाई अमर पिछाणे बिरला कोये॥५॥

सद्गुरु वचन दलमाहे धरो । तो कारज सर्वे होवे ॥
मन निर्मल पलभर करो । अमर पिछानो सोये ॥५॥

भावार्थ :- वर वर्णिलल्याप्रमाणें अनुभव घेऊन परमेश्वराचे स्मरण करा, सद्गुरु वचनानुसार आपल्या कुबुद्धीचा त्याग करा. परमेश्वर सर्व जगतात व सर्व जग परमेश्वरात सामावलेले आहे अशी सालसबुद्धी ठेऊन सर्वांशीं समबुद्धीने वागा. सर्व जग त्या पूर्ण ब्रम्ह परमात्म्याच्या प्रकाशाने प्रकाशित झालेले आहे. त्या

उज्वल प्रकाश झोत्ताने उजळलेल्या प्रत्येक वस्तुमात्रास आपण समदृष्टीने बघावयास हवे. परंतु ह्या सर्व गोष्टी त्या परमप्रेमधन परमेश्वरावर व त्याच्या अंशमात्रावर विश्वास असल्याशिवाय प्रगट होऊ शकणार नाही-आचरणात येऊ शकणार नाही. विश्वास जर नसेल तर ही आपली वसुधा-पृथ्वी सुद्धा फळे देऊं शकणार नाही. साध्या क्षुल्लक व्यवहारात सुद्धा विश्वास ठेवावा लागतो. तर त्या अकळ कळानिधी प्रभुवर आपण कां बरे विश्वास ठेऊं नये? तो परमेश्वर अनंत कळा स्वरुप आहे. परंतु त्याच्या या अनंत कलांनी पूर्ण अशा स्वरुपाकडे लक्ष न देतां अज्ञ जीव विषय विवादात मोहून जाऊन त्याच्या सत्यस्वरुपास विसरुन जातात. एखादाच परमभाग्यवान जीव त्या प्रेम दयाघन परमेश्वराचीं प्राप्ती करुं शकतो. या करितां माझ्या प्रीयबंधुंनो जर आपण परमेश्वर स्वरुप सद्‌गुरुचे वचन हृदयात धारण केले तर आपले सर्व कार्य सफल होईल. आपण आपले मनाची धून-लय-जर पळभरच त्या परमेश्वराशी लावली तर अमर, नित्य, निरंतर स्वरुप परब्रह्माची आपणास ओळख होऊ शकेल-त्याची प्राप्ती होईल.

अमर पिछानो तो मनने गाळो । कल्पित वस्तु ज्ञाने वारो ॥१॥
अेक सदोदित भासे ब्रह्म । आद अनादि जो जाणे मर्म ॥२॥
सर्वे सिद्धांतथी अे छे सार । बाहर भीतर जाणो ब्रह्मविचार ॥३॥
शुद्ध विचारथी हुं तुं टळीये । भाई अमर मन हरीमा मलीये ॥४॥
सद्‌गुरु ज्ञान वेदमा अेम कहिये । अे मन निरालंब अेकमन रहिये॥५॥

जो मन वश न रहे आपणु । तो केम करी ओळखीये ठाम ॥
मन स्थिर थाये नीज मने । ओळखीये पुरण धाम ॥६॥

भावार्थ :– जर अमर, अविनाशी परमात्म्यात्री म्हणजेच आत्म्याची ओळख करुन घ्यावयाची असेल तर प्रथम आपल्या मनाला विरघळवा–मन अमन करा, ज्या कल्पित वस्तु आहेत-जगात मृगजलाप्रमाणे भासमान होणारे विकार आहेत त्यांचे ज्ञानदृष्टीने निवारण करा. समदृष्टीच्या दृष्टीकोनातून जर तुम्ही जगाकडे बघाल तर सर्व वस्तुमात्रांचे ठायीं एक नित्य निरंतर अनाघनंत ब्रह्म भरलेले आहे याची तुम्हाला जाणिव होईल. जगातील समस्त सिद्धांताचा सार हाच आहे कीं प्रत्येक वस्तुच्या अंतर्बाह्य एकमेव ब्रह्मच सामावलेले आहे म्हणून प्रत्येक वस्तु ब्रह्मस्वरूपच आहे, ह्या असल्या प्रकारच्या ब्रह्मविचाराने–शुद्ध आत्मविचाराने आपल्या मनात वसलेले द्वैतभाव 'मी व तू' 'माझे व तुझे' आदि द्वेषमूलक द्वैतभावाचे उच्चाटन होते आणि हे अमर सुहृदांनो! द्वैतच जर आपल्या मनातून समूळ नाहीसे झाले तरच ते मन परमेश्वरात मिळण्यास-विलीन होण्यास कांहीहि उशीर लागणार नाही. अशा प्रकारे वेद प्रतिपादीत ज्ञानानुसार वागल्यास हे अस्थिर–चंचल मन कां बरे स्थिर होऊं शकणार नाही? खात्रीने स्थिर होईलच. जोपर्यंत आपलें मन आपल्या ताब्यात नाहीं, मन जोंवर आपल्या आधिन नाही तोवर आपणास त्या प्रेमधन परमात्म्याचे ठाव ठिकाण लागणार नाही आणि आपण जर आपल्या मनाच्या योगाने मनाचेच विश्लेषण केले म्हणजेच त्याला ओळखून आपल्या आधीन केले तर आपलें निजधाम आपण ओळखण्यास पात्र होऊ–आपणास नित्य मुक्त पूर्ण धामाची प्राप्ती होईल.

माया ब्रह्म ते अेकज जोये । वर्तमाने ओळखाये सोये ॥१॥
माया संगे मन कल्पित फरीये । ब्रम्हज्ञाने संकल्प परहरीये ॥२॥

आप विचारी तमे जोजो जन । ओळखो तमे येणे चिन्ह ॥३॥
मनना अधरम ओळखीने तजीये । नर नारायण निरंतर भजीये ॥४॥
जहां नर त्या नारायण जाण । मन शुद्ध थाये तो होय ओळखाण ॥५॥

मन शुद्ध करो रे मुनिवरो । मत करो पराई वात ॥
मननो लक्षण येह छे । जे करे अरी अरी परी वात ॥७॥

भावार्थ :- शुद्ध विचाराने पाहू गेल्यास माया आणि ब्रह्म हे एकच आहे. बींब आणि प्रतिबींब ह्यांच्या वर्तमानाने त्या अभेद स्वरुप ब्रम्ह-मायेची ओळख होऊं शकते. फरक एवढाच की मायेच्या संगतीने मन विषय विकारांच्या कल्पनेत भटक्या मारीत असते तर ब्रम्हाच्या संगतीने मनाचे संकल्प-विकल्पच पार नाहीसे होतात. हे मनुष्या! वर कथन केलेल्या विचारांचे तू स्वतःशीच चिंतन कर व मनाचा गुणधर्म जाणून घे. मनाचा गुणधर्म आहे कीं ते ज्या गोष्टीकडे लावले जाते त्याच विषयाचे सतत स्मरण, चिंतन मनन करीत असते, हा मनाचा गुणधर्म समजून तुम्ही त्याला निरंतर सद्‌विचाराकडे वळवा. वाईट विचारापासून परावृत्त करा. अधर्माकडे अथवा असत्य विषयाकडे त्यास लावलें तर सतत ते अधर्माचेच चिंतन करील म्हणून अगोवरच त्यास जागृत करा. सद्‌विचाराकडे मन प्रवृत्त करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे नर आणि नारायण यांत अभेद दृष्टीने व तसे वागणे हा होय जेथे नर आहे-मनुष्य प्राणिमात्र आहे तेथे नारायणाचे परब्रम्ह परमात्याचें अस्तित्व आहे, जसे आपण परमात्म्याशीं नम्र भावाने वागतो तसेच नराशी म्हणजे मनुष्यप्राणिमात्रांशीं वागायला हवे आहे, वस्तुतः नर आणि नारायण हे एकच आहेत, असंख्य, अनंत आत्म्यांच्या अणुचैतन्याच्या समुदायासच परमात्मा म्हणतात. तोच नारायण होय

व त्याचाच चिदंश नर होय म्हणून प्रत्येक प्राणिमात्राशीं आपण एकरुपतेने वागलें पाहिजे. ही वर्तणुक जेव्हां आपलें मन शुद्ध होईल तेव्हाच आपल्या आचरणात येऊं शकेल व तेव्हांच केवळ परमात्म्याचीं ओळख होऊं शकेल. याकरिता हे मुनिश्रेष्ठांनो! तुम्हीं आपले मन प्रथम शुद्ध करा. दुसऱ्यांची निंदा, मत्सर, अवहेलना द्वेष करुं नका. तसे केल्यास मनाचें लक्षणच आहे कीं ते त्यातच सतत रमत असते व ब्रम्हचिंतनापासून दुरावते.

शुद्ध मननु ताहा लक्षण अेह । कोनी निंदा ना करेरे तेहे ॥१॥
देखे सघले हरिसमान । जेणे अंतर ब्रम्हगीनान ॥२॥
अनेग साधने भक्ति जो जो करीये । ब्रम्हज्ञान विना अर्थ न सरीये॥३॥
ब्रम्हज्ञानी उपाधी ना लेखे । सृजनविना कोई अवर ना देखे ॥४॥
अनेक रुप नाम गुण ने कर्म । दरशन देखे सब घट ब्रम्ह ॥५॥

सब घट हरी दरशीये । तो आवरण सर्वे जाये ॥
अवर ध्यान सर्वे परहरो । त्या अेकज ध्यान लगाये॥८॥

भावार्थ:- शुद्ध मनाचें लक्षण आहे कीं ते कोणाचीहि निंदा, द्वेष, तिरस्कार करीत नाही-ते निर्विकारी असते, तेच मन समस्त मनुष्य प्राणिमात्रास आत्मसमान मानते. ज्याच्या हृदयात ब्रम्हज्ञानाचा उदय झाला-ज्याचें हृदय ब्रम्हज्ञानाच्या योगाने-आत्मसाक्षात्काराच्या योगाने उजळलें जाऊन निर्मळ व कोमल बनले आहे तोच जीवात्मा केवळ प्राणिमात्रास परमेश्वर समान मानू शकतो, तुम्ही त्या परमेश्वराची कितीहि आणि कोणत्याहि साधनांनी भक्ति केली तरी ब्रम्हज्ञानाशिवाय त्याचा उपयोग होणार नाही. ब्रम्हज्ञान म्हणजे आत्म्याची जाणीव करवून घेणे हे इतर सर्व साधनापेक्षा परमोच्च साधन आहे. ब्रह्मज्ञानांच्या

प्राप्तीशिवाय भक्तीस पूर्णता येणार नाही, कारण परमेश्वराच्या एकनिष्ठ भक्तास अन्य कोणत्याही मायोपाधी मोहून टाकू नयेत म्हणून त्याला ब्रह्मज्ञान प्राप्तीची तर अत्यंत आवश्यकता असते. ज्याला ब्रह्माचे पूर्ण ज्ञान प्राप्त झाले आहे तो ह्या मायोपाधींना तुच्छ मानून त्यात अडकू शकत नाही, त्याला सर्वदूर एकमेव परमेश्वराशिवाय दुसरे कांहीहि दृश्यमान होत नाही. समस्त दृश्यमान घटात प्राणिमात्रात ते ब्रह्म चैतन्य अनंत रुपाने, अनंत नामाने, अनंत गुणाने, अनंत कर्माने परिणत झाले आहे. ज्याचे मनावरील मायाविकारांचे आवरण नाहीसे झालेले आहे म्हणजेच ज्याचे मन शुद्ध झालेले आहे अशालाच केवळ सर्व घट घटात–समस्त जीव प्राणिमात्रात हरीचे–परमेश्वराचें दर्शन घडते त्याचे सर्व मायाविकारावरील ध्यान नाहीसे होऊन एकमेव पूर्णब्रह्म परमात्म्याशी ध्यान लागते.

अवर उपाधी ते सहु परहरीये । भाई अमरते दृष्टी करीये ॥१॥
अमर दृष्टीये अरथ जो सरीये । तो संसार सागर सुखे तरीये ॥२॥
अमर दृष्टीये होय तदाकार । मुनिवर अमर सार ते निर्धार ॥३॥
मुनिवर सावधान थइने रहीये । अमर दृष्टी हृदयमा धरीये ॥४॥
अमर दृष्टी रे अमर निरखो । भाई अमर जोइ ते मन हरखो ॥५॥

अमर हरी अवतार छे । आदबिष्णु परमाण ॥
हरिवंशे अमर प्रगटे । सोही हरी पछान ॥९॥

भावार्थ :– माझ्या परमप्रीय बंधुंनो, आपण आपल्या या कल्पित-विकारी मनातून इतर सर्व मायोपाधींचा त्याग करून आपली दृष्टी अमृतासारखी निर्मळ, मधूर, समरस करा अन्य प्राणिमात्रांशी वागतांना जर आपण अमर दृष्टीचा म्हणजे सम-

दृष्टीचा अवलंब केला तरच आपले कल्याण होईल, आपण या भवसागरातून सुखाने पार तरुन जाऊ. आपण जर आत्मौपम्य बुद्धिने जगाकडे पाहिलें तर अमर अजर अशा त्या परमात्मस्वरुपांत विलीन होऊ. अशा प्रकारचीं ही समदृष्टी सर्व प्रकारच्या प्रमाणभूत तत्वांचे सार आहे. या करिता अहो मुनिगण हो! तुम्ही सावध व्हा. आपली दृष्टी प्रथम निर्विकारी करुन आपल्या हृदयात आत्मिकप्रेम धारण करा. त्या योगाने अमर परमात्म्याचें दर्शन करा. अशाप्रकारे अमृतत्वाच्या योगाने आपल्या मनाचे सार्थक करा. अमर हरीचे मत्स्य कूर्मादि दहा अवतार आहेत ते सर्व त्या आद्यविष्णु निरंजनाचेच अवतार विग्रह होत म्हणून एकतर तुम्ही त्या प्रेमस्वरुप अव्यक्त परमेश्वराची ओळख करा नाही तर त्यांच्या अवतार स्वरुपांना म्हणजे साकार-निराकार ब्रह्माला जाणा व त्यांची भक्ति करा.

हरीने जोता मन होवे प्रसन्न । अरु पर काई न जुवे मन ॥१॥
हरीचरणे मन निरमल होये । मुनिवर हरीने निरंतर जोये ॥२॥
मनसा वाचाने काया साई । मुनिवर राखो हृदया माही ॥३॥
गुरुनर स्वामी मिलापीयु जेहे । भाई अमर हरी भाखे तेह ॥४॥
सर्व प्रकारे मन दृढज करीये । स्मरण अेक साई चित्ते धरीये ॥५॥

हरीनो स्मरण कीजिये । सद्गुरु तणो लीजो भेद ॥
आदविष्णु नारायण सत् । अेम कहे छे चारे वेद ॥१०॥

भावार्थ :- ज्याचे मन अतिशय शुद्ध व पवित्र असते त्या मनुष्यासच परमेश्वराचे दर्शन होत असते. ज्यास ईश्वर दर्शन घडलें त्या मनुष्याचें मन निर्मल, निर्विकारी होत असतें. तो इतर कोणत्याच विषयाचें चिंतन करीत नाही जो मनुष्य मनाला

सद्विचारांच्या–सद्देतूंच्या बाजूला न लावता रिकामटेकडेपणासारखे इकडे तिकडे भटकू देत असतो त्याचे मन सदैव विषय विकारांचेच चिंतन करीत असते. मनाला निर्मल प्रसन्न करण्याचा एकमेव उपाय म्हणजे त्याने निरंतर हरिचरणांचे स्मरणसेवा करणे होय. परमेश्वर जर अव्यक्त आहे तर त्याची सेवा कशी करावी हा महत्वाचा प्रश्न आहे. सर्व प्राणिमात्रांचे ठायी त्या परमेश्वराचे अस्तित्व असल्यामुळे त्या प्राणिमात्रांची काया, वाचा मने करुन सेवा केल्यास ती ईश सेवाच होय व हाच भाव–हाच बोध तुम्ही अंत:करणात कायमचा ठसवा. ज्याला सद्गुरु ब्रह्माची म्हणजे ब्रह्मस्वरुपी सद्गुरुची आणि परमेश्वराची म्हणजेच अवतार पात्राची ओळख होऊन ज्याला त्यांच्या दर्शन स्मरण संगतीची प्राप्ति झाली ते जीव परम भाग्यवान व धन्य होत. सर्व बाजूंनी मन दृढ करुन, स्थिर करुन ज्यानें एकमेव परब्रह्माचे ज्योतीस्वरुपातून सतत ध्यान स्मरण चिंतन केले अशा परम भक्तालाच त्या परमेश्वराच्या व्यक्त वा अव्यक्त स्वरुपाचें दर्शन घडत असते. त्याच जीवांचा सर्व संशय मिटत असतो. 'सत्गुरु' या शब्दाचा अर्थ असा कीं सृष्टीच्या मुळाशींच काय परंतु या समस्त विश्व ब्रम्हांडाचे मूळाशीं जे अनाद्यनंत तत्व आहे व ज्या योगाने अशीं अनंत ब्रम्हांडे अनंतावकाशात धारण केली जातात त्या सत्तत्वाचें दर्शन घडविणारा–प्रत्यक्ष त्याची ओळख करुन देणारा जो तत्ववेत्ता सत्पुरुष तोच सद्गुरु होय. वेदशास्त्रादिकांनीं ज्याचे नेति नेति म्हणून वर्णन केलेले आहे तोच परमेश्वर अव्यक्त रुपाने सत् व व्यक्त रुपाने आद्यविष्णु नारायण–अवतार पात्र अथवा जगत् रुपाने नटलेला आहे.

वेदनु कह्यु जो करीये । हरि हरि नाम नीत ओचरीये ॥१॥
अवर उपाधीये अरथना सरे । हरि हरि कहेता निश्चे तरीये ॥२॥
परम प्रीते जपो अविनाश । भाई अवरनी तजीये आस ॥३॥
फलने अर्थे भजीये सारंगप्राण । अे तो दुकानदारी पूरण जाण ॥४॥
फलने तजी सेवा करीये सार । केवल भगती गुरुनरनो प्यार॥५॥

हरि प्यार बहु धरे । जो छोडे अवर आस ॥
सर्व आशा परहरो । तो गुरुनर तारे पास ॥११॥

भावार्थ :– वेद वचनानुसार परमेश्वराचें सतत स्मरण करा. सर्व मायोपाधींना सोडून (कारण मायोपाधींच्या योगाने मोक्ष-साधनांची एकहि गोष्ट सिद्धीस जात नाही म्हणून त्या उपाधींचा त्याग करुन) परमेश्वराचें नित्य स्मरण केल्यास निश्चयाने आपण भवसागर तरले जाऊ. त्या परमेश्वराचें नित्य स्मरण कसे करावे? सर्व प्रकारची ऐहिक सौख्य प्राप्तीची आशा सोडून आणि फलप्राप्तीची सुद्धा सूक्ष्म आकांक्षा सोडून परमप्रेमाने प्रेरीत होऊन परमेश्वराचे नित्य स्मरण करावे. जर तुम्ही फल-प्राप्तीचा हेतु मनात बाळगून अथवा सुखप्राप्तीकरिताच केवळ परमेश्वराची भाडोत्री भक्ति कराल तर ती शुद्ध दुकानदारी गणली जाईल या करितां कर्म फलाचा त्याग करा व निष्का-मतेंने जगन्नियंता जनार्दनाची सेवा करा, सद्‌गुरुवर आणि परमे-श्वरावर केवळ प्रेम म्हणून प्रम करणे–निर्विकारी, निर्विषयी, निष्कामतेंने प्रेम करणे हीं खरोखर परमभक्ति होय–प्रेमभक्ति होय. जर तुम्ही सर्व वस्तुवरील आसक्ती सोडली तरच तुम्हास त्या परम प्रेमास्पद प्रभुवर प्रेम करता येईल–जेव्हा तुम्ही सर्व मायोपाधीवरील आसक्ति सोडून त्या प्रभुवर प्रेम करुं लागाल

तेव्हां तो परमेश्वर तर आपल्या जवळच आहे याचा साक्षात्कार तुम्हास होईल.

विषय वासना परहरे जे जाण । तेणे श्रीहरी बहाला परमाण ॥१॥
जेनु मन गुरु नर चरणे रमे । तेणे अतिशय अन्न नव गमे ॥२॥
जेणे अेक हरी वहाला करीया । तेणे रिद्धी सिद्धी भोग परहरीया॥३॥
हरीने हरीजन वहाला सही । सत सत श्रीमुखे वाणी कही ॥४॥
श्रीमुख वाणीना कह्यु वचन । सांभलो मुनिवरो अेके मन ॥५॥

श्रीमुख वाणी ओचरे । मुजने वहाला मींत ॥
सृजनहारना वचनपर । धरजो अेकज चित ॥१२॥

भावार्थः- ज्यानें विषयवासनांचा परित्याग केला, म्हणजे मन भोग लालसेपासून परावृत्त केले केवळ तोच श्रीहरीचा परम प्रेमास्पद होत असतो. ज्याचे मन सद्गुरुंच्या चरण कमळीं पूर्ण लीन झाले आहे त्याला अन्नाचीसुद्धा आवश्यकता म्हणजे जाणिव राहात नाही. अन्नपाणीच काय पण इतर कोणत्याही कर्माची त्याला जाणीव-नेणीव राहात नाही. ज्याने एकमेव परब्रह्माला परमप्रेमस्वरुप मानले म्हणजे आयुष्यभर सतत त्याच्यावरच प्रेम केले त्यांच्या मनातून ऋद्धिसिद्धि-भोग-लालसा-विषय-वासना सर्व कायमच्या निघून जातात. परमेश्वराला सर्वापेक्षा आपला भक्तच परमप्रीय असतो. अशी ही भगवंतानेच स्वमुखाने वाणी कथन केलेली आहे. हे परमप्रेमास्पद मुनिजन हो! परमेश्वराने स्वमुखाने कथन केले आहे कीं, "यो मद्भक्तः स मे प्रियः ।" गीता १२/१४ 'मला खरोखरच सर्वापेक्षा माझा भक्तच अत्यंत प्रिय आहे व मी अखेर त्याच प्रेमळ सद्भक्तांचा वाली होत असतो.' मित्रांनो! आपल्या परमपिता परमेश्वराचे हे वचन तुम्ही

सतत हृदयात धारण करुन एकचित्ताने व प्रेमाने त्याची भक्ति करा, म्हणजे तो आपला वाली–रक्षणकर्ता–पालनकर्ता होईल. आपल्या मनास विषय–विकार रुप गर्तेत पडू न देता त्याचे त्यापासून रक्षण करील.

मुजने वहाला मुनिवर जन । जेनो कहिये निश्चल मन ॥१॥
ते हरिजननी हुं सेवा करुं । तेना वचन ते मस्तके धरु ॥२॥
हुं ते हरिजन हरिजन ते हुं जाण । अेम कहे श्री नारायण वाण ॥३॥
हरि हरिजन वचे अंतर नही । रुप बे पण दिल अेकज सही ॥४॥
हरिजन हरि हरि निश्चें करे । हरि हरिजनने क्षणुना विसरे ॥५॥

हरि ने हरिजन अेक छे । तमे दो न देखो जाण ॥
जेम हंस कायामा जाणीये । अेम श्रीमुखे कहे वाण ॥१३॥

भावार्थ :– भगवंताने म्हटलेले आहे कीं, 'ज्यांचे मन निश्चल दृढ–स्थिर झालेले आहे असा माझा परमप्रेमस्वरुप भक्त मला माझ्याहूनहि प्रिय आहे. त्या माझ्या भक्त जनांची मी सेवा करतो, त्यांचे वचन मी सर्व प्रथम मस्तकावर धारण करतो. मी तो भक्त व भक्त तो मी अशी आमच्या दोघात साम्यता–अभेदता–एकरुपता होते. एवढेच नव्हे तर त्या परम प्रेमस्वरुप भक्तांचें आधिन मला व्हावे लागते.' अशा प्रकारे भगवंताने स्वमुखानें भक्ताचे महात्म्य वर्णन केलेले आहे. खरोखरच प्रम-भक्तीचा-पराभक्तीचा महिमाच तसा आहें की भक्त व भगवान यात भेद राहूच शकत नाही. त्यांची बाह्यरुपे जरी दोन भासत असली तरी अंतर्मने प्रेमार्दतेनें अभेदत्व पावलेली असतात-एकरुप झालेली असतात. भक्त जर दृढ निश्चयानें व पूर्ण प्रेमाने त्या श्रीहरीचे सतत स्मरण करीत असेल तर तो श्रीहरीसुद्धा त्या

भक्ताला एक क्षणभरहि विसंबत नाही. परमेश्वर आणि भक्त दोघे चिद् रुप आहेत. तुम्ही त्यांत भेददृष्टीने पाहू नका. जसे आपल्या शरीरात हंसस्वरुप आत्मा वास्तव्य करतो, त्या चैतन्या-शिवाय हे शरीर राहूच शकत नाही, त्या प्रमाणें भक्ताशिवाय परमेश्वर व परमेश्वराशिवाय भक्त राहूच शकणार नाही.

हरि नें हरिजन सदा अेक जाण । मुनिवर अंतरमा निश्चय आण ॥१॥
हरिथी हरिजन मोटा सही । हरि त्रिगुण हरिजन त्रिगुण नाही ॥२॥
हरिजननें अेक हरि चित्त वंदन । ते अवर काई इच्छ नही मन ॥३॥
हरिजन पुजतारे विष्णु पुजाय । पुजक पुजे हरि तृप्त थाय ॥४॥
सांई सगले अेम वेदज वदे । प्रगट छे हरि हरिजननें हृदे ॥५॥

प्रगट हृदये हरिजननें । जेणे तजीये विषय विवाद ॥
अमर खेल अतुल गत । तेनो कोई ना लेवो पार ॥१४॥

भावार्थ :– परमेश्वर आणि भक्त यांत सदैव अभेदत्व असते हे मुनिवरा, तू आपल्या हृदयात असा निश्चय कर की परमेश्वर आणि हरिजन–भक्त हे एकच असतात किंबहुना हरिपेक्षाहि भक्त मोठा म्हटला जातो. कारण, हरि जरि निर्गुण असला तरीं त्यांत त्रिगुणांचा–सत्व, रज, तम, या तीन गुणांचा उद्रेक होऊ शकतो. थोडक्यात म्हणजे सृष्टीकार्याकरितां हरीला त्रिगुणमय रुपे घ्यावी लागतात. पण भक्त त्रिगुण रहित असतो, सत्व, रज, तमाच्याहि पार गेलेला असतो. भक्त त्रिगुणातीत तर असतोच परंतु निर्गुणहि नसतो. तो सर्वश्रेष्ठ परमोच्च प्रेमरस गुणाने संपृप्त झालेला असतो. तो आपल्या चित्तात सदैव एकमेव हरीला वंदन करीत असतो आणि हरि सर्वव्यापी असल्यामुळे सर्व भूत प्राणिमात्रालाच तो नित्य वंदन करीत असतो. त्याच्या मनात

इतर कोणत्याच मायोपाधी नसतात. अशा परमश्रेष्ठ सद्भक्ताची पूजा केल्यास प्रत्यक्ष परब्रह्म परमेश्वराचीच पूजा केल्याचे श्रेय लागते. कारण त्या अकळकळानिधान प्रभुचें सर्व लक्ष एकमेव आपल्या भक्ताकडेच व भक्ताचेंहि सर्वलक्ष एकमेव प्रभुकडेच असल्यामुळे ते एकरुप असतात म्हणून तशा सद्भक्ताची पूजा तीच प्रभूची पूजा असल्यामुळे त्यांची पूजा केल्याने परमेश्वर तृप्त होतो. वेदशास्त्रादिकांत जरि सांगितलेले आहे कीं परमेश्वर सर्व-व्यापी आहे; तरी पण तो सद्भक्ताचें ठायीं प्रकर्षाने प्रगट झालेला असतो. भक्ताचें ठायीं नित्य विलसत असणाऱ्या चैतन्याचा पूर्ण विकास झालेला असतो. जो भक्त विषय, विवाद व विकार रहित झाला म्हणजे ज्यानें पंचेन्द्रियांच्या विषयांचा व मनाचे ठायी उद्भवणाऱ्या नानाविध विकारांचा सर्वस्वी त्याग केला अशा सद्भक्ताचें हृदयात त्या परमेश्वराचे नित्य निरंतर वास्तव्य असतें. ज्याची तुलना कोणाशीही करता येत नाही अशा अपार गुण-निधान परमेश्वराचा पार–अंत–सीमा–मर्यादा कोणीहि जाणू शकत नाही आणि त्या पेक्षा त्याच्या सद्भक्ताचा महिमा तर कोणीच जाणू शकत नाही. ते जाणणे आपल्या बुद्धीच्या पार आहे.

सखे धरतीये उदक जोइये । तेणे जळे करो अर्थ ना होवे ॥१॥
प्रगट होये ताहा कारज थाये । हरि प्रगट जाहा हरिजन गाये ॥२॥
जेणे लक्षण होय जो बत्रीश । जे हरिजननें प्रगट जगदीश ॥३॥
हरिजन लक्षण हृदामाहे ग्रहो । मुनिवर अंतरमा समजी रहो ॥४॥
संतना लक्षण कहियेरे जेहे । अेक मना मुनिवर सुनीये तेहे ॥५॥

अेक मना बइने सांभलो । सावधान थई मुगत ॥
जेम तेम करीनें आदरो । अनें लक्षण केरी जुगत ॥१५॥

भावार्थ:– जमिनीमध्ये सर्व दूर पाणी असते, परंतु त्या पाण्याचा सहजासहजी उपभोग घेता येत नाही. जेव्हा जमिन खोदली जाईल तेव्हांच ते तेंथे प्रगट होत असते व ते उपयोगात आणले जाते किंवा मेघाचे पाणी जमिनीवर सर्वदूर सारखेच पडत असते पण ज्या ठिकाणी जमिनीचा उंच भाग असतो किंवा पठारमय पर्वताच्या उंच टेकडीवर पाणी थांबू शकत नाही पण सखल किंवा दऱ्या खोऱ्या-खांच-खळग्यात पाणी थांबते-साठते, त्याचप्रमाणें हरीचे वास्तव्य जरी सर्वदूर असले तरी जे अत्यत नम्र सालस आहेत अशा हरिजन म्हणजे भक्त जनांचें ठिकाणी आणि जे अत्यंत प्रेम भावनेने परमेश्वराचें गुणगान, स्तुति, आळवणी करतात त्या ठिकाणी परमेश्वर प्रगट असतो. भगवंतांनी सांगितलेलें आहे कीं,–

नाहं वसामि वैकुण्ठे योगिनां हृदये न च ।
मद्भक्तः यत्र गायन्ति तत्र तिष्ठामि नारद ॥

'माझे वास्तव्य वैकुंठातहि नाही किंवा ऋद्धिसिद्धि प्राप्तीची कामना करणाऱ्या, निरंतर समाधी योग साधून ध्यान धारणा करणाऱ्या योगी लोकांच्या हृदयात सुद्धा नाही, माझे भक्त जेथे मला निरंतर प्रेमाने आळवीत असतात-निस्वार्थ, निष्काम प्रेमानें आर्ततेने माझी भक्ति करीत असतात अशा सद्भक्तांचे जवळ मी तिष्ठत बसतो कारण त्यांनी अगाध प्रेमरसाने मला आळविलेले असतें माझ्या प्राप्तीशिवाय इतर सर्व कामना विलय पावलेल्या असतात. जे सद्भक्त बत्तीस लक्षणांनी युक्त असतात सात्विक गुणांचा आश्रय करुन जे वृत्तिशून्य झालेले असतात व क्षणिक सुखाचा ज्यांनी त्याग केलेला असून जे सदैव ब्रह्मलीन झालेले

असतात त्याच्या हृदयात जगदीश पूर्ण रुपानें प्रगट असतो. हे मुनिश्रेष्ठांनो तुम्ही ती लक्षणे समजून घ्या. ते दैवी गुण अंतरात समजावून घेऊन हृदयात धारण करा व त्या प्रमाणे वागा. संत कोणाला म्हणतात–संताचे लक्षण काय? सावधचित्त होऊन एकाग्र मनाने श्रवण करा.

जेम तेम करीने आदरो वात । ब्रह्मज्ञाने पावो साक्षात् ॥१॥
दया हृदयामाही कुबुद्धि परहरीये । हरिजन क्षमा सदा मन धरीये ॥२॥
सार वचन बोले सत्य संत । मुनिवर अंतरमा वहालो भगवंत ॥३॥
हरिजन हरिचरणे मन मांडे । अवर कू मारग मेलो रे छांडे ॥४॥
हर्ष ने शोक न करे सवाहि । पर उपकार करे धरे मुवाही ॥५॥

पर उपकारी परमार्थी । अने हरिजन तेनुं नाम ॥
काम क्रोध व्यापे नही । निर्मल बुद्धि तमाम ॥१६॥

भावार्थ :– जो परम भावाने ब्रम्हज्ञान श्रवण करुन त्याप्रमाणें वागतो त्याला परमेश्वराचे साक्षात् दर्शन घडत असते. ज्याच्या हृदयात दयेचा निरंतर वास असतो आणि ज्याच्या हृदयातून कुबुद्धिचे संपूर्णतः उच्चाटन झालेलें असते, निरंतर ज्याचे मन क्षमायुक्त असते-कोणी त्या भक्ताला दुष्ट बुद्धीने जरी त्रास, कष्ट, दुःख दिलें तरी त्याकडे न बघता जो सर्वांना क्षमा करतो, तद्वतच जो खरा भक्त असतो तो व्यर्थ बडबड न करता सार–वचन सदैव बोलतो, ज्याचे हृदयात भगवंता विषयी परमप्रेम बसलेले असते तोच खरा संत–सद्भक्त होय तसेच भक्ताचे मन सदैव परमेश्वराचें चरण कमळीच केवळ लीन झालेले असते. आणि ज्याने सर्व कूमार्गांचा सर्वथा त्याग केलेला आहे. जो सदैव शोकमग्न दुःखी कष्टीहि नसतो किंवा सदैव उन्मत्तपणे हसत

खिदळतहि नमतो तसेच जो सदैव परोपकार रत असतो, परोपकार करतांना ज्याच्या मनाला संतोष लाभत असतो तोच खरा संत-सद्भक्त होय. जो परोपकारी, परमार्थी असतो निर्व्याज बुद्धीने अन्य गांजलेल्या पीडलेल्यांची जो ईशरुपाने सेवा करतो आणि ज्याला काम क्रोध व्यापू शकत नाहीत-स्पर्शसुद्धा करुं शकत नाहींत अशा प्रकारे ज्याचा बुद्धि सदैव निर्मल असते तो खरा हरिजन म्हणजे सद्भक्त संत होय. श्रीमत्‌भगवत्‌गीतेंहि श्रीकृष्णानें सांगितलें आहे कीं,

अभयं सत्वसंशुद्धिर्ज्ञान योग व्यवस्थितिः ।
दानं दमश्च यज्ञश्च स्वाध्यायस्तप आर्जवम् ॥१६/१॥
अहिंसा सत्यमक्रोधस्त्यागः शान्तिरपैशुनम् ।
दया भूतेष्वलोलुप्त्वं मार्दवं ह्रिरचापलम् ॥१६/२॥
तेजः क्षमा धृतिः शौचमद्रोहो नातिमानिता ।
भवन्ति सम्पदं दैवीमभिजातस्य भारत ॥१६/३॥

निर्भयता, पूर्ण सात्विक वृत्ति, आत्मज्ञान, कर्म व योग यो द्दोहोविषयीं निष्ठा, दातृत्व, बाह्येंद्रियनिग्रह, यज्ञाविषयी श्रद्धा, वेदशास्त्राध्ययन तत्परता, तपश्चर्या (शारीरिक, मानसिक, बौद्धिक सामर्थ्य संपादन), निष्कपट आचरण, प्राणिमात्रास पीडा न देणे, सत्यभाषण, क्रोधाचा अभाव, त्यागवृत्ति, चित्तशांति, मनात दुष्ट बुद्धि न बाळगणे, प्राणिमात्राविषयी दया, निर्लोभता मनाचे मार्दव (अक्रूरता), दुराचरणांची लाज वाटणे, स्थिर बुद्धिता, तेजस्विता, क्षमा, मनोधैर्य, अतर्बाह्य शुद्धता, कोणाचाहि हेवा दावा न करणे, दुरभिमान नसणे असे हे सद्गुण ज्याच्या ठायीं निरंतर वास करतात तोच खरा सद्भक्त-संत होय.

काम क्रोधे जे हणाये नही । धीर वीर तो जाणो सही ॥१॥
इंद्रियो सर्वे पवित्र करीये । निर्दोष थइनें चोदिस फरीये ॥२॥
कोमल स्वभाव संतोष नीत ग्रहीये । बाहर भीतर पवित्र रहिये ॥३॥
साचा हरिजन अेक मन होई । विषय विकार ना दिसे कोई ॥४॥
हृदये न उपजे द्वेष अनुप्रमाण । भक्तिज्ञान ते सत करी जाण ॥५॥

सत करी जाणो ते हरिजन । जेणे अेक हरिसु हेतरे ॥
आहार व्यवहारे वळगी रह्या । तेनी भगती साचरे ॥१७॥

भावार्थ :– जे जीवात्मे काम क्रोधादिकांच्या आहारी जात नाहीत–त्या विकारांना बळी पडत नाही म्हणजेच जे काम क्रोधादि षड्विकारांना जिंकतात तेच खरोखर धीर वीर जाणावेत. आपलें हृदय अत्यंत पवित्र करुन–निर्मल करुन निर्दोष व निःसंग होऊन जगात वावरावयास हवे आहे. ज्याचा स्वभाव अत्यंत कोमल, लोण्यासारखा मृदू असून ज्याची वृत्ति सदैव संतोषी असते असाच संत भक्त केवळ अंतर्बाह्य पवित्र होऊ शकतो. खरा हरिभक्त तोच कीं जो परब्रह्माशीं एकतान, एकरुप होऊन जातो त्याच्या दृष्टीतच काय परंतु मनात सुध्दा विषय विकार किंचीत्मात्र दिसू शकत नाही. ज्याच्या हृदयात अन्य प्राणिमात्राविषयी अणुभरहि द्वेष उपजू शकत नाही, ज्याच्या हृदयांतरी सदैव सत्–चित्–आनंदघन परम प्रेम स्वरुप परब्रह्म परमात्म्याची ज्ञानयुक्त भक्ति सदैव विलसत असते तेच खरोखर संत सद्भक्तजन–हरिभक्तजन समजावेत. त्यांची प्रीति केवळ एकमेव प्रभुवरच असतें, अन्य आहार व्यवहारांचा विचारहि त्यांच्या हृदयकमलातून पार नाहीसा झालेला असतो, त्याचीच खरोखर सर्वश्रेष्ठ भक्ति होय व तेंच प्रभुचें सर्वोत्तम भक्त होत.

जुगते आहारनें जुगते बहेवार । मुनिवर अंतरमा वस्तु विचार ॥१॥
शील स्वभावे हरिजन मन धरीये । थीरता थइनें सदा अनुसरीये ॥२॥
सद्‌गुरु स्वामीनें शरणे रहिये । गुरुनर भगती रे तेणे कहिये ॥३॥
मन निर्मल ते मुनिजन जाण । बाहर भीतर माहे सारंग प्राण ॥४॥
अमर अकर नित्य रहे सावधान । आप मदनु जेणे नही अभिमान ॥५॥

आप मद अभिमान नही । परहरीये निर्धार ॥
धीर वीर साचः सदा । तेना अनुभवनो नही पार ॥१८॥

भावार्थ :– जो मनुष्य युक्त–उचित–अनुकुल असाच आहार व्यवहार करतो आणि ज्या महात्म्याचें मन अत्यंत निर्मल पवित्र असून बुद्धि–चित्त सदैव आत्मचिंतनात स्थित झालेलीं असते, जे शीलाने व गुणस्वभावाने अत्यंत नीतिमान् व उज्वल पवित्र असतात. जे धीर-वीर शौर्याने व शांततेने वागून सर्व व्यवहार– सर्व कर्मे युक्तीनें निष्कामतेनें करीत असतात, सद्‌गुरुंला व परमात्म्याला सदैव शरण येत असतात तेच खरें गुरुचे व परमेश्वराचें सद्भक्त समजावेत. ज्याचे मनाचे ठायी कोणतेहि दुष्ट पणाचे, परनिंदेचे विचार नसतात. तेंच निर्मल हृदयी सर्वश्रेष्ठ मुनिजन ऋषीजन होत. आपल्या अंतरबाह्य एकच परमेश्वर सामावलेला आहे याची त्यांनाच जाणिव झालेली असते–साक्षात्कार झालेला असतो. जे अमर, अकर म्हणजे नित्य कर्मे करीत असूनहि त्या कर्मफलाविषयी जे अनासक्त असतात, अर्थात जे समस्त कर्मांचें फळ परब्रम्हास अर्पण करुन नित्य सावधानतेने व्यवहार करतात- ज्यांना कर्तेपणाचा अभिमान किंचीतमात्र नसतो, जो समस्त मानापमानाच्या व मोठेपणाच्या, अभिमानाच्याहि पार गेलेंला असतो, थोडक्यात म्हणजे अखिल माया विकारांच्या पार गेलेला असतो,

सर्व मनोविकारांना जिंकून ताब्यात ठेवणारा असतो तोच खरा धीर वीर पुरुष समजावा. त्याच्या स्वानुभवास पार लागू शकत नाही त्यालाच केवळ ब्रह्मस्वप्राप्ति होते. तोच परमेश्वरमय होत असतो.

जेना अनुभवनो नही पार । गुण गंभीर ते हरिजन सार ॥१॥
धरती जेवा गुण हृदयमा धरीये । सत्य सोही हंसवृत्ति धरीये ॥२॥
सद्गुरुस्वामी ते क्षीरज जाण । विनष्ट विश्व ते नीर परमाण ॥३॥
हरिजन हरीनी नीत करे वखाण । हरि चरणे हरिजन निरवाण ॥४॥
हरिजन हिरदामा हरि परमाण । हरीनु स्मरण हरिजन ते जाण ॥५॥

षड्‌रिपु जिते हरिजन । मानरहित महा मीतरे ॥
वैराग्य विश्वासे खरा । ते हरिजन हरिना चितरे ॥१९॥

भावार्थ :— ज्यांच्या आत्मानुभवाला पारावार नसतो, जे गुणवंत धीर गंभीर असतात. जे गुणग्राही असून संतोषी असतात ते हरिभक्तजन समजावेत. भक्तानें पृथ्वीचा गुण प्रामुख्यानें हृदयात धारण करावा. पृथ्वीचा गुण म्हणजे धृ–धारयति धारण करणे–सर्वांचे धारण पोषण–संवर्धन करणे. कोणावरहि रुष्ट न होता सहनशिलता अंगी बानविणे हा धरत्रीचा गुण हृदयात धारण करुन हंसवृत्तीचे अवलंबन करावे. हंसवृत्ति अशी असते कीं– 'क्षिर ग्रही नीर परहरीयें' दुध ग्रहण करुन पाणी सोडून देणे, 'सार ग्रहीने छार छांडीयें' सार ग्रहण करुन छार म्हणजे असत्य, अप्रीय, अग्राहय सोडून देणे ही हंसवृत्ति होय. ग्राह्य आणि अग्राह्य काय याचा विचार पुढे दिलेला आहे. सद्गुरुस्वामी म्हणजे ब्रह्मस्वरुपी सद्गुरु हे दुधाप्रमाणे असून त्यांचे वचन हे सर्व सार वस्तुतले सारवचन होय म्हणून ते ग्राह्य होत. म्हणन

सद्‌गुरूचें वचन म्हणजेच ब्रह्मविचार समस्त प्राणिमात्रांचे ठायीं एकरुप पाहण्याची वृत्ती ग्रहण करुन, असार, विनष्ट, नाशवान जगताचा त्याग करणे. जगताचा त्याग म्हणजे या जगातून नाहिसे होणे नव्हे तर जगतात वसलेले जे मायाविकार आहेत त्या समस्त माया विकारांचा त्याग करणे. अशा प्रकारची हंसक्षिर वृत्ति धारण करुन परमेश्वराचा, सद्‌वस्तुंचा नित्य अवलंब करुन, आपले मन सदैव हरिचरणी लीन करुन; हरीचे स्मरण नित्य हृदयात धारण करुन जे षड्‌विकारांना जिंकतात व जे मान रहित, द्वेष रहित असतात. जे वैराग्याने युक्त व विश्वासानें परिपूर्ण असतात त्या हरिजनांच्या–भक्तजनांच्या हृदयात हरीचे, परमेश्वराचे वास्तव्य निरंतर असते-तेच परमेश्वराचे महान मित्र होत.

षड्‌रिपु जीते हरिजन प्रमाण। मान रहित ते उत्तम जाण ॥१॥
सर्वे सृष्टीनें दिये अतिमान । आप विषे नही अभिमान ॥२॥
कल्पवृक्षनी पेरे समर्थं । उत्तम हरिजन टाळे अनर्थ ॥३॥
मित्रभाव सगले छे जेहे । दया हिरदामाहे कहियेरे तेहे ॥४॥
हरिजन समो सति नही कोय । महापद पदमो निरंतर जोये ॥५॥

महापद श्री हरिजननें । जो जीवता मृतक होये रे ॥
अनंत लोचन उघडो । तो सब घट दरशन जोये रे ॥२०॥

भावार्थ :- ज्यांनी षड्रिपुंना जिंकले, काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर या महान दुर्गुणांचा ज्यांनी त्याग केला व जे अभिमान रहित आहेत तेच पुरुष उत्तम समजावेत. सृष्टीतील सर्व भूतप्राणि मात्राला जे मान देऊन स्वतःविषयी अहंकार-गर्व न बाळगता सर्वांशी समत्व बुद्धिने वागतात, जे कल्पवृक्षाप्रमाणें सदैव समर्थ असतात म्हणजेच वृक्षाप्रमाणें जे निस्वार्थ बुद्धिनें

परोपकार करीत असतात. जे सर्व अनर्थांचे मूळ अशा आपल्या मनास जिंकून ताब्यात ठेवतात, सर्वांविषयी मित्रभाव राखतात. ज्याचे हृदय अपार दयेने भरलेले असून अन्य जीवात्म्यांची जे निर्हेतुक बुद्धिने सेवा करतात तें भक्तजन उत्तम समजावेत अशा भक्त गणासारखे महान सत्यवान् जीव अन्य नाही. असले सद्भक्त जनच महापदाचा–मुक्तिपदाचा निरंतर उपभोग घेतात. भक्ताला महापदाची प्राप्ति तेव्हांच होते जेव्हा तो सर्व विषयसेवनापासून निर्वृत्त होतो–विकाररहित होतो, म्हणजेच तो जीवन्मुक्त झालेला असतो ज्याची क्रियावस्था व भावावस्था एकरुप एकमय झालेली असते तेच जीवनमुक्त होऊ शकतात. ही अवस्था प्राप्त झालेला जीवात्मा केवळ दोन चर्मचक्षुंनी पाहत नाही, त्यांना आंतर्दृष्टी दिव्यदृष्टी प्राप्त झाली ते अखिल जगताकडे प्रेममय अनंत डोळयांनीं बघू शकतात त्यांनाच सर्व घटघटाचें-प्राणिमात्रांचे ठायीं एकच ब्रह्म दिसू लागते भगवान श्रीकृष्णांनी गीतेत सांगितलें आहे कीं,–

अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एव च ॥
निर्ममो निरहंकारः समदुःखसुखः क्षमी ॥१२/१३॥
सन्तुष्टः सततं योगी यतात्मा दृढनिश्चयः ।
मय्यार्पितमनोबुद्धिर्यो मद्भक्तः स मे प्रियः ॥१४॥
यस्मान्नोद्विजते लोको लोकान्नोद्विजते च यः ।
हर्षामर्षभयोद्वेगैर्मुक्तो यः स च मे प्रियः ॥१५॥
अनपेक्षः शुचिर्दक्ष उदासीनो गतव्यथः ।
सर्वारम्भपरित्यागी यो मद्भक्तः स मे प्रियः ॥१६॥
यो न हृष्यति न द्वेष्टि न शोचति न कांक्षति ।
शुभाशुभ परित्यागी भक्तिमान्यः स मे प्रियः ॥१७॥

समः शत्रौ च मित्रे च तथा मानावमानयोः ।
शीतोष्णसुखदुःखेषु समः संगविवर्जितः ॥१८॥
तुल्यनिन्दास्तुतिर्मौनी सन्तुष्टो येनकेनचित् ।
अनीकेतः स्थिरमतिर्भक्तिमान्मे प्रियो नरः ॥१९॥

जो माझा भक्त कोणाहि प्राण्याचा द्वेष न करणारा, सर्वांशी मित्रत्वाने वागणारा आणि दयाशील असतो, तसाच जो निःस्वार्थी, निरहंकारी, सुखदुःख समान लेखणारा क्षमाशील, सतत संतुष्ट वृत्तीचा, समत्वबुद्धियोगी जितेंद्रिय दृढनिश्चयी आणि माझ्याच ठिकाणीं मन व बुद्धि स्थिर झालेला, ज्याच्यापासून कोणाहि माणसाला त्रास होत नाही व जो लोकसमाजापासून त्रास मानीत नाही आणि जो आनंद, क्रोध व भय यांच्या उद्वेगापासून अलिप्त असतो, आणखी जो माझा भक्त निःस्पृह, अंतर्बाह्य पवित्र, कर्तव्य जागरुक, फलाविषयी अनासक्त, दुःखातीत व सर्व खटाटोपांचा त्याग केलेला असा असतो, तो भक्त मला प्रिय होतो. जो सुखसंवेदक वस्तु प्राप्त झाली असतां आनंदभरित होत नाही किंवा तद्विपरीत वस्तुचा तिटकारा करीत नाही जो कशाच्याही हानीमुळे शोक करीत नाही अगर जो कोणत्याहि वस्तूंच्या प्राप्तीपासून सुखाची आकांक्षाहि बाळगीत नाही आणि जो भक्तियुक्त मनाचा असून प्रिय व अप्रिय सर्वच कर्मफलांचा त्याग करतो तो भक्त मला प्रिय आहे. शत्रु व मित्र, मान व अपमान या दोहोविषयीं सारखीच वृत्ति ठेवणारा, तसेच थंडी व ऊन, दुःख व सुख ही समान लेखणारा, अनासक्त निंदा व स्तुति या दोहोविषयीं सारखाच उदासीन, वाक्संयमी मिळेल त्यांत संतोष मानणारा, गृहादिकाची आसक्ति नसलेला स्थिर बुद्धिचा व भक्तियुक्त अंतःकरणाचा जो मनुष्य असतो तो भक्त

मला फार प्रिय असतो.

हरि प्रगट हरिजनने हृदे । गुरु नर शास्त्र अेम वाणी वदे ॥१॥
हरि ते हरिजन हरिजन ते हरि । अेवी बुध राखो हृदयामा धरी॥२॥
श्रीमुख बोलीया बोले तोये । मुनिवर अंतरमा प्रगट होये ॥३॥
सद्गुरु सत्जन सेवे जेहे । सुखे परमपद पामे तेहे ॥४॥
काया क्लेश साधन वन कर्म । सत संगते मलीया परिब्रह्म ॥५॥

परिब्रह्म तो सद्गुरु मले । जो गुरु भेद पछान रे ॥
ते मर्म हरिजननें हृदे । ते हरिजन महिमा जाण रे ।।१२।।

भावार्थ :— सद्गुरु महाराज सांगतात कीं गुरुवचन आणि शास्त्रवचन आहे कीं परब्रह्म परमात्मा सद्भक्तांचे हृदयकमलीं निरंतर वास करीत असतो, या करिता अहो सत्साधकांनो भक्त तोच परमेश्वर व परमेश्वर तोच भक्त अशी उच्चतम समत्व प्राप्त करुन देणारी बुद्धि तुम्ही निरंतर हृदयात धारण करा असे स्वतः परमेश्वर भगवान श्रीकृष्णाने श्रीमुखाने सांगितलेलें आहे. या करितां तुम्ही आपली दृष्टी अंतर्बाह्य शुद्धनिर्मल ठेवा जे जीवगण सद्गुरु, सत्पुरुष, संतजन यांची निरंतर सेवा करतात, त्या परम भाग्यवान जीवांना परम पदाची प्राप्ति होते. त्याला शरीराला त्रास द्यायला नको कीं अन्य कष्टतर साधने करायला नकोत किंवा एखादे भयप्रद कर्म आचरायला नको, सदैव सत्पुरुषांची सेवा केली कीं, त्याला ब्रह्मत्व प्राप्तीचे ज्ञान झालेंच म्हणून समजा. सद्गुरुंच्या योगानें परब्रह्माची प्राप्ति होते आणि परब्रम्हाची प्राप्ति झालेल्या सत्पुरुषांच्या सेवेच्या योगानें अज्ञ जीवात्म्यांचा सुद्धा उद्धार होतो. हा असा सद्भक्तांचा महिमा जाणून

समजून तुम्ही निरंतर त्या हरिभक्त गणांची ब्रम्हत्व प्राप्त झालेल्या ब्रम्हनिष्ठ सद्भक्तांची सेवा करा.

सत् संगतनो महिमा घणो । पार ना पावे कोई तेहजनो ॥१॥
अेक मनें सेवो जे हरि पछानो । सत संगत तमे साधन जाणो ॥२॥
सत संगतनें थाये ब्रम्हज्ञान । ब्रम्हज्ञानें थाये दृष्टी समान ॥३॥
दृष्टी समानें सघले हरि जोये । भाई अमर जीव मुगता होवे ॥४॥
सावधान थावो नमे ऋषीजन । साई स्मरो नें करो जतन ॥५॥

सावधानें हरि स्मरण करो । साधन करो तन मन रे ॥
पुंजी छे परिब्रम्हनी । माणस जन्म रतन रे ॥२२॥

भावार्थ :– सत् संगतीचा महिमा फार मोठा आहे, त्याचा कोणालाच पार लागू शकत नाही असा तो महिमा अपार अवर्ण्य, अतर्क्य अकलनीय आहे. हरीला जाणण्याची जर तुमची इच्छा असेल तर एक मन एकचित्त होऊन त्याचे मनोमय ध्यान करा आणि सत्संगतीचे साधन स्वीकृत करा. सत्संगतीच्या योगाने जीवात्म्याला आत्मस्वरुपस्थितीचे व समत्व बुद्धिचे ज्ञान होतें व त्या ब्रम्हज्ञानामुळे दृष्टी समान होते. सर्व जीवप्राणिमात्रांचे ठायीं एकमेव हरी ओत प्रोत भरलेला आहे अशी समत्वप्रधान बुद्धि होऊन त्या योगे त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलतो. सर्वव्यक्ति–सर्ववस्तु एकमेव हरीचें अवतार विग्रहच आहेत, नव्हे एकमेव हरीच आहेत अशी आपली दृष्टी होते आणि जेव्हा आपली दृष्टी अशीच निर्मल व पवित्र होईल, केवळ तेव्हाच आपण मुक्तीचे अधिकारी होऊ याकरितां अहो ब्रम्हवृन्द हो! तुम्ही सावध व्हा. हरीचे सतत स्मरण करा, तनमनापासुन ब्रम्हत्व प्राप्तीचे साधन करा. खऱ्या दिलाने निर्मल, पवित्र चित्ताने

परब्रम्हाचें चिंतन करा, निरंतर सत्संग करा व परब्रम्हाची प्राप्ती करुन घ्या आणि केवळ एवढयाच करितां आपणास मानवजन्म लाभलेला आहे. परमेश्वरी संकेतानुसारच जीवात्म्यास मानव जन्म मिळत असतो व मानव जन्माचें अंतिम लक्ष्य आहे मोक्षप्राप्ति. ज्या वेळेस जीवात्म्यास परमात्म्याची जाणिव होते, जीवात्मा व परमात्मा एकरुप पाहण्याची बुद्धि होते तेंव्हाच त्यास मुक्तीलाभ होतो म्हणून सांप्रत स्थितीत प्राप्त झालेल्या मानव जन्माचे सार्थक करुन घ्या.

मानव जन्म मुगतीनो द्वार । ते नहो पावे तमे वारंवार ॥१॥
जे क्षण जाये ते पल आवे नहो । साई स्मरण तमे साधो सही ॥२॥
श्रीमुखे हरीनें कह्यु ते कह्युं । भाई अवर ते कही नव लह्यु ॥३॥
पंथमाहे बहु मत छे घणा । मारग रोक्या सहु भगतीतणा ॥४॥
तेणे जोई स्थिर राखोरे चिंत । राखो सद्गुरु सोही अेक मींत ॥५॥

अेक अपिचल चित्त राखीये । ग्रही भक्ति भगवंतरे ॥
अरु परु नव जोईयें । तो चोखा होवे चित रे ॥२३॥

भावार्थ :– मनुष्य जन्म हे मोक्षमंदिराचें द्वार आहे, कारण मानव जन्मात प्राप्त होणाऱ्या ज्ञान साधनाद्वारेच केवळ त्या मोक्षमंदिरात शिरता येते. अशा प्रकारचा हा मानव जन्म वारंवार लाभत नाही. लक्षचौऱ्याशींच्या रहाटगाडग्यात सांपडलेल्या जीवात्म्यास हा फारच फार महत्वाचा सर्वश्रेष्ठ टप्पा आहे. या रहाटगाडग्याचें चक्र व कालचक्र सदैव क्षणाक्षणाने पळापळाने फिरत असल्यामुळे एकदा निघून गेलेला वेळअथवा अमुल्य क्षण परत कधीहि लाभत नाही. याकरितां माझ्या प्रिय बांधवांनो! तुम्ही प्राप्त परिस्थितीत तोच उत्तम वेळ समजून परमेश्वराचें

स्मरण साधन करा. श्रीहरीनें स्वमुखाने जे सांगितलें तेच मी आपणास सांगत आहे. प्रीय सुहृदांनो! मी आपणास काहीहि नविन सांगत नाही. जुन्यातूनच नवा उजाळा देत आहे. भगवंताने वेदान्तर्गत जो सनातन व सर्व-श्रेष्ठ मार्ग दर्शविलेला आहे तोच मी आपणास दर्शवीत आहे. खऱ्या भक्तीचा मार्ग-सत् अशा परब्रम्ह परमात्म्याप्रत जाऊन मिळण्याचा मार्ग फार भिन्न आहे. कलियुगात निर्माण झालेल्या भिन्न भिन्न सांप्रदायीक मतमतांतरा-मुळे मनुष्याची मति कुंठीत होऊन त्याची अध्यात्मिक प्रगति खुंटली आहे. योग्य मार्गदर्शनाच्या अभावी त्याच्या आत्मिक उन्नतीस खीळ पडली आहे. या सर्व शुष्क मतमतांतराहून खऱ्या भक्तीचा मार्ग फार फार भिन्न आहे त्या सर्व मतभेदामुळे खऱ्या भक्तीचा मार्ग रोखला गेलेला आहे. खरा भक्त या मतभेदांत गुंतून राहात नाही. त्याचे परमउज्वल प्रेम एकमेव परब्रम्हावर असल्यामुळे त्या जाळ्यात तो अडकून राहात नाही. या करिता तुम्हीं या शुष्कवादात दंग न राहाता खऱ्या धर्माचे आचरण करा. चित्त स्थिर ठेऊन परमप्रेमरुप बंधनानें परमेश्वराशी व सद्गुरुशी मित्रत्वाने अनुसंधान बांधा. आपलें चित्त स्थिर व शांत ठेऊन एकमेव अद्वैत भगवंताच्या भक्तीचा नेम ग्रहण करा. कोणासहि तुसडेपणाने बोलू नका. सर्वांशी प्रेमानें समानभावाने वागा म्हणजे तुमचें चित्त शुद्ध व पवित्र होऊन स्थिर-शांत होईल.

संत हरिजन गुण ज्ञानी जाण । जपे एक नर पुरुष पुराण ॥१॥
भक्ति पाखे साधन तेह शुं । घृत पाखे जेम भोजन कैसु ॥२॥
साई स्मरण जेणे हृदये धरीया । ते हरिजन साधन सर्वे करीया॥३॥
हरि होये त्याहा सर्वे थाये । बीजो अवर कई नथी उपाये ॥४॥
हरि स्मरणे सकळ सुध होये । मुक्ति चार ते पामे सोये ॥५॥

मुक्ति चार पामे सही । स्मरता सारंग प्राण ॥
फरी फरी स्मरों तेहनें । चोखे चित्त परमाण ॥२४॥

भावार्थ :– जे संत सद्भक्त जन असतात ते गुणवान, शीलवान व ज्ञानी असतात. ते सत्पुरुष–पुराणपुरुष आद्य नारायण व नर–नारायणात अभेदत्वाने पाहतात म्हणजे सर्व प्राणिमात्र परमेश्वररुप जाणवतात. हे एकरुपत्व भक्तीच्या साधनाशिवाय साध्य होणार नाही. ज्याप्रमाणें सर्व भोजनात तूप हे सर्वश्रेष्ठ सात्विक अन्न मानले गेलेलें आहे, त्याच प्रमाणें सर्व साधनामध्ये प्रेमभक्ति हेच अत्यंत महत्वाचे साधन गणले गेलेले आहें. खऱ्या सद्भक्ताने या परम साधनाचा अवलंब करुन परमेश्वराचे चरण कमल आपल्या हृदयसागरात धारण करावे. अशा प्रेमी सद्भक्तांची धारणा झालेली असते कीं सर्वभूत प्राणिमात्रांचे हृदयांतरी परमेश्वराचें अस्तित्व आहें. ज्या ज्या सद्भक्तानें सर्व प्राणिमात्रांचे हृहयांतरी परमेश्वराचें अधिष्ठान आहे असे जाणले त्यासच केवळ त्या सर्वव्यापक सभराभरीत प्रभुचें सम्यक् दर्शन घडले असे मानता येईल परमेश्वर प्राप्तीचा आणखी याशिवाय अन्य उपाय नाही. या सम्यक् दर्शनाने काया, वाचा मने करुन मनुष्य अंतरबाह्य शुद्ध होत असतो व त्यास सालोक्य, सामिप्य, सारुप्य व सायुज्य अशा प्रकारच्या चारहि मुक्तींचा लाभ घडत असतो, सारंगप्राण परब्रह्माचें स्मरणानेच मनुष्यास या चार मुक्ति मिळत असतात, त्याची सर्वांचें ठायीं समान भावना होत असते, आणि म्हणूनच या सतत स्मरणाच्या योगानें जीवात्म्याचें चित्त परम विशुद्ध होतें,

फरी फरी अवसर आ नही मलीया । साई स्मरता सर्वे दुःख टलीया॥१॥
स्मरण तणो वीरा अे छे नेम । सद्गुरु साथे निरंतर प्रेम ॥२॥

सर्वे स्मरण साईनु करीये । निंदा झुट मनथी परहरीये ॥३॥
मन करम वचनें कायाये करी । सगले जाणो तमे अेकज हरी ॥४॥
सर्वे सृष्टीसु सरीखी प्रीत । मुनिवर भाई ते स्मरण रीत ॥५॥

अेज रीत स्मरण तणी । निर्मल भगती परमाण ॥
अखंड ध्याने ओराध करो । ते अनंत भक्ति जाण ॥।२५॥

भावार्थ :– अहो मुनिगणांनो! हा निघून चाललेला क्षण वारंवार तुम्हाला मिळणार नाही. तुम्ही महत्प्रयासानें हाती आलेले अमृत पिण्याच्या आळसाने धूळीत मिळवू नका. आपणास सत्यमार्गाचा अवलंब करतांना कीतीहि संकटे दुःखे आली तरी येऊ द्या; त्या सर्वांचे निवारण आपण ज्या एकमेव प्रभुचें स्मरण चिंतन करुं तो परमेश्वर करील. किंबहुना आपणच धीर वीर बनून त्या सर्व सकटांना तोंड दिले पाहिजे. आपण जर खऱ्या धर्ममार्गांचे अनुसरण केले तर त्या विराट्शक्तिशाली परम पुरुषाचें साह्य मिळेलच मिळेल. याकरिता संकटाकडे–दुःखाकडे लक्ष न देता कोणाची निंदा वगैरे न करता–असत्याचरण न करता परमविशुद्ध मनाने व निर्मल दिव्य प्रेमानें सद्गुरुचे व परमेश्वराचे सतत स्मरण करा. कायेने, वाचेने मनाने व क्रियेनें सर्व सृष्टीमध्ये एकाच परमेश्वराचे अधिष्ठान आहे हे तुम्ही जाणा म्हणजेच सर्व सृष्टी-वर–सृष्टीतील समस्त जीव प्राणिमात्रावर सारखीच प्रीति ठेवा. तेच खरोखर परमेश्वराचे परमविशुद्ध स्मरण होय. हीच खरी स्मरणाची रीत होय. तीच खरोखर निर्मल भक्ती आहे. त्याचेच तुम्ही अखंड आराधन करा. सर्वाठायी प्रेमबुद्धि ठेवा. तीच खरोखर अनंत परमब्रह्माची–आत्मतत्वाची भक्ति होय. अनेकांच्या ठायी एकत्व पाहणे हीच खरोखर अनंत भक्ति होय.

अनंत भगती तेनु नाम । सांई पाखे ठालो नही ठाम ॥१॥
सगले जाणोरे एक समान । भाई अंतर ते तत्व गीनान ॥२॥
सब घट जाणी सर्वेने वंदो । भाई अंतर केणे नही निंदो ॥३॥
आत्मा सर्वेनो अंतर्यामी । सब घट सर्वना अेकज स्वामी ॥४॥
बाहर भीतर अेक हरीनो वास । सद्‌गुरु सर्वने करे परकास ॥५॥

सर्वने सद्‌गुरु कहे । तमे चेंतो मुनिवर वीररे ॥
बाहर भीतर वर्तो रह्यो । निर्मल सर्वे शरीररे ॥२६॥

भावार्थ :- अनंत भक्तिचा विस्तृत अर्थ असा कीं, परमेश्वर सर्व ठिकाणी, सर्वाठायीं समराभरीत आहे. तो ज्या ठिकाणी नाही असे एकहि स्थान रिक्त नाहीं. सर्वदूर एक सारखाच समप्रमाणातच भरलेला आहे. म्हणजे हे अखिल विश्वब्रह्मांड व त्यांतील समस्त चिज्जड वस्तुमात्र हे सर्व त्या एकच अनंत शक्तिमान परमपुरुषाचें अवतार विग्रह आहेत हे तत्व तुम्ही आपल्या हृदयात धारण करा. आपल्या हृदयपटलावर या तत्वाचा कायमचा ठसा उमटावा आणि अशाप्रकारे समान भावनेनें प्रेरीत होऊन सर्व घट घटात व्यापक झालेल्या परमेश्वरास सदैव नमन करा. प्रत्येक घट मठाला वंदन केल्याशिवाय त्यातील व्यापलेल्या परमेश्वरास वंदन करता येणार नाही. म्हणून सर्वांशी वागतांना सदैव लीनतेचा अवलंब करा व सर्व भूत प्राणिमात्राला वंदन करा. अंतरातून कोणाचीहि निंदा वगैरे करुं नका. नुसता वाचेनेच नव्हे तर केवळ मनाने सुद्धा कोणाचा द्वेष, तिरस्कार, निंदा करुं नका. सर्वांच्या अंतर्यामि वसलेला आत्मा समान आहे; सर्व घटघटात सर्वत्र एकच स्वामी मालक आतमतत्वरपाने भरलेला आहे, अशा प्रकारे सर्वभूत प्राणिमात्रांच्या अंतर्बाह्य एकच परमेश्वर व्यापलेला आहे

हे जाणून तुम्ही त्या अनेकत्वात एकमेव परमेश्वराचे व्यापकत्व समजून त्या अनंताची भक्ति करा, तीच अनंत भक्ति होय. सद्गुरु महाराजांनी हे अशा प्रकारचें सर्वांना उजळून टाकणारे अनंत भक्तीचें तत्व प्रकाशित केलेले आहे. हे तत्व तुम्ही समजून घ्या व त्याप्रमाणे अंतर्बाह्य निर्मल व शुद्ध होऊन त्या अनंत शक्तिमान परब्रह्माची दृढभावाने भक्ति करा.

बाहर भीतर अेकज साई । भाई अंतर बुध राखो दिल माही ॥१॥
सब घट स्वामी ज्ञाने लहिये । अेक गुरुने शरणे रे रहिय ॥२॥
स्वानुभवी मुनी ज्ञानी महंत । संसारीने ते दुर्लभ संत ॥३॥
पूर्वे प्रीत जेणे नही होये । ज्ञानी पुरुष ना ओळखे सोये ॥३॥
प्रपंच माहे रहे जेनु मन । भाई अंतरमा तेने नही ज्ञान ॥५॥

संसारी तेणे कहो । जेनी प्रपंच उपर प्रीत ॥
अक्षतनें जे सत कहे । ज्ञानी तणी नही अे रीत ॥२७॥

भावार्थ,–

नायमात्मा प्रवचनेन लभ्यो न मेधया न बहुना श्रुतेन ।
यमेवैष वृणुते तेन लभ्यस्तस्यैष आत्मा विवृणुते तनूंस्वाम् ॥
कठोपनिषद् १।२।२३

आत्मा केवळ प्रवचनाने अथवा ग्रंथ संग्रह केल्याने, वाचन केल्यानें प्राप्त होत नाही, बुद्धिद्वारा अथवा बरेचसे ज्ञान ऐकल्यानेंसुद्धा उपलब्ध होत नाही, पण जो साधक प्रत्यक्ष चैतन्यरुप अनंत साक्षी सर्व व्याप्त अशा स्वरुपातून आत्मसाक्षात्कार रुपानें अनुभव घेतो त्यायोगे म्हणजे त्याच्या अनुसंधानानेच केवळ त्यास प्राप्त करवून घेता येते. त्याचे आत्मचैतन्य आपोआप–स्वयमेव स्वयंपूर्ण त्याच्या समोर प्रगट होत असते. अहो मुमुक्षु जीवात्म्यांनो!

आपल्या अंतरबाह्य एकमेव अद्वैत ब्रम्हाचे वास्तव्य आहे अशी ही बुद्धि तुम्ही आपल्या हृदयात बाळगा नुसतें वाचेनें बोलू नका तर आपलें अंतःकरण ज्यायोगे त्या तत्वाशी समरस होईल अशा बुद्धीचा तुम्ही अवलंब करा. सर्व प्राणिमात्रांच्या शरीरात तो ईश्वर ज्ञानरुपानें–चैतन्यरुपाने व्यापलेला आहे, म्हणून त्याला ज्ञानदृष्टीनेंच जाणता येते आणि ही गोष्ट सद्‌गुरुला शरण गेल्या शिवाय, सद्‌गुरुंची कृपा संपादन केल्याशिवाय साध्य होत नाही. जे संत, महंत, सत्पुरुष, ज्ञानी असून स्वानुभवीं असतात; ज्याला परम आत्मदर्शनाचें प्रत्यक्ष स्वानुभवजन्य ज्ञान प्राप्त झालेलें असते असे महात्मा पुरुष या संसारामध्ये–जगतामध्यें फारच फार दूर्लभ असतात. जे परम दयामय प्रभुच्या प्रेमनिधीच्या योगाने प्रेरीत होऊन पूर्ण प्रितीयमान झालेले असतात, म्हणजेच ज्याच्या हृदयात सदैव पूर्ण प्रेमाचा अखंड झरा वहात असतो असे प्रेमी जनच त्या महात्मा पुरुषांची ओळख–जाणिव करु शकतात. ज्यांचे मन पूर्ण प्रेममय श्रीहरीकडे धाव घेत नसून केवळ प्रापंचीक सांसरिक गोष्टीकडे–जगताच्या खोटया मिथ्या व्यवहाराकडेच अडकलेलें असते ते लोक संसारी होत. ज्याची प्रपंचावर–संसारावर-जगतावर नव्हे त्यातील असत्य भावावरच सदैव प्रीति असते ते संसारी जीवात्मे पामर होत. असत्य गोष्टींलाच ते सत्य मानीत असतात त्यांच्या दृष्टीकोनातून त्यांना असत्य ते सत्य व सत्य ते असत्य दिसत असते. ज्ञानी मनुष्याची ही रीत नव्हे, ज्ञानी पुरुष त्यालाच समजावे कीं, ज्याची सांसारिक मायिक व्यवहाराकडे प्रीति नसून एकमेव परमप्रेमस्वरुप प्रभुकडेच ती असते, असत्‌कडे नसून सत्‌कडे असते.

असतनें जो सतकरी ग्रहवे । तेणे हृदे अेक साई ना रहवे ॥१॥

सद्‌गुरु स्मरणे अर्थज सरीये । जनम मरण थकी ओधरीये ॥२॥
सर्वे शास्त्र कहे अेह भेव । चैतन्य पुरुष ते उत्तम ठेव ॥३॥
आत्मा जाणीने सर्वने नमीये । भाई अंतरमा साईसु स्मरीये ॥४॥
अंतर्दृष्टे जुवो अेकज स्वामी । बाहरवृष्टी जीव अनेक कामी ॥५॥

बाहर दृष्टी ना राखीये । अंतर्दृष्टीयें हरि जोय रे ॥
कृपा थाये सद्‌गुरु तणी । तो भीतर दर्शन होय रे ॥२८॥

भावार्थ :– मृगजलालाच जे पाणी समजून त्याच्या पाठीमागे धावतात त्यांचीं जशी स्थितीं होते तद्वतच नाशिवंत क्षणभंगुर जगतालाच पूर्ण व चिरस्थायी समजणाऱ्यांची स्थिती होतें. असत्यालाच जे सत् समजतात त्यांच्या हृदयातून परमेश्वराचा एकत्वभाव नाहीसा होतो. परमेश्वराचें ठायीं तशा लोकांना द्वैत दिसू लागते, म्हणून ते खऱ्या परमात्म स्वरुपास मुकतात–स्वस्वरुपानुसंधानापासून पराङ्‌मुख होतात. जन्म मरणरुप फेऱ्यातून आपली मुक्तता होणे हेच आपल्या जीवीत्वाचे साफल्य होय. आणि तसे झाले तरच सद्‌गुरु वचनाचे सार्थक झाले असे समजावे. सर्व धर्मशास्त्रे सांगतात कीं, सबंध वस्तू भूत प्राणिमात्रात परमेश्वराचे अस्तित्व आहे आणि उत्तम प्रकारची ठेव–अमुल्य हिरण्मय आत्मा–प्रत्येक प्राणिमात्राजवळ–चैतत्य रुपाने स्थित आहे. असे दृढ निश्चयाने जाणून सर्वांशी आत्मभावाने समभावाने वागून मनांत त्याच आत्मपुरुषाचें चिंतन करावयास हवे. बाह्य दृष्टीनें मानवाकडे पाहिल्यास प्रत्येक व्यवित व्यक्ति गणिक आचार वैचारिक भावना निरनिराळया असतात, कारण प्रत्येकाची अभिरुची, कामना, वासना, भावना, कल्पना ह्या भिन्न भिन्न स्वरुपाच्या असतात, परंतु बाह्य दृष्टीकोनातून हे वैचित्र्य जरि आपणास

जाणवत असले तरी सर्वांना प्रेरक असा अंतरात्मा, चैतन्यात्मा हा अंश रहित अेक असल्यामुळें अंतर्दृष्टीने आपण सर्व एक आहोत, ही अंतर्दृष्टी आपणास लाभली पाहिजे. बाह्यदृष्टीचा पडदा काढून आपण जर सर्वांकडे अंतर्दृष्टीने पाहिलें–सर्वांशी एकरुपतेने वागलो तर आपल्या जीवीताचें सार्थक तर होईलच, म्हणजे आपलें जन्ममरण रुप फेरे तर मिटतीलच, पण शिवाय अंतर्दृष्टी प्राप्त झाल्यामुळे आपणावर सद्‌गुरुची कृपा होईल व त्यायोगे आपणास अंतर्दर्शन–परमात्म दर्शनहि होईल. सद्‌गुरु कृपे वाचून मोक्ष नाही असे वेळोवेळी शास्त्र सांगत आलेले आहे सद्‌गुरुंची कृपादृष्टी होण्यास एकच साधन आहे ते म्हणजे त्यांच्या वचनानुकूल वागणे. त्यांच्या अमृततुल्य वचनाप्रमाण–आज्ञेप्रमाणें वागलों तर आपणास मोक्ष दुर्लभ नाही.

अंतर्दृष्टे दर्शन निरखो । बाहेर दृष्टे साई ना पेखे ॥१॥
गुरुनर घणु घणु कहे पुकारी । बाहेर दृष्टीथी रहिये वारी ॥२॥
अेक दृष्टी निरंतर धरीये । भाई अंतरथी द्वैत परहरीये ॥३॥
हरि ते हरनें हर ते हरि । वेद वचने वाणी ओचरी ॥४॥
अजीत ज्यारे अंगिकारज करऊ । हरि हर नाम ते तारे धरऊ ॥५॥

हरि हर नाम त्यारे धर्युं । करीयु अंगिकार अभेद ॥
हरि हरमा अंतर नही । अेम जाणो मुनिवरो भेद ॥२९॥

भावार्थ :– बाह्य दृष्टीने आपण जर परपेश्वरास शोधू लागलो तर प्रत्येक प्राणिमात्रांच्या भिन्न भिन्न आचारविचारांच्या मत प्रणालींमुळे आपणास तदंतर्गत परमेश्वराचें दर्शन घडणार नाही, परंतु जर आपण प्रत्येंकाकडे अंतर्दृष्टीने पाहूं लागलो, अंतर्मुख होऊन आपण प्रत्येक प्राणिमात्रांच्या चैतन्यरुप आत्मा-

रामाचीं जाणिव करुन घेऊ लागलो तर आपणास परमात्म दर्शन दुर्लभ नाही. अशा प्रकारचे वचन सद्‌गुरु महाराज वारंवार सांगत आलेले आहेत. त्याचा आपण आपलें मनाचें ठायीं निरंतर विचार करुन, बाह्य दृष्टीभेदाचा त्याग करुन, आपल्या मनातील द्वैत-भावना समूळ काढून टाकून सर्वांशी समानतेंने वागले पाहिजे. सर्वांना समभावानें वागविलें पाहिजे. परमेश्वर हा समस्त जड चेतन वस्तुमात्रात नटलेला आहे. सर्वांमध्यें उत्तम प्रकारचा खेळणारा असून, नाविन्यपूर्ण नाटचमय असून सुद्धा या जगन्नाटकापासून अतिविरक्त अतिशय भिन्न सुद्धा आहे. आणि हे सर्व चराचर जगत् त्यापासूनच उत्पन्न झालेले आहे. वेद वचन असे आहे की, परमेश्वर हा जगन्मय आहे आणि संपूर्ण जगत् हे परमेश्वर रुप आहे! हे तत्व जोपर्यंत आपल्या मनावर पूर्णपणें बींबलें नाही तोपर्यंत परमेश्वर आणि जगत हरि आणि हर यांतील भेद आपल्या मनातून मिटत नाही. त्या तत्वाचा जेव्हा आपण खोल विचार करुं तेव्हा आपणास खरोखरच प्रत्ययास येईल कीं, हरि आणि हर यांत कोणत्याहि प्रकारचं अंतर नाही. जोपर्यंत हा तात्विक भेद मिटत नाही तो पर्यंत हरि आणि हर यांतीस द्वैत आपल्या मनातून जाणार नाही म्हणून सर्वांच्या अगोदर आपण परमेश्वर आणि जगत् ह. भेद मिटवून समाजावून घेऊन ते तत्व धारण करावयला हवे आहे, त्या तत्वाचा अभेद्य असा अंगिकार करावयास हवा–भावपूर्ण स्वीकार करावयास हवा आहे.

हरि हर वच्चे कशो नही भेद। अेम बोले छे चारे वेद ॥१॥
नर नारी जे जगत सऊ अेह। भाई अंतरमा नही संदेह ॥२॥
नारायण नरने विसारे नही। नरनु मन ते नारायण सही ॥३॥
अेक आत्माने जुजवा रुप। आखर जोता अेकहि स्वरुप ॥४॥

ब्रम्हा विष्णु महेश्वर जाण । अे त्रण मुरत अेक हरी रे जाण ॥५॥

एक मुरत त्रण देव छे । अे कहिये एक समान ॥
त्रिगुण प्रतीते थाय छे । दृढ मन करी पछान॥३०॥

भावार्थ :- परमेश्वर आणि संपूर्ण प्राणिमात्र यांत आंतरीक दृष्टीने कोणत्याहि प्रकारचा भेद मानायला नको असे चारहि वेदादि सच्छास्त्रे सांगतात. स्त्री असो, पुरुष असो, पशु असो, पक्षी असो, सजीव अथवा निर्जीव असो संपूर्ण भूतप्राणिमात्रात 'सत्' व्यापलेले आहे यात कोणत्याहि प्रकारचा संदेह नाही. नारायण तोच नर व नर तो नारायण होय. नारायण नराला सोडून नाही आणि नराचे मन अंतरात्म नारायणाला सोडून नाही म्हणून म्हटलेले आहे कीं, 'नर करणी करे तो नरका नारायण बन जाय.' मनुष्य जर उत्तम रीतीनें, नितिनियम धर्माने वागू लागला तर तो परमेश्वर स्वरुपच होऊन जातो. उत्तम नितिनियम धर्म हे सबंध एका तत्वावर अवलंबून आहे ते तत्व म्हणजे 'सर्वं खल्विदं ब्रम्ह' हे होय. हे संपूर्ण चराचर जगत् ब्रम्ह स्वरूप आहे, संपूर्ण वस्तुमात्र ते सजीव असो वा निर्जीव, विनाशशील असो वा चिरस्थायी, ते कसेहि असले तरी ब्रम्हरुप आहे, अंतर स्वरुपानें एकरुप आहे, आत्मरुप आहे, अशा प्रकारची आपल्या मनाची दृढमूल भावना व्हावयास हवी, तशी स्थिति-गति जोपर्यंत होत नाही, तो पर्यंत आपल्या मनातून द्वैत भावना मिटून शकणार नाहीत. हे संपूर्ण जगत् एकाच महदात्म्यापासून निर्माण झालेले असल्यामुळ एकच आत्म्याचें हे वस्तुमात्र वेगवेगळे स्वरूप आहे, आणि जेव्हा या चराचर जगताचा नाश होईल तेव्हा सुद्धा या संपूर्ण वस्तूमात्राचा नाश होऊन-स्थित्यंतर होऊन ते सर्व एकमेव महदात्म्यात-पर-

मात्म्यात विलय पावणारे आहे असे वारंवार शास्त्रे सांगत आलेली आहेत. त्याचा आपण विचार करावयास हवा. ब्रह्मा विष्णू आणि महेश्वर हे त्याच एका आत्मस्वरूपाचें, परमात्म स्वरूपाचें अवतार विग्रह होंत. त्यांच्यातील आत्मतत्त्व जाणण्याची शक्ति प्रकर्षाने विकास पावल्यामुळे तें आपणास उच्चतम देवता स्वरूप भासतात त्या त्रिमुर्तिसुद्धा अंतर्स्वरूपानें एकच होत. 'त्रय मूर्ति एक देव:' हे शास्त्रवचन प्रसिद्धच आहे. या देवतांचे ठायी तीन वेगवेगळ्या प्रकारचे गुण प्रामुख्याने असल्यामुळें त्यांची कार्येहि मर्यादीतच आहेत ती म्हणजे जगताची उत्पत्ति, स्थिती व लय ही होत. जगताचा व्यापार व्यवस्थित चालावा म्हणून परमेश्वरानेच ही योजना केलेली असून त्याहून तो अगदी भिन्न अलिप्त राहिलेला आहे.

लख चौर्यायशी जे चारे खाण । एक स्वरुपथी सर्वे जाण ॥१॥
कारज कारन रुप उपसीयु । कारज माही ते कारन वसीयु ॥२॥
कनक कुंडल जल लहेरी जेम । ब्रह्ममाहे ब्रह्मांड छे तेम ॥३॥
तंतु विनारे पट ना होवे । पटमाहे ते तंतु समाये ॥४॥
तेम सर्वे उतपत जगदीश । सर्वे घटमाही एकज ईश ॥५॥

सब घट एक साई छे । एक अवेक जो सार ॥
सद्गुरु वचने ज्ञान कहुं । थोडा माहे अपार ॥३१॥

भावार्थ :– स्वेदज, जारज, ईंडज, उद्भीज या चार खाणीं मध्ये ज्या चौऱ्यायशीं लाख जीव योनी आहेत ते सर्व एकाच परमेश्वराच्या मूळ स्वरुपापासून उत्पन्न झालेले आहेत. तत्वदृष्टीनें पाहू गेल्यास त्या चौर्यायशी लाख जीवयोनी ज्याने निर्माण केल्या, ज्याच्यापासून त्या उत्पन्न झाल्या तोच परमेश्वर त्याच जीवयोनीत

चैतन्यात्मरुपानें सामावलेला आहे. कार्य आणि कारणभाव एकरुप झालेले आहेत. कार्यांमध्येच कारण सामावलेले आहे. ते कसे? सुवर्णांपासून कुंडलादि अनेक अलंकार निर्माण होतात, म्हणजे कुंडलादि अलंकारात एकमेव सोनेच सार्मावलेले असते. सारांश असा की, व्यवहार दृष्टचा त्याची समजूत होण्याकरितां कुंडलादि नांवे दिलेलीं असतात परंतु अंतर्स्वरुपाने, कारणरुपाने पाहू गेल्यास सर्व अलंकारात सुवर्ण हा एकच धातू व्यापलेला असतो. तसेच समुद्रात पाण्याशिवाय लाटा उत्पन्न होऊ शकत नाही. आणि त्या लाटा म्हणजेच पाणी होय. हवेच्या योगाने पाण्याचा लोड झाला म्हणजे तरंग किंवा वलय निर्माण होतात व त्यालाच हवेचा जोराने धक्का बसल्यास विकराळ लाटात त्याचे रुपांतर होते पण अंतर्स्वरुपाने ते पाणीच असते. तद्वतच तंतू शिवाय वस्त्र निर्माण होऊ शकत नाही, आणि वस्त्र हे तंतूशिवाय अन्य नाही. अनंत आडव्या उभ्या धाग्यांनी विणून जी वस्तू तयार होते तेच वस्त्र होय. त्याचप्रमाणें ब्रह्मापासून या अखिल ब्रह्मांडाची उत्पत्ति होते आणि या अखिल ब्रह्मांडांत तेच सनातन ब्रह्म सामावलेले आहे. अशा प्रकारे या जगताची उत्पत्ति एकमेव जगदीश–महत् प्रभू पासून झालेली असून तोच परमेश्वर जगदीश प्रत्येक वस्तु प्राणिमात्रांत प्राणरुपाने व्यापलेला आहे. तो जगदीश कार्य रुपाने निर्मीलेल्या प्राणिमात्रात कारणरुपानें स्थिरावलेला आहे. एक असून अनेक रूपात नटलेला आहे व परत एकच एक पूर्णरूपाने शिल्लक राहिलेला आहे, म्हणजे या जगत्‌रूप जंजाळापासून पूर्ण अलिप्तहि आहे. अशा प्रकारे हे सद्‌गुरुवचन अगदीं संक्षिप्त आहे परंतु अर्थ कीति व्यापक स्वरूपाचा आहे त्याचा विचार सूज्ञांनी करून घ्यावा.

थोडामाहे प्रबोध छे घणो । निंदा ना कीजे कोयेज तनी ॥१॥
सर्वे सृष्टीने प्रणाम ज करीये । सद्गुरु वचन हिरदामा धरीये ॥२॥
शुद्ध स्मरण हृद्यमा राखो । गयेला थइने का जेम तेम दाखो ॥३॥
जेम तेम दाखे अरथ ना सरीये । काचें कुंमे नीर ना भरीये ॥४॥
शास्त्र भणता जो आवीयु ज्ञान । वळी विशेषे आवीयु अभिमान ॥५॥

अभिमान तजो मुनिवरो । सद्गुरु पारस पिछान ॥
हिरे हिरो विंधीये । ते हरि पारस करी जान ॥३२॥

भावार्थ :– सद्गुरु महाराजांनी अतिशय थोडक्यात परंतु महान प्रबोध युक्त ज्ञान सांगितलेले आहे ते असे, कोणाचीहि निंदा करूं नये. सर्व प्राणिमात्र एकरूप, आत्मरूप, समरूप असल्यामुळे दुसऱ्यांची निंदा ती आपलीच निंदा केली जाईल म्हणून कटाक्षाने ती टाळावी. सर्व सृष्टीला प्रणाम करावा. म्हणजे सृष्टीतील जेवढे चेतन अथवा जड वस्तु प्राणिमात्र आहे तेवढ्या सर्वात परमेश्वराचे अस्तित्व समानच आहे म्हणून आपण व अन्य अथवा सजिव व निर्जिव असाही भेद करूं नये. सद्गुरुंनी जे वेद वचन सांगितलेले आहे नीतिनियम कथन केलेले आहेत ते आपल्या हृदयात दृढतेने धारण करावे, आणि त्या तत्वांचे स्मरण चिंतन सतत आपल्या हृदयात करून त्यानुरूप वागलें पाहिजे. सद्गुरू महाराजांनी अथवा अन्य शास्त्र ग्रंथकारांनी केलेली नीतिवचनें, बोधवचनें माहित असून सुद्धा जो गुंगीसाधुपणाने अज्ञानपणाचे प्रदर्शन करून म्हणतो कीं, 'आपल्याला तर काहीच माहित नाही बुवा! आम्ही तर अज्ञानीच आहोत'. अशा प्रकारे अज्ञानपणाचें पांघरूण घेतल्यामुळे–वेडगळ अज्ञानी अवडंबरामुळे लवकरच त्याचा विनाश होतो. तुम्ही लोकांना जरी तुमचा अज्ञान-

पणा भासविला तरीपण त्यात तुमचाच अधःपात आहे. साध्या मानवी कोर्टीत नैतिक अपराधाबद्दल मला माहित नाही ही खोटी सबब चालू शकत नाही तर अति उच्चतम अशा परमेश्वरी कोर्टीत तो सबब कशीं बरे चालू शकेल? मनुष्य हा बुद्धिजीवी प्राणि असल्यामुळे सर्व क्षेत्रात त्यांची बुद्धि चालू शकते. 'नर करणी करे तो नरका नारायण बन जाता है।' परंतु त्याने जर आपलें अवगुण्य लपविण्याकरितां असा वरील प्रकारचा गुंगी-साधुपणा केला तर त्याच्याने त्याचा बचाव तर नव्हेच अधः-पातच होत असतो. मातीच्या कच्च्या मडक्यात–न भाजले गेलेल्या भांड्यात जर पाणी ओतले तर त्यांत पाण्याचा एक थेंबहि राहू शकत नाही, सर्व पाणी ताबडतोब झिरपून जाईल अगर पाण्याच्या योगाने भांड्याची मातीच वीरुन जाईल म्हणून आपण मातींच्या कच्च्या भांड्याप्रमाणें राहू नये. अज्ञानपणात राहून आपला सर्व-नाश करुन घेऊं नये. पक्क्या भांड्याप्रमाणें होऊन कसणीरुपी अग्नीच्या भट्टीत तापले गेलो पाहिजे म्हणजे आपल्या भांड्यात–मडक्यात ज्ञानरुपी पाणी साठूं शकेल, मात्र ज्ञान संपादन करुन त्यापासून निर्माण होणाऱ्या महद् धोक्यापासून आपण बचावलो पाहिजे. तो धोका म्हणजे अभिमान–ज्ञानाचा अहंकार. विशेषतः शास्त्रवाचून ज्यांना ज्ञान प्राप्त होते त्यांना विशेषेकरुन अभि-मान–अहंकारांचा धोका निर्माण होतोच. फार क्वचित् विरळाच्र एखादा निरहंकारीं राहू शकतो. काजळाच्या कोठडीत एखादाच डाग लागल्याशिवाय राहू शकतो. सद्‌गुरु महाराज सांगतात कीं, अहो मुनिवर गण हो! तुम्ही ज्ञानाच्या मार्गातील हा अहंकार रुपी महान् धोका टाळून ज्ञान संपादन करा आणि स्वानुभव व कसणी रुप भट्टीतून चांगले तावून सुलावून पक्के म्हणजे पवित्र व दिव्यज्ञान संपन्न होऊन बाहेर पडा. हिऱ्यासारखे टणक व्हा

हिऱ्यासारखे मौल्यवान व्हा. हिरा एवढा कठिण-मजबूत असतो कीं ऐरणीवर ठेऊन त्यावर जर घणाचा घाव मारला तर तो न दुभंगता उलट ऐरणीमध्यें रुतला जातो. अशीच तुमची स्थिती झाली पाहिजे. हिऱ्याला जर छेदायचे असेल तर दुसऱ्या हिऱ्यानेच तो छेदला जातो. तद्वत परमेश्वर रूपी हिऱ्याला जर छेदायचें असेल-भेद करायचा असेल-शोध करायचा असेल तर आपणाला सुद्धा हिराच व्हावे लागेल तेंव्हांच आपणास परमात्म तत्व जाणण्याचें ज्ञान होऊ शकेल याकरितां प्रथम आपण सद्गुरुचें पाय धरावयास हवे आहे त्यांनी उपदेशिलेल्या तत्वांचे आचरण करावयास हवे आहे. तेव्हाच परमेश्वर रूपी चिन्मय स्पर्शमण्याची आपणास प्राप्ती होईल.

धर्मीयु सोनु वही करी जाये । भाई अंतरमो कोई ना पाये ॥१॥
सद्गुरु ज्ञाननो भेद लइयें । करम फळने वळगी ना रहिये ॥२॥
भेद न जाणे सद्गुरुनो सार । खर पर चंदन वहे जेम भार ॥३॥
आहार निद्रानें भय मैथुन । सर्वे देहीने जाणो सरखा जन ॥४॥
मनखा देहीने ज अदकु ज्ञान । ज्ञान नही ते पशु समान ॥५॥

ज्ञान समजोरे मुनिवरो । स्थिर कारवाने मन ॥
स्थिर मने मुगती मळे । सुणो मुनिवर जन ॥॥३३॥

भावार्थ :- खऱ्या सोन्याचीं कसोटी हीच आहे कीं ते जर भट्टीत टाकले तर त्याला अधिकाधिक तेज चढतें, त्या उलट त्याच्या सम वर्ण असलेले पितळ मात्र अग्नीत टाकलें तर काळे कुट्ठ होते. यावरून ज्याचें मन निर्मळ आहे अशा सन्मार्गी मनुष्यावर संकट, दूःख, क्लेश वगैरेचा डोंगर जरी कोसळला तरी तो त्याला न डगमगता धैर्याने तोंड देऊ शकतो-कसोटीतून

निर्भयतेंने निःसंशय पार उतरू शकतो, पण मुळचाच ज्यांच्या मनात संदेह आहे, शंका कुशंका अविश्वास आहे त्याची पितळासारखी नव्हे त्यापेक्षा निकृष्ट गति होईल. याकरिता मनाची विपरीत मति सोडून आपण सद्गुरुंनी कथन केलेल्या ज्ञानाचा भेद घेतला पाहिजे. केवळ कर्म फळाला चिकटून राहता कामा नये. 'माझ्या कर्मांत जसे असेल तसे होईल, त्याला काय इलाज आहे' या सारख्या भोळसर व कर्तृत्वहीन वचनांचा अवलंब केल्याने आपली कोणत्याही प्रकारची कार्यसिद्धि होणार नाही. याकरितां आपण सद्गुरु वचनाचा भेद घ्यायला हवा आहे म्हणजे त्यांच्या तत्ववचनांचा अर्थ नीट समजून घेऊन त्याप्रमाणें आचरण करावयास हवे आहे. तसे जर झाले नाही तर गाढवाच्या पाठीवर चंदनाचे ओझे वाहण्यासारखेच होय. आपण क्षुल्लक व्यवहारात म्हणतो कीं, 'गाढवाला गुळाचीं चव काय?' तद्वतच तत्ववचनांचा नुसता पोपटपंची सारखा पाढा वाचल्याने अथवा पंडित सभा जिंकल्याने का त्या ज्ञानाचा भेद होणार आहे? नव्हेच, ते वचन जेंव्हा आपल्या मनात चांगल्या रीतीने भेदलें जाईल, भिनले जाईल व जेंव्हा ते आपल्या आचरणात प्रत्यक्ष उतरेल तेंव्हाच त्या वचनास भेदता येईल-जाणता येईल. आहार, निद्रा, भय व मैथून हे चारहि सजीव प्राणिमात्रांना सारखेच आहे. त्यात कोणत्याहि प्रकारचा भेद नाही. फक्त मानव प्राण्यास सर्वापेक्षा ज्ञान हे अधिक असल्यामुळे त्या ज्ञानाचा उपयोग चांगल्या रीतीने करुन घेऊन मानवानें आपल्या मनाचा विकास करावा आणि ज्ञान व मन यांच्या समन्वयाने मानवजन्माचें अन्तिम ध्येय जे मोक्षपद तें गाठण्याचा प्रयत्न करावा. एवढ्याकरिताच मानवाला ही ज्ञानाची देणगी मिळालेली आहे. ज्याला ज्ञान असून नसल्यासारखे आहे म्हणजे जो मानव ज्ञानाचा योग्य उपयोग करु शकत

नाहीं तो पशु समानच होय. या करिता मुनिवर हो! तुम्हास प्राप्त झालेले ज्ञान योग्य प्रकारे समजावून घ्या. नसेल प्राप्त झाले तर योग्य व्यक्तीकडून मिळविण्याचा प्रयत्न करा. कारण ज्ञानाच्या योगानें मनाचा विकास होऊन ते शांत व स्थिर होते. त्याला अधिकाधिक स्थिर करण्याचा अभ्यास करा व मोक्षसाधन साध्य करुन घ्या. हा ज्ञानाचा सार होय.

अेवुं जाणीनें तमे चेतो जन । ज्ञान तणो तमे करो जतन ॥१॥
ब्रम्हज्ञान वना छुटवो नही । मुनिवर अंतरमा राखो सही ॥२॥
वाद विवादनें विषय सर्वे तजीये । एक चित्ते गुरु नरनें भजीये ॥३॥
जो मन तजीये ममता अभिमान । तो दल आवे ब्रम्हज्ञान ॥४॥
जहालगी हुं हुं ममतानो लेश । ताहा लगी भोगवे मन काया क्लेश॥५॥

काया क्लेश ना कीजियें । निर्मल कीजे देह ॥
वासना सर्वे छोडीये । अेक सृजन साथे नेंह ॥३४॥

भावार्थ :- अशा प्रकारे ज्ञान समजावून घेऊन हे मुनिवरा, त्याप्रमाणें आपल्या मनास चेतना देऊन–जागृति देऊन वागण्याचा प्रयत्न कर आणि त्यायोगे ज्ञानाचे जतन कर. परमोच्च ज्ञानाची जोपासना करण्याकरिता ते आत्मसातच केले पाहिजे. नाहीतर वरपांगी मिळविलेलें ज्ञान कांहीहि उपयोगाचे नाही. कारण तशा ज्ञानाने अथवा नुसती पोपटपंची केल्यानें आत्म्याची ओळख जेथे होत नाही तेथे आत्मसाक्षात्कार कसा होईल? ह्या सर्व गोष्टी ब्रह्मज्ञानावर अवलंबून असल्या मुळे ब्रह्मज्ञान संपादन करुन आणि त्याप्रमाणें प्रत्यक्ष वागून आत्मब्रह्याची जाणिव आपल्या हृदयात ठेवून आणि सर्व दूर त्याच आपल्या व्यापकता जाणून सर्वांशी नम्रतेने, अभिमानरहित लीनतेने वागावे तेव्हाच आपणास आत्म-

साक्षात्कार होईल, तेच परमात्मदर्शन होय. ते झाल्याशिवाय आपली लक्षचौऱ्यायशीच्या फेऱ्यातून मुक्तता होणे अशक्य. ब्रम्हज्ञान प्राप्तिकरितां सद्‌गुरु महाराजांनी कांही साधने सांगितलेली आहेत ती थोडक्यात अशी कीं ज्यांना ब्रम्हत्वप्राप्तीची जिज्ञासा आहे त्यांनी वादविवादात म्हणजे मत मतांतराच्या झगड्यात पडू नये. कारण जो मनुष्य ज्ञान पांडित्याच्या अभिमानाने वाद विवादात पडतो त्याचे मन अत्यंत संशयी व अस्थिर बनल्यामुळे तो त्यातच गोते खात बसतो. दुसरी गोष्ट म्हणजे सर्व प्रकारचे विषय म्हणजे पंचेन्द्रियांचे जे निरनिराळे विषय आहेत त्या सर्वांचा त्याग करावा म्हणजे त्या विषय सेवनापासून व त्याच्या आसक्तीपासून हळू हळू निवृत्त होत जावे. एकचित्ताने गुरुचे आणि परमेश्वराचें पूजन नामस्मरण करावे आणि सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे 'निर्मांगमोह' वृत्ति प्रत्येक साधकाची झाली पाहिजे. जर आपण आपल्या मनातून ममत्व व अभिमान यांचा समूळ नाश केला तरच आपणास ब्रम्हज्ञान प्राप्ती होऊ शकेल. जोपर्यंत आपणाजवळ मी मी असा ममत्वाचा अंश आहे; मी सर्वांत शहाणा, मी सर्वात मोठा, मलाच सर्व काही समजते, मी ही एवढी मोठी संपत्ति मिळविली, मी आहे म्हणूनच हे सर्व कांही आहे अशा प्रकारचे हे मी मी चे ममत्व जोपर्यंत मनुष्याच्या मनातून गेले नाही तो पर्यंत हे मन कायाक्लेश भोगीत असतं. उदा. एखाद्याने जर एखाद्या भारी किंमतीच्या–मौल्यवान वस्तुबद्दल ममत्व बाळगले आणि दुसऱ्याने तीच वस्तु पळवून नेली तर त्या ममत्ववादी मनुष्यास केवढे बरे दुःख होते, आणि त्या वस्तुस शोधण्यास त्यास कीती अपरंपार कष्ट होतात हे आपण बघतोच आणि त्याने जर त्या वस्तु-विषयीचे ममत्व सोडले म्हणजे ती वस्तु माझी नव्हती. ती जरी

मौल्यवान असली तरी आपला व तिचा संबंध काय, ज्याची होती त्याने नेंली. जो पर्यंत आपला ऋणानुबंध त्या वस्तुशीं होता तो पर्यंत तीं आपली होती. ऋणानुबंध तुटला. आपलें त्या वस्तुशीं नाते तुटले आता ज्याच्याशी तिचा ऋणानुबंध असेल त्याच्या जवळ ती असेल. अशा प्रकारची ममत्व रहित बुद्धि त्या मनुष्याची झाली तर त्या वस्तुच्या शोधात त्याला कशाला दु:ख व कष्ट होतील? या करितां मनाच्या संगतीनें आपल्या कायेस व्यर्थ दु:ख कष्ट न देता ममत्वाचा त्याग करा. नियमादिकांच्या आचरणाने आपला देह अंतर्बाह्य निर्मल करा–शुद्ध करा. सर्व वासनांचा त्याग करा. सर्व करुन जर वासनांचा त्याग झाला नाही तर वासनेच्या संगे जन्म घ्यावा लागेल व परत अनंत दु:खांचा डोंगर उचलावा लागेल त्या करिता या वासनेला सुद्धां तिलांजलि देऊन मन एकाग्र करुन-एकचित्त करुन सर्वांचा उत्पत्तिकर्ता व पालनकर्ता जो परब्रह्म परमेश्वर–सृजनहार–त्याच्याशी अपार प्रेम भावाने ध्यान लावा.

वासना सर्वे ज्यारे गले । अंतरमाही तो बंधन टले ॥१॥
सत् संगते थाये वासनाभंग । हरि चरणे जो लागे रंग ॥२॥
सद्गुरु क्रियानी जाणो जुगती । हरि चिंते आवे जीवने मुगती ॥३॥
सद्गुरु क्रिया सतशास्त्र होवे । सत्शास्त्री ते हरिजन जोवे ॥४॥
साचा हरिजन कहिये तेणे । भाई अंतरमां परमार्थी होये ॥५॥

परमार्थे बुद्धि राखीये । तो चित्ते आवे ज्ञान रे ॥
चित्त चोखा चन्दन करो । तो टळे मोह अज्ञानरे ॥३५॥

भावार्थ :– ज्यावेळेस आपल्या सर्व आशा, इच्छा, वासना ह्या संपूर्ण गळून जाताल त्यावेळेस आपल्या मनाचे बंधन खुलें

होईल. मनाचे बंधन खुलणे म्हणजे मनात निरंतर वास करणाऱ्या आशा आकांक्षा व षड्रिपु या सर्वांचा मनातून समूळ नाश होणें होय. त्यांचाच नाश झाला म्हणजे अनायासेच वासनांचा क्षय होतो, आणि मनाचे बंधन खुलण्याचें एक प्रमुख साधन आहे सत्संगति. सत्यवान्, पुण्यवान् लोकांच्या संगतीमुळे आपलें मानसिक विकार जे बळावलेले असतात ते हळू हळू क्षीण होऊं लागतात आणि मग त्याच्या ज्या आशा, आकांक्षा, आसना, वासना असतात, त्यांचा सुद्धा हळु हळु लय होत जातो. अशा रीतींने वासनांचा क्षय झाला म्हणजे प्रभु चरणांशी त्याचा रंग लागतो तो प्रभु-भजनात व चिंतनांत दंग होतो. सद्गुरुंनी सांगितलेल्या क्रिया-चरणाची युक्ति त्याला समजते म्हणजे त्याप्रमाणे तो वागू लागतो आणि परमेश्वराच्या चिंतनानें तो मुक्तिफल मिळवू शकतो. सद्गुरुंनी उपदेशिलेले नियमादिक हे सत्शास्त्रच होत. सत्शास्त्र याचा अर्थच मूळ असा आहे की, जे असत्कडून सत्कडे घेऊन जातें ते अथवा परब्रम्ह परमात्म्याचें प्रत्यक्ष दर्शन घडावे म्हणून ज्या मार्गाची वाटचाल जीवात्म्याने करावी त्या मार्गाचे मार्ग-दर्शन ज्यात आहे अशा नियमादिकांनीं जे युक्त आहे ते सच्छास्त्र होय. हे नीतिनियम ज्यांनी आचरणात आणले आहेत—ही नैतिक मुल्यें ज्यांनी चांगल्याप्रकारे सांभाळली आहेत अशा प्रकारचे सच्छास्त्री—हरिभक्तजन हे परमेश्वर रुप होत. खरा हरिभक्त सद्भक्त तोच जाणावा की जो अंतरातून परमार्थी असतो मूळातूनच जे परमार्थी वृत्तीचे आहेत आणि ज्याच्या मनावर वैराग्ययुक्त परमार्थ वृत्तीचे आघात झालेले आहेत, अशा सद्भक्त जनांचीच बुद्धि परमार्थावर स्थिर होते आणि त्यांच्याच हृदयांतून अखंड ज्ञानाचा झरा वाहू लागतो. त्याचे चित्त निर्मल आणि चंदनासारखे शीतल होते. त्याच्या मनातून द्वेष, तिरस्कार, राग

कायमचे निघून जावून ज्ञानामृताच्या योगाने चित्त निर्मळ, शीतल व स्थिर बनते. त्याला मग षड्रिपु जिंकू शकत नाहीं किंवा अज्ञान मोह पाडू शकत नाही. त्याचे अज्ञान संमोह वगैरे सर्व कायमचे विराम पावतात.

परमार्थी सद्गुरु ज्यारे मलीये । तारे जीवन संकट टळीये ॥१॥
संकट टळे न समजी रहे मन । ते ना करे विषयनु चिंतन ॥२॥
विषय तनो चिंतन छे जेने । दुःखनी निवृत्ती ना होवे तेहेनी ॥३॥
दुःख परवरती नरक तेणे जाण । विषय साथे वैराग्य ज जाण ॥४॥
विषय साथे वैराग्य छे जेणे । जीवता मुगत कहिये रे तेणे ॥५॥

जीवता मुगत होई रहो । विषय तजो विकार रे ॥
जो मन खेलो मोकलो । तो ठरी ना बैसो ठामरे ॥३६॥

भावार्थ :– ज्या जीवात्म्याला परमार्थ मार्गाचे दर्शन करविणाऱ्या सद्गुरुंची प्राप्ती झाली त्या जीवाचें जन्म–मरणरूप संकट टळले असे समजा. कारण तशा सद्गुरुंच्या–सत्पुरुषांच्या सतत संगतीच्या योयाने त्या जीवात्म्याचें मन अन्तर्मुख होते. मन अंतर्मुख झाले म्हणजे ते बाह्य विषयांचे चिंतन करण्यास असमर्थ होतें म्हणजे शब्द, स्पर्श, रूप, रस गंधादि पंचविषयाविषयीं मन उदासीन–परावृत्त होते व अनायासेच त्या जीवात्म्यावरील महादापत्ति नाहीशी होते. जोंपर्यंत जीवात्म्याच्या मनात विषयांच्या विषयाचे चिंतन चालू असते तो पर्यंत तो जीवात्मा दूःखरुप गर्गेतून निवृत्त होऊ शकत नाही. विषयादिकांचे सेवन केल्याने जीवात्म्यास क्षणिक सुखाचा लाभ जरी भासत असला तरीपण तें सुख तर नव्हेच केवळ दुःखाची–संकटांची परंपरा होय. एक संकट संपते न संपते ताच विषयांच्या सतत चिंतनांमुळें दुसरे

दुःख त्यावर कोसळते ते आटोपते न आटोपते तोवर तिसरे, चौथे अशी अनंत संकटे त्यावर येऊन अखेर त्यातच त्याचा अंत होऊन तो जीव नरक यातना भोगीत असतो. म्हणून जीवात्म्याने शक्य तो विषय सुखाच्या पाठिमागे लागू नये. विषयाविषयी वैराग्य धारण करावे. संसारकार्य चालविण्याकरितां 'विषय' हे जरी एक अंग असलें तरी त्याचा अतिरेक न करता त्याविषयी वैराग्य विरक्तता धारण करणें हे संसारी जीवाचे कर्तव्य होय, आता विरक्तता म्हणजे त्याग–सर्वस्वाचा त्याग असा अर्थ येथे अभिप्रेत नाही तर त्या विषयांच्या चिंतनाविषयीं–ते विषय सतत आपणास उपभोगावयास मिळावे अशा विषय लोलुपतेविषयी विराग धारण करणे–म्हणजे विषयांचे आपल्या मनात चिंतन न करणे हे वैराग्य होय. चित्तवृत्तींचा निरोध म्हणजेच विषय चिंतनाचा त्याग हाच खरोखर जीवन्मुक्तपणा होय. जीवन्मुक्तपणाचें हे एक प्रमुख लक्षण आहे कीं, जे जीवन जगत असून मेलेल्या मनुष्याप्रमाणे विषय सुखाच्या चिंतनाचा त्याग करतात म्हणजे विषयविकारांच्या आहारीं न जाता–स्वतःस त्यात बध्द न करता ते विषय विकार आपल्या स्वाधिन करतात–त्यांना ताब्यात ठेवतात तेच खरोखर जीवन्त असून मुक्त होत. जोपर्यंत आपल्या मनातून विषय–विकार, राग, द्वेष, तिरस्कार आदि निघालें नाहीत–मन मोकळे झाले नाही–मनाचे बंधन खुले झालें नाही तोपर्यंत आपणास स्थिरता लाभ–णार नाही. या करितां आपल्या मनाचे खेळ बंद करा-मनाचे चाळे बंद करा म्हणजे आपणास स्थिरता-शांति लाभण्याची शक्यता आहे.

विषय साथे मन जहालगी होवे । ठरी ठाम ना बंसे कोये ।।१।।
सर्वे धरममाहे सत् दरशन निष्काम । कुळनी क्रियाये ना मळे साम।।२।।

साचु साधन एक वैरागे । मुनिवर अंतरमा परगट वन मागे ॥३॥
ज्या वैराग ताहा रिध सिध । जाहा वैराग ताहा नवनीध ॥४॥
सफल पदारथ वैराग्य जाण । भाई अंतर ते साधन परमाण ॥५॥

साधन करो वैराग्यना । तो सफल पदारथ होय रे ॥
वन वैराग्य मानवी । अरथ ना सरीये कोय रे ॥३८॥

भावार्थ :- जो पर्यंत मन विषयांच्या चिंतनात गढलेंले असतें तो पर्यंत ते स्थिर होऊ शकत नाही. जस जसे ते त्या विषयांच्या अधिकाधिक चिंतनात पडते तसतसे त्याचे चांचल्य वाढून त्याची अस्थिरता बळावू लागते.

सर्व धर्म मार्गात सत्‌दर्शन म्हणजे निष्काम कर्मयोगाचरण हे सर्वश्रेष्ठ आहे. कोणत्याही प्रकारची फलाकांक्षा न बाळगता सदैव निरिच्छ, निर्मम, निरहंकार बुद्धीने कार्यरत राहून ईश्वरानुसंधान करणें हे निष्काम कर्माचरण होय. केवळ लोकहितार्थ-लोकसंग्रहार्थ कर्म करणे म्हणजे सामान्य बुद्धि-जीवात्म्यांना सदाचरणाचें मार्गदर्शन करण्याकरितां आदर्श जीवन जगणे हे ज्ञानी मनुष्याचें कर्तव्य असत. या उलट कर्म मार्गाच्या सकाम कर्माचरणानें-कर्मफलेच्छा मनी बाळगून केवळ ऐहिक सौख्यशांति प्रित्यर्थ कर्मानुष्ठान करणाऱ्या जीवात्म्यास इच्छित सिद्धि प्राप्त होते; पण मुक्तीमार्गापासून तो पराङ्‌मुखच राहातो. म्हणून आपण तशा असत्‌दर्शनापासून दूर राहून निष्कामतेच्या सत्-दर्शनाचा अवलंब करावा, तेव्हाच आपल्याला ऐहिक व पारलौकिक सौख्य शांति लाभेल. चित्ताला साम म्हणजे शांति मिळण्याचें एक प्रमुख साधन आहे 'वैराग्य'. हे वैराग्य रुप साधन परमेश्वराने अगोदरच सर्व मानव प्राण्यांच्या हृदयात निर्माण केलेले आहे. त्याला कोणाकडून मागवून आणण्याची

जरुरी नाही व ते कोठे मिळतहि नाही. प्रसंगानुरोधानेच मात्र ते प्रगट होत असते. ज्या प्रमाणे चकमकीत सुप्त स्थितीत असलेला अग्नि (गारेचे दगड) चाप ओढताच प्रज्वलित होतो, तद्वतच मानवी मनावर संकटांचें, दुःखांचे आघात झाल्यावर वैराग्य प्रज्वलित होऊ शकते. हे वैराग्य कायमचे प्रज्वलित ठेवणे न ठवणे हे फक्त ज्या त्या जीवात्म्याच्या मनावरच अवलंबून असते. हे वैराग्य मनाचे ठायी दृढमूल झाल्याशिवाय मन विषयापासून परावृत्त होत नाही व ते दृढमूल होण्यास एक सारखा वैराग्यपर विचारांचा ध्यास मनात लावावयास हवा. वैराग्य जर सर्वांजवळ परमेश्वराने दिलेले आहे असे म्हटलें तर सर्व जण विरक्त कां होऊ शकत नाही? अशी शंका आपणास येईल. खरे पाहतां ज्ञानाप्रमाणें वैराग्य हे सुद्धा मानवी मनात नित्य वसलेले आहे पण त्यावर जे अज्ञानाचें, मायाविकारांचे आवरण पसरलेले असते ते दूर झाले म्हणजे अनायासेच ते प्रगट होते. ज्याने ते प्रगट केले, आकारात–आचरणात आणलें तोच मनुष्य विरक्त होऊ शकतो बाकिच्यांचे वैराग्य मनातल्या मनात कूजत असते सूप्त असते. माया, काम, क्रोध आदि विकारांनी ते झाकळलेले असते. जेथे वैराग्य प्रगट झाले तेथे ऋद्धि सिद्धि ह्या दासी झालल्या असतात, तेथे नवनिधींचे सतत वास्तव्य असत, एवढेच काय जेथे वैराग्य आहे तेथे सर्व काही आहे. कारण सर्व गोष्टींविषयी त्या मनुष्याच्या मनात विरक्तता असल्यानें तो त्या सर्वांस क्षणिक मानून त्यांचाच काय पण सर्वस्वाचा त्याग करून परमशांतीचा लाभ घडवितो. याकरितां हे मानवा! परम शांतीचा लाभ करवून घ्यायचा असेल तर वैराग्याची कास धरा. वैराग्य अंगी बाणविल्याशिवाय–मनाचे ठायी वैराग्य प्रगटविल्याशिवाय तुझे कोणतेच कार्य सिद्धीस जाणार नाही, याकरितां वैराग्याचे साधन

आत्मसात करा. वैराग्य परिपूर्ण अंगी बाणविण्याचा प्रयत्न करा.

वन वैराग्ये अरथ ना सरीये । वन वैराग्ये मन भटकत फरीये ॥१॥
वन वैराग्ये ना गले अभिमान । वन वैराग्ये ना मले निज ज्ञान ॥२॥
विवेक विचार वैराग्य ने ध्यान । सकल पदारथ ओ चारे मान ॥३॥
चारे वायेक हृदयमा धरीये । मुनिवर अंतरमो हरीने वरीये ॥४॥
सर्वे साधनमा मुख्य विवेक । जेथी टळीये अज्ञान अनेक ॥५॥

अज्ञान टले सत्ज्ञानथी । मन पामे अविचल ठाम रे ॥
तेणे ना उपजे औरथी । काम क्रोधने अहंकार रे ॥३८॥

भावार्थ :– वैराग्याशिवाय मानवा तुझे कोणतेहि कार्य सिद्धीस जाणार नाही. वैराग्याशिवाय तुझे मन दहाहि दिशेस भटकत फिरेल पण त्याला शांति मिळणार नाही. वैराग्याशिवाय तुझा अभिमान–ज्ञानाचा, धनाचा, मानाचा, संततीचा, संपत्तीचा अहंकार मावळू शकणार नाही. वैराग्याशिवाय तुला निजात्म स्वरुपाचें ज्ञान होऊ शकणार नाही–आपण कोण, कोठून आलो, कशाकरितां आलो आणि हा क्षणिक जीवनक्रम संपवून आपणास कोठे जावे लागेल? या विषयींचे जे ज्ञान ते आत्मज्ञान आपणास वैराग्य प्राप्त केल्याशिवाय होऊच शकणार नाही. आत्मज्ञान प्राप्तीचे वैराग्यसहित चार प्रमुख साधने आहेत त्यापैकी पहिलें 'विवेक' म्हणजे खाद्याखाद्य पेयापेय या विषयींचा समाचार. जे अखाद्य, अपेय पदार्थ असतील तामस व राजसी गुणांनी युक्त, क्रूरता व मादकता आणणारे असेल असे अशुद्ध व गलिच्छ अन्न व पेय सेवन न करता सात्त्विक व युक्त आहारांचें सेवन करणे हे पहिलें साधन होय. यामुळे चित्तास स्थिरता लाभते. दुसरे साधन आहे 'विचार' नित्यानित्य वस्तूंचा विचार करुन अनित्य वस्तूंचा

म्हणजे कुड, कपट, दंभ, अज्ञान यांचा त्याग करणे व नित्य वस्तूंचा म्हणजे सत्य, क्षमा, संतोष यांचा अवलंब करणे यास विचार असे म्हटलेले आहे. तिसरे साधन 'वैराग्य' जगातील दृश्य वस्तु ह्या नाशिवंत असल्याने त्यांच्यापासून अलिप्त राहणे–त्यांचा मनापासून त्याग करणे हेच वैराग्य होय. वरील तीनही साधनांचा अवलंब केल्यास चवथे साधन म्हणजे 'ध्यान' हे सहज हाताळता येते, हे ध्यान म्हणजेच आत्मचिंतन–आत्मदर्शन. हे मुनिवर्या, तू या चारहि साधनांचा मनापासून अवलंब कर आणि हृदयात त्या एकमेव परम तेजस्वी ज्योतिस्वरुप परमात्यास वर. त्यापतिस्वरुप परमात्म्याची परमज्योति आपल्या हृदयात साठव. पतिव्रता स्त्री ज्याप्रमाणे एकमेव आपल्या पतीशीच केवळ एकरुप झालेली असते; अन्य विचार तिच्या ठायी नसतो तद्वत तुझी स्थिती, प्रीति, भक्ति त्या परमेश्वराशी एकरुप होईल तेव्हाच तुला आत्मस्वरुपाचें दर्शन घडेल. अशा प्रकारे आत्मस्वरुप प्राप्तींस लागणाऱ्या प्रमुख चार साधनांपैकी सर्वांच्या मुळाशी विवेक हेच एक साधन आहे, ज्याने त्याचा सतत अवलंब केला त्याचें अज्ञान नाहीसे होते. ज्याचे अज्ञान फिटलें त्याला सत्‌ज्ञानाची प्राप्ती होते. ज्याला सत्‌ज्ञान लाभतें त्याचे मन अविचल पदावर आरुढ होते. अविचल म्हणजे कधीहि कशानेहि न ढळणारे असे आत्मपद, ज्याला त्या पदाची प्राप्ति झाली त्या मनुष्यास काम, क्रोध, अहंकारादि विकार कधीहि मोहवू शकत नाही तो या सर्वांपासून अलिप्त असतो.

आपे मनने अविचल ठाम । ना उपजे अवरथी क्रोधने काम ॥१॥
ज्ञान संगाते विवेक उपजे । तारे मननु कुलक्षण टलीये ॥२॥
ज्ञान यथार्थे अनुभवे लइये । त्यारे मन कल्पित थी रहिये ॥३॥
विषय वासनानो करीये त्याग । धरीये भगती तिव्र वैराग ॥४॥

मनने जीतवा चाहे जेहे । मुनिवर अंतरमा करीये अेहे ॥५॥

ध्यान धरी जीव वैराग्यने । साची भगती अेहरे ॥
वन वैराग्यें स्थिर नही । मुनिवर जाणो तेहरे ॥३९॥

भावार्थ :- आपल्या मनाला अविचल ठाव म्हणजे कधीहि न ढळणारे स्थान प्राप्त करुन देणारी जी कांही साधने असतील त्यात मुख्यत्वे करुन विवेकाची गणना केली जाते. विवेक जागृत असल्याशिवाय मनुष्याच्या हृदयातून कामक्रोधादि विकार जाऊन शकणार नाही आणि विवेकास जर ज्ञानाची सोबत मिळाली तर मानवाच्या मनाची जी कांही कुलक्षणे आहेत ती सर्व समुळ नाश पावतील. खरे पाहता ज्ञान असल्यासच मनुष्याची विवेकबुद्धि जागृत होते-उत्पन्न होते पण ज्याच्या संगतीने विवेकास चालना मिळून मनाच्या कुलक्षणो प्रवृत्त्या नाहीशा होतात ते ज्ञान वाचिक अथवा पढीक ज्ञान नसून अनुभवजन्य यथार्थ ज्ञान होय. या ज्ञानात फरक असा कोणता? तर वाचिक अथवा पढीक ज्ञान कल्पित असते पण अनुभव जन्म ज्ञानात कल्पनेंचा लवलेश नसतो कारण त्याच्या मनाने प्रत्यक्ष अनुभव घेतलेला असतो. याकरितां हे मुमुक्षु, अशा कल्पित ज्ञानापासून दूर राहून तू यथार्थ ज्ञानाचा अनुभव घे. कल्पित ज्ञान हे केनळ मार्ग निर्देशक असल्यानें त्यालाच दृढ मानून तेथेच मुक्काम करुं नये तर त्याच्या संगतीने आणि जागृत झालेल्या सद्सद्विवेक बुद्धिच्या अवलंबनाने स्वतः त्या ज्ञानाचा योग्यायोग्य म्हणजे यथार्थ अनुभव घ्यावा. सर्व प्रथम विषय वासनांचा त्याग करावा, दृढ व तीव्र वैराग्य धारण करावे अहो मुनिवरहो! तुम्हाला जर मनास जिकण्याची इच्छा असेल तर त्या मनाचे लाड न पुरवता-कोडकौतुक न

करता एकदम त्याच्यावर तीव्र वैराग्याचे दडपण टाका आणि ते वैराग्य उत्तरोत्तर दृढ करीत जाऊन–सर्व विषय विकारांचा त्याग करुन दृढ निश्चयाने ध्यान, धारणा, साधना केल्यासच मनावर ताबा मिळवता येईल. खरी भक्ति हीच होय. मन जिंकल्याशिवाय अशी दृढतर भक्ति होऊ शकणार नाही आणि हे मन दृढ वैराग्य असल्याशिवाय जिंकता येणार नाही. अशा प्रकारची ही सांगड घातलेली आहे. त्याचा तुम्ही यथार्थतेने अनुभव घ्या. त्याप्रमाणें वागण्याचा आता पासूनच दृढतेने प्रयत्न करा.

ब्रम्हज्ञान सत्य मन धरीये । भक्ति ज्ञानें नीत विचार करीये ॥१॥
ब्रम्हज्ञाने मन स्थिर अे थाये । मुनिवर बीजो नथी उपाये ॥२॥
प्राण नियमनो करो अभ्यास । समजन माहे आवे संन्यास ॥३॥
जेणें नीत नीत सत्संग चिंतन । तेनु निश्चे स्थिर थायें रे मन ॥४॥
देहे स्वभाव अेंणी पेरे टलीयें । तो मन आत्मा चैतन्यने मळीये ॥५॥

आपणु आप चिते नही । करे अवरशु प्रीत रे ॥
कदी ना होवे बावले । सद्गुरु साथें प्रीत रे ॥४०॥

भावार्थ :– ब्रह्मज्ञानाची गति आणि सत्य सदैव आपल्या मनात धारण करावे आणि नित्य नियमानें सदैव केवळ भक्ति ज्ञानाचाच विचार करावा. हे भक्तिज्ञान कोणते? सर्वत्र ब्रह्म जाणण्याचे जे ज्ञान ते. ब्रह्म जाणावे कसे? जे अविनाशी नित्य आहे, सर्व घट प्राणिमात्रांचे ठायी निरंतर जे आत्मतत्व सामावलेले आहे त्याचा यर्थार्थतेने अनुभव घेणे हेच ब्रह्मज्ञान (याविषयी मागेच विस्तृत स्पष्टिकरण आल्यानें येथे परत तेच देणे योग्य नाही.) अशा प्रकारच्या ब्रह्मज्ञानाचे म्हणजे आत्मज्ञानाचें सतत चिंतन करून आणि मनावर त्याचा पगडा बसवून मनास स्थिर

करावे. मन स्थिर करण्याचें आणखीं एक साधन आहे, ते म्हणजे प्राणायामाचा सतत अभ्यास, प्राणायामाच्या योगाने भरपूर प्रमाणात प्राणवायु शरीरात गेल्यामुळे श्वासोच्छवासाचा उपद्रव आणि रोगराई इ. बाह्य शारीरिक विकार नाहीसे होऊन मनुष्य निरोगी तर होऊ शकतोच पण त्याच्या आंतरिक प्रवृत्तीवर सुद्धा त्याचा सखोल परिणाम होतो. त्याच्या मनात कित्येक दिवसापासून कुजत असलेल्या वासना, इच्छा, वाईटआशा आकांक्षा सुद्धा साफ होऊन शुद्ध होऊ शकतात. म्हणजेच प्राणवायुच्या भरपूर पुरवठ्यामुळें मन पवित्र व प्रसन्न बनुन शुद्ध विचार करण्यास तत्पर होते व अनायासेच त्याचे कुलक्षण गळू लागते. मनाच्या सर्व आंतरिक विकारी प्रवृत्त्या जाऊन ते शुद्ध व सारासार विचार करुं लागते अशा प्रकारे मन समजस झाले म्हणजे त्याच्या विकारांचा संन्यास झाला की अनायासेच ते वैराग्यशील बनते मग हळू हळू त्याला सत्संगाची आवड निर्माण होते. नेहमी सत्संग केल्याच्या योगाने मन चिंतनशील बनते. मन चिंतनशील झाले म्हणजे हळू हळू पण दृढतेने ते मन स्थिरता पावते आणि एकदाचे कां ते दृढ स्थिर झाले कीं आत्मचिंतनाशिवाय ते कशाचाहि विचार करत नाही. अशा प्रकारे प्राणायामाच्या योगाने देहाचें आणि स्वभावाचें सर्व विकार नष्ट होऊन मन आत्मचिंतन करण्यास तत्पर होते व ते पूर्ण प्रेममय चैतन्यस्वरुपात एकरुप होऊन जाते. ज्या मनुष्याचें मन आत्मचिंतनात रममाण न होता अन्य विषय विकारादिकांचा विचार करण्यास मोठ्या प्रीतीनें तत्पर असते. अशा नराधम मानवाचा सद्गुरुवर कधीच प्रीति होऊ शकत नाही आणि ज्याची सद्गुरुवर प्रीति नाही त्याला आत्मचिंतन मुळीच लाभत नाही, कारण, आत्मचिंतनपर मार्गाचें प्रवर्तक अशा सद्गुरुवर त्याची प्रीति नसल्यामुळे आणि त्यांच्यावर त्याचा विश्वास नसल्यामुळें

तो आत्मचिंतन सोडून विषयचिंतनावरच विशेष प्रीति करीत असल्याने अनायासेच सद्‌गुरु प्रीतिपासून दुरावतो आणि सद्‌गुरुंची सुद्धा त्यावर प्रीति–कृपा दृष्टी होऊ शकत नाही तो जीवात्मा अधोगतीला जातो

भीतर भेदनी विद्या खरी । जेणे बेसे मन ठामज ठरी ॥१॥
भीतर गळे वासना लींग । निवृत्त पामे सगळु अंग ॥२॥
श्रीमुखे स्वामी कहे छे अेह । भीतर समजे ते पुरुष विदेह ॥३॥
अेवा लक्षण हृदयमा धरीये । अंतर मोहथी द्वैत परहरीये ॥४॥
पूर्ण भाग जे मुनिवर लह्यु । श्रीमुख स्वामीये अेमज कह्यु ॥५॥

श्रीमुख नारायण कहे । ब्रम्हज्ञान मुख वाण रे ॥
सब घट स्वामी अेक छे । आद अंत नारायण रे ॥४१॥

भावार्थ :– ज्या मनुष्याला हा वरील प्रकारचा आंतरिक भेद समजला म्हणजे आत्मा तोच परमात्मा आणि परमात्मा म्हणजेच आत्मा हा सर्व घट प्राणिमात्रात स्थित असल्याने अंतरदृष्टीने आपण सर्व एक आहोत हा भेद ज्याला समजला, नव्हे प्रत्यक्ष ज्यांच्या कृतीत आला त्याचेच मन सुदृढ, स्थिर व शांत होते. ज्याच्या आंतरीक वासना संपूर्ण लय झाल्या म्हणजे माया, ममता, आशा, आकांक्षा यांचा ज्यांनी त्याग केला ते सत्पुरुष जीवन्त असून सुद्धा मुक्त होत. त्यांच्या ठायी बाह्य देहाविषयीं सुद्धां कांही आकांक्षा असू शकत नाही. ते विदेहमुक्त असतात. ज्या महापुरुषांच्या सर्व अंतर व बाह्य प्रवृत्त्या नाहीशा होतात ते देही असून, विदेही व जीवन्त असून जीवन्मुक्त असतात. असे प्रत्यक्ष भगवान आद्यविष्णु नारायणानें आपल्या सद्‌भक्तजनास सांगितलेलें आहे. या करितां हे मुमुक्षु जन हो, भगवान नारा-

यणाचें ते तत्ववचन् लक्ष्य मानून–प्रमाणभूत मानून हृदयात धारण करा. नित्यनियमाने त्यानुसार वागण्याचा क्रम सुरु करा. मनापासून द्वैत भावनांचा त्याग करा. जे पूर्ण भाग्यवान असतील तेच ह्या द्वैत भावनांचा त्याग करुं शकतील. जे मानव आपल्या संपूर्ण आयुष्यात एक पैशाचा सुद्धा त्याग करुं शकत नाहीत, तें एक रुपयाचा त्याग कधी करुं शकतील? आणि सर्व ऐश्वर्यांचा त्याग कसा बरे करुं शकतील? जे लोक परोपकाराकरितां, अन्य जनहीताकरितां आपल्या वैभवाचा, संपत्तिचा त्याग करतात ते भाग्यवान होत. पण जेव्हा दृश्य वस्तूंचा त्याग करुन सुद्धा आंतरिक विकारांचा आशा, आकांक्षा, ममता, माया, द्वेष आदि विकारांचा त्याग करतात ते परम भाग्यवान–पूर्ण भाग्यवान होत. जे अभागी मानव दृश्य वस्तूंचाच जेथे त्याग करीत नाही ते अशा अदृश्य विकारांचा कोठे त्याग करुं शकतील? म्हणूनच भगवान परमेश्वराने म्हटलेंले आहे कीं जे पूर्ण भाग्यवान आहेत तेच लोक ही पुण्यश्लोक पवित्र वाणी ऐकू शकतील आणि तेंच सर्वांशी एक रुपतेने वागून आत्मशांति मिळवून शेवटीं मज प्रत येऊन माझ्या परम विशुद्ध स्वरुपात तद्रुप होऊं शकतील.

नारायणे ब्रम्हानें कह्यु ज्ञान । आद अंत मध्ये मुजने जाण ॥१॥
ओ अनुभव भाई अंतर आन । ब्रह्माये लेही गत नारायण ॥२॥
ब्रह्माये नारदने कह्यु ज्ञान । पामा देवर्षि परम निधान ॥३॥
नारदे वेद व्यासने कह्युं । मुनिवरनु मन अति प्रसन्न थयु ॥४॥
व्यास शुकजीने आप्यो उपदेश । तेथी टळीया मनना संक्षेप ॥५॥

जीवपणु मुकावे सदा । शुकजीये कह्यु ज्ञान रे ॥
जनक थकी वर पामीया । परम ज्ञान निधान रे ॥४२॥

भावार्थ :– ज्याचें बल, तेज व ज्ञान अप्रतिम आहे अशा परम ज्योतिस्वरुप परमेश्वराने सृष्टीकर्त्या चतुर्मुख ब्रम्हदेवास या ब्रम्हज्ञानाचा सर्वप्रथम उपदेश केला तो असा कीं 'हे ब्रह्मदेवा! या सृष्टी कल्पाच्या आद्य, मध्य, व अंति मलाच जाणून म्हणजे सर्ग कालाच्या (सृष्टयुत्पत्तिकालाच्या) आधी मींच परमेश्वर परमज्योति स्वरुपाने स्थित होता, आणि मध्य कालांत मीच परमेश्वर सर्वभूतप्राणिमात्रांच्या अंतर्यामि स्थित असून ह्या सृष्टीचा लय झाल्यानंतर प्राप्त होणाऱ्या सर्गकालात सुद्धां मीच परम-ज्योति स्वरुपाने स्थित राहील म्हणून या माझ्या अजर, अमर, निर्लेप तत्वाकडे लक्ष देऊन तू तुझ्या हृदयान्तरात मनापासून माझी भक्ति कर म्हणजे तुझी सर्व कार्ये सिद्धिस जातील', हा उपदेश ब्रह्मदेवाने हृदयात धारण करुन-प्रमाण मानून आपलें सृष्टयुत्पत्तिचें, वेदोत्पत्तिचें व परमज्ञान प्रकाशाचें आणि परमेश्वर भक्तीचे कार्य सिद्ध केले. तदनंतर हाच वरील प्रकारचा दिव्य व गुह्य उपदेश ब्रम्हदेवाने आपला मानसपुत्र देवर्षि नारद यास केला. त्यानुसार नारदाने तपश्चर्या करुन ते तत्व पूर्णपणे हृदयात बिंबविल्यामुळें देवर्षीस त्या परम पदाची प्राप्ति झाली. देवर्षि नारदांनीं पुढें हा उपदेश वेदमुर्ति व्यासास सांगितला. त्या योगे मूनिवर्य व्यासजींचें मन अतिशय प्रसन्न झाले व त्या उपदेशानुसार भक्ती करून, तपश्चर्या करून व्यास ऋषि ह्यांना परमज्ञानाची प्राप्ती झाली व ते वेदमूर्ति ब्रम्हर्षि गणले गेले. त्याच परमज्ञानाचा उपदेश ब्रम्हर्षि व्यासांनी आपला मुलगा प्रत्यक्ष भगवंताचाच जणू अवतार अशा शुकाचार्यास केला. गर्भवासातच शुकाचार्यांस त्या ब्रम्हज्ञानाचा उपदेश प्राप्त झाल्यामुळें जन्मतः च शुकानें सर्वस्वाचा त्याग करुन अरण्याची वाट धरली. परंतु आपल्या मुलाला अजुन जगताच्या माया, मोह, ममतेचा प्रत्यक्ष अनुभव

नसल्यामुळें तो प्रौढपणी एखाद्या विकाराच्या मोहात अडकून राहू नये म्हणून त्यांची परिक्षा घेण्याकरितां आणि जगताचा अनुभव येण्याकरितां त्यास व्यासमुनिंनीं जीवन्मुक्त व विदेहमुक्त अशा परम ज्ञानी जनक राजाकडे पाठविलें. तेथे त्यांची कसोटीरुप परीक्षा घेतली गेली. शुकजीं त्यांच्या परिक्षेत पूर्णपणें उत्तीर्ण झाले म्हणून त्यांनी शुकाचार्यांला वर देऊन उपकृत केलें. त्यायोगे ते जीवन्मुक्त व विदेहमुक्त होउन परमज्ञानाचे निधान झाले. अशा-प्रकारे ज्या ज्ञानाच्या योगाने आपल्या अंतरात्म्याचा उद्धार होतो व आपला जीवपणा जावून जीवपद जावून आत्मपदाची प्राप्ति होते असे हे परमश्रेष्ठ अवर्ण्य, अतर्क्य ज्ञान आत्म्यास ओळख-ण्याचे परमात्म्यास जाणण्याचें ज्ञान आहे.

शुकजीये परिक्षीतने कर्यो उपदेश । टळीया तेना कर्म क्लेश ॥१॥
सुनता उपन्यु भक्ति ब्रह्मज्ञान । पाम्या परिक्षीत पद निर्वाण ॥२॥
जेणे ब्रम्हज्ञाने भक्ति लही । अंतरमाही तेणे मुगती सही ॥३॥
अनेक ज्ञानीने राजा राये । हरिपद पामा ते ज्ञान पसाये ॥४॥
द्वैत तजीने जेणे हरि अेक ग्रहीये । तो क्षणु एकमा हरिपद लहीये ॥५॥

हरिपद ले कोईज बिरला । सद्गुरु कहे फुकार ॥
सद्गुरु शरण जेम जेम रहे । तो चित्तज आपे ठाम ॥४३॥

भावार्थ :– अपार ज्ञानाचे निधी व अगम्य प्रचितीचे सागर अशा शुकाचार्य महाराजांनीं पांडव कुलदीपक व महान् धर्मज्ञ महात्मा परिक्षीतास या ब्रम्हज्ञानाचा उपदेश केला व परिक्षीत राजाचा संपूर्ण कर्मक्लेश शुकाचार्यांनी ज्ञानामृताच्या उपदेशाने हरण केला परिक्षीत राजाच्या अक्षम्य अपराधामुळें त्याला शृंगी ऋषीच्या मुलांकडून जो सात दिवसात तक्षकदंश होऊन मरण

पावण्याचा शाप मिळालेला होता तो तर विधिलिखीताप्रमाणें घडलाच पण त्या सात दिवसात श्रवण केलेल्या या ब्रम्हज्ञानाच्या उपदेशामृतामुळें-श्रीमद् भागवताच्या परमदिव्य ज्ञानामृतामुळें परिक्षींताच्या मनात परमेश्वर भक्ति स्फुरली व ब्रम्हज्ञानाच्या साहाय्याने त्यास परमपदाची प्राप्ती झाली ज्या मनुष्याने ब्रम्ह-ज्ञान युक्त भक्तीचा अवलंब केला तो खरोखर मुक्तच होत असतो. जे ब्रम्हज्ञानी असतात म्हणजे ब्रम्ह जाणण्याचें ज्ञान ज्यांचे प्रत्यक्ष आचरणात असते-जो त्यापासून किंचीतसुद्धा ढळू शकत नाही. एक तर केवळ असा मनुष्य मुक्त होऊं शकतो. नाही तर जो संपूर्ण अज्ञानी असून त्याला अतिशय योग्य रीतीने परमेश्वर भक्तीचें मार्गदर्शन करविलेले असेल असेच महात्मे मुक्त होऊं शकतात. कारण दोघांचीहि मने विकाररहित निष्काम झालेली असतात. परंतु अज्ञानी एखाद्या वेळेस योग्य मार्गदर्शनाच्या अभावामुळे धोका पावू शकतो. या करिता सर्वांनी हे ब्रम्हज्ञान श्रवण करुन त्याचे सतत मनन करुन प्रत्यक्ष आचरणात आणावे व त्यानुसार भक्ती करुन मुक्त व्हावे. अनेंक ज्ञानी पुरुष, संत, महंत, महात्मा, राजे, महाराजे सद्भक्तजन ह्याच ज्ञानयुक्त भक्तीच्या बळावर मुक्त झाले. ज्यानें द्वैत भावना सोडून एकमेव परमेश्वराची ओळख-जाणिव करुन घेतली त्यासच हरिपदाची-परमपदाची प्राप्ति निश्चयाने होऊ शकते, अशा हरिपदाची प्राप्ति करणारे महान् भाग्यवान सत्पुरुष फारच विरळ असतात. एखाद् दुसराच मनुष्य त्याप्रमाणे वागून परमपदाची प्राप्ती करुं शकतो. अन्य तर माया सागरांत फेरे खात बसतात. जे सदैव सद्गुरुला शरण जातात. सदैव सद्गुरुंच्या आज्ञेचे वा वचनाचें पालन करतात त्यांचे चित्त सदैव शान्त व स्थिर राहू शकते.

जहालगी द्वैत भाव ना टलीये । तहालगी जीव मुगत ना मलीये ॥१॥
ज्यारे द्वैतनुं थाये छे अंत । तारे अंतरमा प्रगट भगवंत ॥२॥
अंतर दरशने अज्ञान ज टळीये । नही तो मोहमायामा फरता फरीयें॥३॥
स्मरण अेक गुरु मरनु करीये । अेक ही भाव निरंतर धरीये ॥४॥
अेक आत्मा सर्व सृष्टीमा जोये । आप अंतरमा अवलोके सोये ॥५॥

अंतरगत उलटी कला । साधन ना जाणे कोय ॥
कृपा थाये सद्गुरुतणी । ततक्षण दर्शन जोय ॥४४॥

भावार्थ :– जोपर्यंत जीवात्म्याच्या मनापासून द्वैतभाव टळू शकत नाहीं तो पर्यंत जीव मुक्त होऊं शकत नाही. जोपर्यंत त्याच्या आचार विचारांतून द्वैत भावनांचा अंत होऊं शकत नाही म्हणजे आपल्या पेक्षा कोणी गरीब अथवा अज्ञानी असला तर त्याचा तिरस्कार, निर्भत्सना, द्वेष करणे, कोणी श्रीमंत अथवा आपल्यापेक्षा जास्त ज्ञानी असल्यास त्याची निंदा, हेटाळणी, अपमान, द्वेष इ. करणे हे द्वैत पणाचेच लक्षण आहे. ज्याचे हे बाह्य द्वैत लक्षणच सुटू शकत नाही त्यास अंतर्दर्शन कसे बरे घडू शकेल–तो आत्मदर्शनाच्या बाबतीत विन्मुख राहिल. ज्याला अंतर्दर्शन–आत्मदर्शनच लाभणार नाही त्याचे अज्ञान कसे बरें फिटू शकेल? आणि ज्याचें अज्ञान नाहीसे झाले नाही तो मोह, माया, ममतेतच गोते खात फिरेल. ज्याच्या मनातून द्वैत भावनांचें समूळ उच्चाटन झाले त्याच्या अंतरात म्हणजे हृदयात प्रत्यक्ष भगवंतच प्रगटला असे समजावे. मग त्याचे अज्ञान जाऊन त्यास सत्ज्ञानाची प्राप्ति होत असते. जो कोणी रोजच्या रोज ज्ञानाचे पाठचे पाठ देत असला अगर ऐकत असला तरी तो खरा ज्ञानी नव्हेच. ज्याला अन्तर्दर्शन होऊन दुसऱ्या विषयी ज्याच्या भावना

शुद्ध व पवित्र–निर्मल झाल्या तोच खरोखर ज्ञानी होय. तो त्या ज्ञानाच्या योगाने मोह, माया, ममतादि विकारास दमन करण्यास–जींकण्यास समर्थ बनतो. अशा परमोच्च ज्ञानाचे तुम्ही उपार्जन करा. त्याचे यथार्थतेने पालन करुन त्याप्रमाणें वागा. एकमेव परब्रह्म परमेश्वराचे व सद्गुरु महाराजाचे निरंतर स्मरण करा. सर्वाविषयी एकरुप दृष्टीने बघून सर्वांशी सम भावाने वागा. समतेचा भाव निरंतर आपल्या हृदयात धारण करा. एकच आत्मा सर्व सृष्टीत भरलेला आहे. प्रत्येक प्राणिमात्रात आत्मा आहे म्हणून त्या सर्वांच्या आत्म्यास मिळून जो बृहदात्मा किंवा महदात्मा तोच परमात्मा होय. या तत्वाचें तुम्ही निरंतर चिंतन करा व सर्वांकडे या दृष्टीकोनातून अवलोकन करा. अशा प्रकारे खऱ्या मनापासून म्हणजे हृदयापासून या साधनांचा अवलंब करा, त्याप्रमाणे वागण्याचा सतत प्रयत्न करा म्हणजे त्या योगे सद्गुरुंची तुमच्यावर कृपादृष्टी होऊन तुम्ही आत्मदर्शनाचें अधिकारी व्हाल.

सर्वे आत्मा अंतर सुमावना । उत्तम भगती जो दृष्टी समाना ॥१॥
सद्गुरु चरणे मग्न जेनु मन । ते विषयतनु ना करे चिंतन ॥२॥
हरिना भक्त ते उत्तम सही । जेना विषय सुखमा मन नही ॥३॥
जेणे वहाला ते एक श्रीरंग । ते शास्त्र ज्ञान तनो न करे भंग ॥४॥
विहीत कर्म सगला विचारीये । फल अहंकारने विया परहरीये ॥५॥

फल अहंकार निंदक पणु । अंध अज्ञाननु मुळ रे ॥
आशा तृष्णा मुगत नही । ते संशय मोठु सुळ रे ॥४५॥

भावार्थ :– संपूर्ण प्राणिमात्रांचा आत्मा हा अंतरातून–मूळातून एकच असून परम सौभाग्यदायी म्हणजे पूजनीय आहे.

अशा प्रकारच्या ह्या समान दृष्टीनें सर्वभूतप्राणिमात्राकडे अवलोकन करुन सर्वांशीं आत्मभावाने वागणे–प्रेमभावाने सर्वाशीं आपलेसेपणानें वागणे आणि अन्य गांजलेल्या पीडलेल्या लोकांची निरिच्छ बुद्धिने सेवा, मदत, परोपकार करणें ही सर्वश्रेष्ठ आत्मपूजा होय, 'आत्माराम तमे अविगत सेवो । सर्वहि भूत निवासी हो ।।' 'आत्मा पुजीया तेणे सारा पुजीया ।' अशा प्रकारची ही आत्मपूजा रुप भक्ति ही परमश्रेष्ठ सोज्वल स्वरुपाची होय. ही आत्मभक्ति जो मानव करुं लागतो त्याचे मन केव्हाहि विषयांचें चिंतन करुं शकत नाही. त्याचें मन मार्गदर्शक सद्गुरु चरणीं मग्न झालेलें असते–दृढतेने स्थिरावलेलें असते आणि म्हणूनच अन्य विषयादिकांचे चिंतन करण्यास ते भूषण मानत नाही भंग अनायासेच ते विषयचिंतनापासून परावृत्त होते. ज्यांच्या मनात विषय विकारांचा आणि विषमतेचा लवलेशहि नसतो. ते परमेश्वराचें उत्तम प्रतीचें सर्वश्रेष्ठ भक्त होत. ज्यांचे ध्येय एकमेव श्रीरंगच आहे म्हणजें परमप्रभु परमेश्वर हेच ज्याचें अंतिम परम लक्ष्य आहे आणि जे धर्मशास्त्रातील आज्ञांचें उल्लंघन करु शकत नाही. ज्यांच्याकडून शास्त्रज्ञानाची अवज्ञा वा शास्त्राज्ञा भंग पावू शकत नाहीत ते महात्मे परमेश्वराचें उत्तम भक्त होत. जो सर्व प्रकारचें विहीत कर्म सुविचारानें करतो म्हणजे नित्य नैमित्तीक व काम्य आदि ठराविक कर्मे म्हणजेच विविध विहीत कर्मे शास्त्राज्ञानुसार करतो आणि त्या कर्मांचा कर्तृत्वाभिमान बाळगत नाही तो निष्काम चित्त निरहंकारी भक्त सुद्धां परमेश्वराचा सर्वश्रेष्ठ भक्त होय. कर्मफलाची आशा ठेऊन कर्तृत्वाचा अभिमान बाळगणे हे अतिशय निंदीत कर्म आहे. तें अंधपणाचें–अज्ञानाचें मूळ आहे. मुक्तीची सुद्धा आशा, आकांक्षा, तृष्णा बाळगणे हे सुद्धां अज्ञानपणाचे लक्षण आहे. कारण त्यात संशय हा मोठा

शत्रु आहे. संशयाचे खुळ हा एक महान सूळ आहे. **'संशयात्मा विनश्यति', 'शंका करसे ते डुबसे'.** अध्यात्ममार्गावर अश्रद्धा किंवा संशय ठेंवणे हे विनाशाचें लक्षण आहे असे भगवान श्रीकृष्णांनी सुद्धा म्हटलेले आहे. अशा प्रकारे संशय हा महान् धोकादायक आहे. मुक्तीमार्गात हा संशय केव्हां कोठं व कसा गोते खाइल याचा काहीं नेम नाही म्हणून जीवात्म्याने शुभाशुभ आशा आकांक्षांचा व कर्तृत्वाभिमानाचा त्याग करावा तरच जीवात्मा मोक्षतीरास गाठूं शकेल.

सतनी भक्ति अेक विष्णु जन । दिव्य दृष्टी जेनु अेकज मन ॥१॥
पतिव्रतानी पेरे ज सोये । दुजे विषये कई बुध ना होये ॥२॥
पतिव्रता परिब्रह्मनें नमे । ते साधवी भ्रतारने गमे ॥३॥
एक स्मरीये केनो द्वेष ना करीये । हरीने वहाला भवतारण तरीये ॥४॥
श्रवण कीर्तनने स्मरण सेवे । अर्चन वंदन दास्यत्व भेवे ॥५॥

सात प्रकार उपर कह्या । सुनजो मुनिवर ध्यान रे ॥
बे प्रकार पाछळ कहुं । ते नवधा भक्ति निधान रे ॥४६॥

भावार्थ :– सद्भक्ति या शब्दाचाच मूळ अर्थ आहे, एकमेव परब्रम्ह परमेश्वराची भक्ति. आद्यनारायण भगवान महाविष्णु हे ज्याचे प्रत्यक्ष प्रगट स्वरुप आहे असे हे सत् -निरंजन निराकार, निरवयव केवळ तेज, परम तेजस्वी असे जे सत् त्या सत्चें जे उपासक ते सद्भक्त होत. तेंच खरे विष्णु उपासक वैष्णव होत. अशा सद्भक्ताचें ठायीं निरंतर एकमेव परमात्मा सर्व जगतात व्यापलेला आहे अशी धारणा असल्यामुळे ते सर्वांशी एकरुप एकनिष्ठ झालेले असतात. सत्पुष्ट असोत वा दुष्ट, मानव असो वा दानव, वैभववान असोत अगर वैभवहीन, स्त्री असो वा पुरुष,

मनुष्य असो वा पशु सर्वांच्या ठायी हे सत् अेकच अेक असल्या-मुळें सर्व कांही एकच आहे अशी वृत्ति ज्याची होते तेच सद्भक्त खरे वैष्णव जन होत. सद्भक्त नृसिंह मेहता यांनी एका पदात म्हटलेले आहे कीं,

वैष्णवजन तो तेणे कहिये । जे पीड पराई जाण रे ॥
परदु:ख उपकार तो अें । मन अभिमान न आणे रे ॥१॥
सकल लोकमा सहुने वंदे, निंदा न करे कोनी रे ॥
वाच काय मन निर्मळ राखो, तो धन धन जननी तेनी रे ॥२॥
समदृष्टीने तृष्णा त्यागी, परस्त्री जेणे मात रे ॥
जीव्हा थकी असत्य न बोले, परधन नव झाले हात रे ॥३॥
मोह, माया व्यापे नही जेणें, दृढ वैराग्य जेना मनमारे ॥
हरीनामशु तार्ली लागी, सकल तीरथ तेना तनमा रे ॥४॥
वणलोभीनो कपट रहित छे, काम क्रोध निवार्या रे ॥
भणे नरसैयो तेनु दर्शन करता, कुळ एकोत्तर तार्या रे ॥५॥

पतिव्रता स्त्री ही केवळ आपल्या एकमेव पतीशीच एकनिष्ट असते, अन्य विचार तिच्या चित्तात असू शकत नाही, दुसऱ्या विषयांचें ती स्त्री कधीच चिंतन करीत नाही. सदैव एकमेव पतीहीत व पतिसेवा हे तीचे ध्येय बनलेले असते. पतीला सोडून ती जर अन्य विषयादिकांचें चिंतन करीत बसली तर ती पतिव्रता गणली जात नाही. म्हणून पतिव्रता–साध्वी स्त्रीचे ध्येय आपण आपल्या डोळ्यासमोर ठेऊन सदैव वागले पाहिजे म्हणजे सर्वाठायी एकमेव परब्रह्म परमात्मस्वरुप परमेश्वराचे चिंतन करावे. अन्य विकारांची झुळूक आपल्या मनाचें ठायी उठायला नको, द्वैत भावनांचा तर समूळच नाश केला पाहिजे. अशा प्रकारची वृत्ति

जेव्हा आपली होईल तेव्हां कोठे तो परमेश्वर आपला वालो होईल–भवतारक होईल व तेव्हांच आपण संसार सागरातून पैल पार उतरुन जाऊ. परमेश्वर भक्तीचे ९ प्रकार आहेत. त्यापैकी श्रवण भक्ति म्हणजे त्या एकमेव परब्रह्माचें गुणगान, तत्वज्ञान, वेदशास्त्राचे ज्ञान श्रवण करणे ही श्रवणभक्ति होय. कीर्तन म्हणजे परमेश्वर नामाचा एक सारखा जय घोष करणे, त्या नामाचे गुणवर्णन, कथावर्णन, भजन, कीर्तन करणे व त्या तत्वज्ञानाचा अन्य अज्ञ जनास उपदेश करणे ही कीर्तन भक्ति होय. स्मरण म्हणजे परब्रह्म नामाचा वाचक जो शब्द आहे त्या शब्दब्रह्माचें अगर त्या नामाचें सतत स्मरण चिंतन करणें, ती स्मरण भक्ति होय. सर्वांठायीं तो परब्रह्म परमात्मा आत्मरुपानें व्याप्त असल्यामुळे त्या आत्मस्वरुप भगवंताची सेवा करणे–अर्चन पूजन करणे वंदन करणे व त्या परमेश्वराचा मीं दास आहे असे मनाशी ठाम समजून त्याची सेवा चाकरी करणे हे नवविध भक्तीपैकी सात प्रकारच्या भक्तीचें वर्णन झाले. या पैकी कोण-त्याहि प्रकारच्या भक्तीचा अवलंब करुन जीवात्म्यानें परमात्म भक्तीचा स्वीकार करुन नीट लक्षपूर्वक वागून आत्मतत्वाचा साक्षात्कार करुन घ्यावा.

सख्यभावनें आत्मनिवेदन । अें नवविध भक्ति राखो जन ॥१॥
अेवे प्रकारे गुरु नरने भजीये । फल अहंकारने वासना तजीये ॥२॥
जेणे गुरुनरसु निरंतर प्रेम । तेणे गुरुनर आपे योग क्षेम ॥३॥
योगक्षेम अे सघलीज टलीये । जोग क्षमा मन साईमा भळीयें ॥४॥
जोग लक्षण टळें जन्मनें मरण । जोग लक्षण शीतल अंतकरण ॥५॥

जोग लक्षण पाले सदा । अनुभव लाया अपार रे ॥
तेनो अर्थ आगल कहु । सुणो मुनिवर सार रे ॥४७॥

भावार्थ :– नवविध भक्तीपैंकी आठवा प्रकार आहे सख्यभाव म्हणजे परमेश्वर हा आपला एकमेव जीवलग सखा, हीतचिंतक प्राणप्रीय मित्र आहे असे समजून त्याप्रमाणें भक्ति करणें ही सख्यभक्ति होय. परंतु या सर्व प्रकारापेक्षाहि सर्वश्रेष्ठ व अंतीम भक्तीचा प्रकार आहे आत्मनिवेदन–परमेश्वर चरणीं काया, वाचा, मने करुन सर्वस्व समर्पण करुन आत्मभावहि समर्पण करणे ही आत्मनिवेदन भक्ति होय. अशा प्रकारची ही नवविधा भक्ति होय. या प्रकारांनीं अथवा अन्य कोणत्याही प्रकारानें परंतु एकनिष्ठपणें गुरुनर परमेश्वराची भक्ती करा. मात्र कोणतेहि कार्य करतांना अथवा भक्ति करतांना फलप्राप्तीची आशा कर्तृत्वपणाचा अहंकार आणि सर्व प्रकारच्या वासना इच्छा यांचा मनापासून–केवळ वाचेने नव्हे–त्याग करा. ज्याने गुरुवर आणि परमेश्वरावर निरंतर प्रेम आहे, आणि त्यानुसार ज्याचीं पूर्णभक्ति, प्रीती त्या परमेश्वरावर आहे–परमेश्वराशिवाय दुसऱ्या कशाचेहि चिंतन नाही, स्मरण नाही अथवा आचरण नाही, जे कांहीं आहे ते परमेश्वर रुपच आहे. अन्य नाही आणि त्या सर्वांशी प्रेमभावाने वागणे–परमप्रीतीने सर्वांची सेवा करणे हे आपलें ध्येय आहे व मानव जन्म अेवढ्याकरितांच आपणास मिळाला आहे म्हणून गुरूनर, परमेश्वर, मानव, दानव वगैरे सर्वांशी आपण प्रेमभावानें वागलें पाहिजे, अशा प्रकारचें ज्याचें निरंतर ध्येय बनलेले असते अशा परमउज्वल प्रेमी भक्ताचा योगक्षेम परमेश्वर स्वतः चालवीत असतो मात्र या सर्व गोष्टींच्या मुळाशीं पाहिजे 'प्रेम' ज्याच्या चित्रांत नितांत प्रेमाचा अखंड झरा वाहात आहे त्याला योगक्षेमाची सुद्धा चिंता नसते. त्याचा योग–जोग–योगीरूपानें व क्षेम–क्षमारूपाने परमेश्वराशीं तादात्म्य-एकरूप पावलेला असतो. जोग याचा अर्थ योग अथवा योगीं. जो निष्काम कर्मयोगीं असतो

म्हणजे कर्म करून सुद्धा कर्तृत्वाहंकार व फलप्राप्तीच्या त्यागामुळे कर्मबंधन रहित झालेला असतो तो निष्काम कर्मयोगी आपल्या योगाचरणानें जन्ममरण तर टाळू शकतोच परंतू जीवंतपणीच त्याचें अंतःकरण शीतल असते-शांत असते-थिर असते-परम प्रेमास्पद बनलेले असते. ज्यानें अशा प्रकारचे योग लक्षण अंगिकारलेले आहे म्हणजे या योग लक्षणाप्रमाणे ज्याने आचरण केले असेल व त्यांचा अनुभव घेतलेला असेल त्याची स्थिती कशी होते ते पुढे पहा.

योग नाम समबुद्धि प्रकाश। क्षमा ते जे समनो नही नाश ॥१॥
समबुद्धि अर्थे योगी जन । आचरे अनेक ते योग साधन ॥२॥
अनन्य भावे शीस हरीनें नमावे । गुरुनर दयाथी समबुद्धि पामीये ॥३॥
आपो समदृष्टी मुने अंतर्यामी । मुनिवरो हरीने करो परणामी ॥४॥
स्वामी सेवक बहु अपराधे भरीयो । अशरण शरण तोरी चरणे आवीयो

भाई अंतरमा स्वामी शरण । रहे ते अहर्निश जाण ॥
प्रत तमे प्रेमे करीयो । ते अंतर माही पछाण ॥४८॥

भावार्थ :- योग लक्षणांचा वर सांगितलेल्या प्रमाणें निरंतर अवलंब केल्यास त्या कर्मयोग्याच्या चित्तास समबुद्धिचा प्रकाश पडतो. सर्वभूतप्राणिमात्राविषयीं त्याचें अंतःकरण समत्व पावलेलें असल्यामुळें पुढचे लक्षण-म्हणजे क्षमा-ज्याच्या हृदयात हळू हळू उदय पावू लागते. क्षमा यांचा अर्थ आहे चित्तशांतीचा कधीहि नाश न होणे. ज्याच्या अंतःकरणात निरंतर समत्व बुद्धिचा उगम असतो त्याचेच अंतःकरण चिरस्थीर व परमशांत बनलेले असतें. अशाप्रकारे समत्वबुद्धि ज्याची झाली तोच खरा योगी होय. त्याला मग त्याच्या स्वतःच्या चरितार्थाची योगक्षेमाची मुळीच

पर्वा नसते तो साधक अनन्य साधारण अशा या साधनांच्या आचरणाने परमेश्वर स्वरुपात लीन होऊन जातो, नव्हे परमेश्वर रुपच होतो. याकरितां माझ्या प्रीय प्रेमास्पद मुमुक्षु गण हो! आपण अनन्य भावाने एकमेव परमेश्वरास शिर नमवून मागणी करा कीं, 'हे गुरुनर स्वामी, भगवन् मी, नव्हे. हा आपला दास अनन्य भावाने आपणांस शरण आलेला आहे या हीन दीन दासावर दया करुन सर्वभूतप्राणिमात्रांचे ठायीं आमची बुद्धि ज्या योगे समत्व पावेल अशा ज्ञानाची–प्रेमाची आम्ही आपणाजवळ मागणी मागत आहोत; तर हे दयाळु अंतर्यामी भगवन्, या दासावर कृपा करुन आमच्या विनंतीचा स्वीकार करुन आमची मागणी मान्य करुन या हीन दीन सेवकांचे अंतःकरणात समत्वबुद्धि प्रकाशित करावी हे स्वामी! हा आपला सेवक अनंत अपराधांनीं भरलेला आहे. हे सर्वशरण अशरण भगवान् (संपूर्ण जगत् ज्याच्या कृपादृष्टीच्या प्राप्तीकरितां ज्या भगवंतास शरण जातें असा तो सर्व शरण प्रभु व ज्यास कोणाकडेहि शरण जावे लागत नाही– कारण सर्वांचे उत्पत्ति–स्थिती व लयस्थान जर तोच एकमेव परमात्मा आहे तर त्यास कोणाला बरे शरण जावे लागणार? असा तो अशरण परमेश्वर. अशा प्रकारे हे सर्वशरण अशरण भगवन्!) हा आपला सेवक आपल्या चरणीं शरण आलेला आहे याचा अव्हेर न करता यावर आपल्या समत्वदर्शी कृपादृष्टींचा प्रकाश टाकावा'. अशा प्रकारे हे मुमुक्षु! आपण सर्वांनी त्या दयाघन सर्वसृष्टी उत्पन्नकर्त्या, पालनकर्त्या व लयकर्त्या परमात्म्यास जो केवळ निमेषमात्रांत आपल्या कृपाकटाक्षाने सद्भक्तास आपल्या सन्निध घेऊन जातो, त्या अकळकळानीधी भगवंतात अहर्निश–रात्रंदिवस निरंतर आपण शरण असावयास हवे म्हणजे आपल्या विनंती रुपाने आपल्या चित्ताचा प्रवाह जसजसा त्या

भगवान नारायणाकडे वाहात जाईल तसतसा त्याच्या कृपादृष्टीचा प्रवाह आपणाकडे येईल व त्या त्यांच्या कृपाप्रवाहाने आपलें विकारी मन निरंतर धुतले जाऊन त्याचें सर्व विकार नाश पावून तें चिर-स्थिर व शांत होऊन आपणास परमेश्वराची प्राप्ति होईल.

शरणे आवो अेनी राखो लाज । दया करो श्री निकलंकी राज ॥१॥
मागु नही रिध सिद्धनें भोग । मागु एक परमार्थ जो योग ॥२॥
अे लई लक्ष मुनें आपो साई । अेक साई विना बीजी भासे नही ॥३॥
करु विनंती केटली कथी । सेवक तनु ते बल काई नथी ॥४॥
आपे कृपाघन ते कृपाज करसो । भाई अंतरमा कारज सरसो ॥५॥

कारज सरे सद्गुरु थकी । भाई अंतरमा राखीये ॥
प्रेमे सांभलऊ ज्ञान जे । आ रस रदामाहे चाखीये ॥४९॥

भावार्थ :– हे दयानिधे, कृपासागर, आद्यविष्णु निरंजन निष्कलंकी नारायण प्रभु! हा आपला हीनदीन सेवक आपणास अनन्य भावाने शरण आलेला आहे. त्याचा त्याग करुं नका–या सेवकाला दुर्लक्षु नका, कारण शरण आलेल्याची लाज राखणे हे आपले ब्रीद आहे. महाराज! हा आपला सेवक आपणाजवळ कांही ऋद्धिसिद्धीची मागणी करीत नाही, लोकांना निरनिराळ्या प्रकारचे चमत्कार करुन दाखवून त्यांना लुबाडण्याची किंवा त्यांच्या भोळया वृत्तिचा गैरफायदा घेण्याची माझी इच्छा नाही. या सेवकाला विषयभोग प्राप्तीची कामना नाही. दृश्य जगातील मृग-जलाप्रमाणें भासमान होणाऱ्या वैभव सुखाची सुद्धा मला लालसा नाही. फक्त या सेवकाचें एकमेव मागणे हेच आहे कीं, आमच्या वर कृपादृष्टी करून सदसद् विवेक युक्त परमार्थ योग प्राप्तीची

बुद्धि मला द्या. माझे लक्ष्य निरंतर परमार्थाकडे व आपल्या चरण कमळाकडे राहिल अशी बुद्धि मला द्या. समस्त भूतप्राणिमात्रांत एकमेव परमेश्वर भरलेला आहे. त्याशिवाय अन्य वस्तू नाहीच अशा प्रकारची समत्वबुद्धि या हीनदीन दासाची होईल अशी कृपा करा. हे परमेश्वरा, मी आपली विनंती-स्तुति कशी करुं मला समजतहि नाही. तू सागर मी गागर (छोटेसे मडके-घागर) तू पर्वत मी धुलीःकण, तू परमतेजस्वी असा ज्ञान सूर्य अज्ञानांध असा पामर काजवा. तू सर्व जगन्नियंता परमपिता प्रभू नारायण मी तुझ्या दासाचाहि दास. कोठवर आणि कशी बरे मी आपली प्रार्थना करूं. तुझी विनंती कशी करावी अजून ते सुद्धा मला कळत नाही. सहस्त्रमुखांचा शेष नागपण तो सुद्धा आपल्या हजार मुखांनी आपली स्तुति करता करता विराम पावला प्रकांड ज्ञानाचा सागर ब्रह्मदेव आपलें गुणवर्णन करतांना दमला प्रत्यक्ष वाक्देवता सरस्वती ती सुद्धा आपलें गुणगान करतांना विराम पावली. परंतु, या सर्वांचा उत्पन्नकर्ता तर तूच आहेस मग त्यांचे बळ तुझ्यापुढे कुठे चालेल? जेथे स्तुति-विनंती करतांना तेच विराम पावल तेथे या पामर पतंगासारख्या सेवकाने काय बळ चालणार? परंतु तरीही हे कृपासागर प्रभु शरण आलेल्या सेवकावर तू कृपा करुन त्याचे आतरीक कार्य-अंतिमध्येय तडीस नेशील अशी आमची दृढमूल श्रद्धा आहे, आमच्या चित्तात तुज वाचून अन्य विचार नाही हे मुमुक्षु अशा प्रकारची अनन्य भावाने विनंती करुन भक्ति करा. या भक्तीमार्गात सद्गुरुचे स्थान हे अग्रगण्य आहे. कोणतेही कार्य सद्गुरुकृपेशिवाय पार पडू शकणार नाही म्हणून तुम्ही त्यांचे सतत आपल्या हृदयातस्मरण करा सद्गुरुंचे ज्ञानोपदेशामृत हे सद्भक्ताचे ठायीं निरंतर अस-

लेल्या प्रेमास जागृत करते. प्रेमास त्या उपदेशामृताद्वारा उजाळा मिळतो म्हणून त्या अमृत रसाचा तुम्ही सतत आस्वाद घ्या. सतत ज्ञान ग्रहण करुन त्याप्रमाणे वागण्याचा प्रयत्न करा.

सफल मनखारे जनमज अेहे । बीना भगती अवरथा तेहे ॥१॥
सद्गुरु कहे सांभलो नर नार । गुरु नर हरि कहो वारंवार ॥२॥
वेद शास्त्र ज्ञान अेम वदीये । गुरु नर स्मरण तमे राखो हृदये ॥३॥
बाहेर भीतर एक साई साई । साई वीना खाली ठामज नाही ॥४॥
सब घट सर्वमा अेकज शाम । अनंत रुपने अनंत नाम ॥५॥

अनंत नाम रुप अरुपना । अनंत चलंत्र अपार रे ॥
अनंत लीलाये विस्तरो । अनंत लोचन निर्धार रे ॥५०॥

भावार्थ :– मानवी जीवीताचे सार्थक करुन घ्यायचे असेल तर खरी अंतःकरणापासून परमेश्वराची भक्ती करा. भक्तीचा नुसता आव आणू नका कारण भक्तीचे नुसते बाह्य दिखाऊ अवडंबर केल्याने जीवीताचे सार्थक तर बाजुलाच पण मानवी जीवीतास महान धोका निर्माण होऊन त्यायोगाने आपले आपणच फसू. म्हणून खऱ्या भक्तीशिवाय–अनन्य प्रेमस्वरुप भक्तीशिवाय मानव जन्माचे कल्याण होणार नाही. सद्गुरु महाराज सांगत आहेत कीं हे सद्भक्त सत्प्रेमी नरनारींनो! ऐका, वारंवार व वेळोवेळी तुम्हास जे ज्ञान सागितलेले आहे त्याचा तुम्ही श्रवण, मनन व निदिध्यास रुपाने आस्वाद घ्या. प्रत्यक्ष अनुभव घ्या कारण तसे तुम्ही वागल्याशिवाय परमेश्वर साक्षात्कार व मानव जन्माचे कल्याण कसे बरे होईल? या करितां तुम्ही सतत गुरुचे व परमेश्वराचे नामस्मरण करा. वेदशास्त्रांची वाणी महान घोषणा करीत आहे की तुम्ही आपल्या पवित्र हृदयकमलांत सदैव

गुरुदेवांचे स्मरण ठेवा–त्यांनी कथन केलेल्या ज्ञानोपदेशाचें नित्य चिंतन करा. संत श्री तुकाराम महाराज सांगतात कीं,–

गुरुचरणीं ठेंविता भाव । आपे आप भेटे देव ॥
म्हणनि गुरुशीं भजावे । स्वध्यानाशीं आणावे ॥
देव गुरुपाशी आहे । वारंवार सांगु काये ॥
तुका म्हणे गुरुभजनी । देव भेटे जनी वनीं ॥

संत श्री एकनाथ महाराजहि गुरुध्यान करण्याविषयी आग्रहानें सांगतात, तद्वत संत श्री ज्ञानेश्वर महाराजहि म्हणतात की, 'गुरुहि मंत्र गुरुहि तंत्र, गुरुहि सर्वकांही आहे. अशा रीतीने सर्व संतानी गुरुमहिमा गाईला आहे. म्हणून गुरुची अनन्य भावाने सेवा करुन सत् साधकाने त्यांची कृपा संपादन करावी.

आपल्याच नव्हे तर सर्व जगताच्या अंतर व बाह्य तो परमेश्वर भरलेला आहे. त्याने अस्तित्व आहे म्हणूनच सर्व चराचर वस्तु आपल्या प्रत्ययास येतात. परमेश्वराच्या आस्तित्वाशिवाय एकहि स्थान रिक्त नाहीं. सर्वांघटीं पूर्ण एक असा तो पुरण पुरुष सर्वांठायीं एकमेव केवळ एकच एक आहे. अशा प्रकारे तो एकमेवाद्वितीय असून सुद्धां अनंत रुपांनीं व अनंत नामांनी नटलेला आहे. तो परमेश्वर अनामी–नामातीत म्हणजे कोणत्याहि नामानें पूर्णपणे ओळखता न येण्या सारखा असूनहि त्याला अनंत नामे आहेत. तो अरुप म्हणजे रूपातीत असूनहि अनंत रुपे धारण करतो. आपल्या अंतःकरणांतील मायोपाधीमुळें तो एकमेव परमेश्वर अनंत रुपाने आपणास भासमान होतो. त्या अनंत परमेश्वराचे चरित्रच अपार आहे. त्याच्या अनंत चरित्राचें वर्णन कोठवर आपल्याकडून होणार. अनंत लीलांनी

विस्तारलेले त्याचे चरित्र अगाध आहे त्या लीलामय नटस्वरुप भगवंतास अनंत मुख आहेत. अनंत हस्त आहेत व अनंत डोळे आहेत. त्यायोगे तो परमेश्वर हे जगत् यंत्रचालवीत असतो. या जगत् यंत्राच्या मागे मुळाशी तोच अनंत परमेश्वर असून सुद्धा या सर्वांच्या शिवाय तो आहे–सर्व व्यवहारापासून अलिप्त आहे. अशा त्या अनंताचा अंत आपणाकडून कसा बरे लागू शकेल? म्हणून त्याच्या अनंत लीलाचरित्राच्या अंतिम स्वरुप शोधनाच्या फंदात न पडता केवळ त्याची मनोमन अप्रतिम प्रेमाने भक्ति करणे हेच आपले कर्तव्य आहे. त्याच्या अपार चरित्र शोधनाच्या फंदात जर तुम्ही अडकलें कीं अखेर पर्यंत त्याच फंदात गोतें खात बसाल. म्हणून वेळीच सावधा. आत्मनाश टाळून अनंताची भक्ति करा.

सब घट नारायण सर्वमा देव । सर्वमा विष्णु जाणो सुक्ष्म भेव ॥१॥
बाहेर भीतर चराचर विष्णु । जीवने चित्त निरंतर विष्णु ॥२॥
दातार मुगत ये अंग हरि सही । दृढ निश्चे विष्णुनो जलबल जेहि ॥३॥
रखेशर शंका न राखो मन । नही नही हरीबीन कोये अन्य ॥४॥
अेक अनेक मली अेक । साचो साधन अेह अेही विवेक ॥५॥

अनंत विष्णव साचो मानी । अनंत लीला अनंत रे ॥
अनंत त्रण अक्षर रुप अरुप । तेनो पेलो समजो तंत रे ॥५१॥

भावार्थ :– सर्व घटात म्हणजे वस्तुप्राणिमात्रात तो भगवान आद्य विष्णु नारायण व्यापलेला आहे. मात्र ती कांही एखादी दृश्य वस्तु नसल्यामुळें आपल्या बाह्य दृष्टीस दिसू शकत नाही. अंतर्दृष्टीने त्याला जाणावे लागते. या जगताच्याच नव्हे तर अखिल विश्व ब्रह्मांडाच्या अंतर बाहेर चराचर वस्तुमात्रात त्या भगवं-

ताचे सूक्ष्मरुपानें अस्तित्व आहे. आपल्या हृदयात सुद्धां त्याच भगवंताचे निरंतर सूक्ष्मरुपाने अस्तित्व आहे. म्हणजे जगतांतील संपूर्ण चराचर वस्तुमात्र व आपण एकरुपच आहोत. त्यात भेद असा नाही. आपणास बाह्यभेद बघावयाचा नाही. अंतर्दृष्टीने वस्तुमात्रात आणि आपणात जे अभेदत्व–जे माध्यम आहे ते भगवंताचे अस्तित्वच होय. त्याचाच शोध–दर्शन आपणास घ्याव-याचे आहे व तेच आपलें अंतिम साध्य आहे. ते आपण साध्य केले की तो मुक्तीदाता भगवान नारायण आपणास या भवबंधन जालातून मुक्त करेल. त्या करितां त्या अनंत भगवान नाराय-णाचे बळ समजून निःशंक मनाने त्याची भक्ति करा. कोणत्याहि प्रकारचा संशय मनात बाळगू नका. सर्व संदेहांचा मनापासून त्याग करा. परमेश्वराचें अस्तित्व असल्याशिवाय कोणतीहि वस्तु प्रत्ययास येत नाहीं. मनाची दृढमूल अशी धारणा करा कीं, हरींशिवाय अन्य कोणतीहि वस्तु अस्तित्वात नाहीच नाही अशीं दृढमूल धारणा जेव्हा आपली होईल तेव्हा एकात अनेक व अनेकात अेक परमेश्वर पाहण्याची आपली विवेक बुद्धि जागृत होईल. एकच परमेश्वर अनंत रुपांनी नटलेला असून ती अनंत रुपे एकाच परमेश्वरात सामावलेली आहेत अशा प्रकारची बुद्धि आपली झाली कीं आटोपलें सर्वकांही–म्हणून तो भगवान नारा-यण अनंत आहे हे प्रथम समजावून घ्या व मग त्याच्या लीला अनंत आहेत, त्याचे चरित्र अनंत आहे हे समजून घ्या. पण सर्वप्रथम अनंत या तीन अक्षरी शब्दांचें तंत्रच जाणून घ्या अनंत म्हणजे ज्याचा कधीहि, कोठेहि व कशानेहि अंत होत नाही असा अवर्ण्य, अतर्क्य, अविनाशी भगवान आद्यविष्णु नारायण, सद्‌चिद् आनंदघन स्वरुप परम तेजस्वी परब्रह्म परमेश्वर त्याची जी

भक्ति ती अनंत भक्ति होय–अविनाशी भक्ति होय. व तीच मुक्तीदायक होय.

भक्ति अेकने भेदज बहु । आद अंत मध्ये भक्ति सहु ॥१॥
बाहेर भीतर अेम सर्वे ब्रम्ह । समजीने लेवो नीत नीज मर्म ॥२॥
सुवर्ण अेकनें आभरण अपार । सर्वे सुवर्ण जाणो निर्धार ॥३॥
देव मनुष्य अति रजक बहु । कैवल्य विष्णव जाणो सहु ॥४॥
अे प्रबोध अंतरगत धरीये । सर्वे सृष्टीशुं हेत ओचरीये ॥५॥

अनंत रुप अवतार गत । भाई स्थावर जंगम रुपरे ।।
आद् ब्रह्मा सद्गुरु मली। विष्णु ज्योते स्वरुप रे ॥५२॥

भावार्थ :– भक्तीचे अंतीम स्वरुप एकच आहे मात्र साधण्याचे प्रकार अनेक आहेत. भक्ति या शब्दाचा अर्थ आहे भज्–भजणे, आपलें मन परमात्म स्वरुपाशीं एकतान–लीन करणें तीच खरी भक्ति होय. तो परब्रम्ह परमेश्वर अनंत असल्यामुळें सृष्टी जीवक्रमाच्या म्हणजे सर्वकालाच्या आदि असून सुद्धा अनादि आहे. तद्वतच सृष्टीजीवक्रमाच्या म्हणजं सर्गकालाच्या अंती असून सुद्धा अनंत आहे आणिमध्यकालात म्हणजे जीव सृष्टीक्रमांत असून सुद्धा त्या सर्वांपासून अलिप्त आहे. तेच सनातन व अनाद्यनंत ब्रम्ह सृष्टीतील प्रत्येक वस्तुमात्रांत–अणु परमाणूत आणि प्राणिमात्रांच्या अंतर बाहेर सर्वदूर व्यापलेले असल्यामुळे तदंशभूत आत्म स्वरुपाचें मर्म समजावून घेऊन निरंतर त्या अनाद्यनंत परब्रह्माची–अखंड प्रेमरस स्वरुप भगवंताची भक्ति करा. सुवर्ण म्हणून जो धातु असतो तो एकच असतो परंतु त्या सुवर्णांपासून अनेक आकृतीचें निरनिराळे दागिने बनविले जातात. सर्व दागिनें समोर ठेवून विचार करीत करीत जर त्यांच्या निर्मीतीच्या मूळाशीं गेलो तर

सर्व दागिन्यांच्या मूळाशी सोने हा एकच धातू असल्याचें दिसून येईल तद्वतच देव. उच्चकुळातील मनुष्य (ब्राह्मण), हलक्या कुळातील मनुष्य (शुद्र), दुष्ट बुद्धिचे मानव (दानव) व इतर पशु पक्षी हे सर्व आपल्या दृष्टीसमोर ठेवून त्यांच्या निर्मितीच्या मूळाचा जर विचार करुं लागलो तर सर्व त्या एकमेव कैवल्यस्वरुप विष्णू भगवंताचेच अंशभूत अवतार विग्रह आहेत हच आपल्या प्रत्ययास येईल मात्र सुवर्ण ही दृष्यवस्तु असल्यामुळें चर्मचक्षुंनी ते दिसू शकते, तसे जीव प्राणिमात्रांचें ठायी असलेल्या अंतरात्म्याचें नाही. आत्मा हा अत्यंत सूक्ष्म चैतन्यरुपानें असल्यामुळें ज्ञानचक्षुने त्यास जाणावे लागते. हा प्रबोध आपण आपल्या हृदयात धारण करून सर्व सृष्टीशीं प्रेमभावाने वागू या. आणि आपल्या हृदयात प्रेमाचा अखंड उगम असल्याशिवाय सृष्टीतील संपूर्ण प्राणिमात्रांची आणि तदन्तर्गत आत्मारामाची आपणास जाणिव होऊच शकणार नाही. म्हणून सर्व प्रथम आपली अशी दृढ धारणा झाली पाहिजे कीं, हे संपूर्ण स्थावर जंगम विश्व–जीवभूत प्राणिमात्र हे सर्व दृश्य अदृश्य जगत् एकमेव अनंत भगवंताचें अवतार स्वरुप आहेत. हे मानव मानव नव्हेत, त्या भगवंताचे स्वरुप आहे. हे पशू पशू नव्हेत, भगवंताचे स्वरुप आहे. हे वृक्ष, पर्वत, सागर, जमीन हे सर्व अन्य कांहीहि नसून त्या परमज्योतिस्वरुप आत्मचैतन्य ज्योतिस्वरुप विष्णु भगवंताचेच अंशभूत आहेत अशी धारणा आपली झाली कीं मग कोणत्याही स्वरुपाने त्या अनंत भगवंताचा साक्षात्कार होईल.

विष्णव वायेक ते हिरदे धरीये । स्मरण निरंतर गुरुनरनो करीये॥१॥
सद्‌गुरु बोध ते सीखे सुनीये । मनहर ज्ञान ते प्रेमे भणीये ॥२॥
ब्रह्मज्ञान विचारे ग्रहे जेह । संसार बंधमथी छुटे तेह ॥३॥

संसार समुंदर भव महा अपार । सद्गुरु बोध ते नावज सार ॥४॥
ओ साधन अनुभवे सेवे जेह । सुखे परमपद पामे तेह ॥५॥

मुगत मार्ग अति प्रेमपद । मुनिवर समजो कोय रे ॥
अन्तरदल आदर करो । तो निर्मल तनमन होय रे ॥५३॥

भावार्थ :– अशा प्रकारे आद्यनारायण भगवान विष्णुचे हे वचन निरंतर हृदयात धारण करून सद्गुरु महाराजांचे व परमेश्वराचें आपल्या हृदयात सतत स्मरण करा. हा अखंडद्वैत ज्ञानाचा प्रबोध ज्यांनी आपणास दिला त्या सद्गुरु महाराजांच्या कृपेवाचून आपलें आत्मकल्याण होणार नाही म्हणून त्यांची कृपादृष्टी होण्याकरितां त्यांनी कथन केलेला हा बोध सागर–मनहर ज्ञान–प्रेमपाठ दररोज पाठ करावा दररोज नित्य नियमाने प्रेम भक्ति भावाने त्याचे अध्ययन–पारायण करावे. श्रवण करावे. कारण, त्यात वर्णिलेल्या परमप्रेमस्वरूप ब्रह्मज्ञानाच्या विचारांनीं आपले उच्छृंखल बनलेले मन लीन होऊन ते अंतर्मुख होईल व आपल्या जन्मकर्तव्याचा विचार करुं लागेल. जीवीत साफल्याच्या सतत विचारांनी आपल्या मनाचा कल बदलून परमेश्वर भक्तीकडे ते ओढ घेईल मग हळू हळू संसार कर्माच्या बंधनातून सुटून परब्रह्मस्वरूपीं–निजात्मस्वरूपी चित्त स्थिर होईल. अशा प्रकारे या अपार संसार समुद्रातून–अनंत क्लेशदायक, क्षणिक सुख व निरंतर दुःखकारक माया सागरातून पार उतरून जाण्यास हे 'मनहरज्ञान' म्हणजेच ही अमरवाणी एक उत्तम प्रकारची नाव आहे. आणि या नावेचा नावाडी सद्गुरु महाराज प्रत्यक्ष असल्यामुळें त्यांच्याशीं बंधन बांधून-अनुसंधान करून ती नाव हस्तगत करा व सुखाने हा भवसागर तरून जावून परमपदाची प्राप्ति

करुन घ्या. सद्‌गुरु महाराजांनी उपदेशिलेल्या ज्ञानाप्रमाणें आपण जेव्हा वागू तेंच त्यांच्याशीं अनुसंधान साधणें होय. अशाप्रकारचें अनुसंधान साधून परमपदाची प्राप्ति करणे हेच आपलें जीवीत साफल्य–अंतिम ध्येय आहे. मुक्तीचा मार्ग म्हणजेच परमपदाचा मार्ग हा अतिशय प्रेमाशिवाय लाभणार नाही. ज्याच्या हृदयांतरी निरंतर अखंड प्रेमाचे अमृत भरलेले आहे आणि त्या अमृतमय प्रेमदृष्टीनें जो सर्वांशी वागतो, सर्वांचा आदर करतो. सर्वांशी बंधुभाव व आत्मभावाने वागतो, कोणी रंजलेला असो, वा गांजलेला, पीडलेला असो गरीब, अनाथ, श्रीमंत, सज्जन, दुर्जन कोणीहि असो सर्वांशी प्रेमानें वागतो त्याचें तन मन निर्मल होऊन अंतरबाह्य पवित्र होऊन तोच मुनिवर मुमुक्षु परमप्रेम पदाची प्राप्ति करुं शकतो.

विष्णव आपे बोलावीयु जेह । सद्‌गुरु ब्रह्मानो भाकु तेह ॥१॥
निर्मित्तमात्रे कर्युं उपदेश । करता हरता ते श्री अविनाश ॥२॥
ब्रह्मज्ञान कही संभळायु । भाई अंतरमाही ते निर्मळ थाऊ ॥३॥
निर्मल थईने धरवुं ध्यान । अेक मन भणवु नीत ब्रम्हज्ञान ॥४॥
साधन सत विचार नीत नीत करऊं । जे जे गुरु वचन ते चितमां धरऊं

चित्त साधन परबोधऊ । सुणो सद्‌गुरुनो बोध रे ॥
स्मरण अेक चित्ते करी । भाई अंतरने शोध रे ॥५४॥

भावार्थ :– भगवान श्री विष्णु परमात्म्याने स्वमुखाने वर्णन केलेले हे पवित्र ज्ञान–निर्मल तत्ववचन सद्‌गुरु महाराजांनी आपणास सांगितलेंले आहे. त्याच परमश्रेष्ठ परणाम उज्वल ज्ञानाची समज निमीत्तमात्रे करुन सद्‌गुरु महाराजांनी आपणास दिलेली आहे. सर्व कर्ता आणि सर्वहर्ता परब्रम्ह परमेश्वर तर अविनाशी

अनंत आहे. अशा प्रकारचें हे ब्रम्ह जाणण्याचें ब्रह्मज्ञान आपणास सांगितलेले आहे तर आपण अंतरबाह्य निर्मल होऊन निरंतर तें ज्ञान श्रवण केले पाहिजे-पठन केले पाहिजे, मनन केलें पाहिजे आणि त्या योगे आत्म जागृति करुन त्याचे अनुसंधान केले पाहिजे. दररोज नित्य नियमाने स्नान, संध्या, ध्यान, धारणा नामस्मरणादि विधी आटोपून नंतर एकचित्त होऊन-मन निर्मल व पवित्र करुन ह्या ब्रह्मज्ञानाचा नित्यपाठ करावा. नित्य पाठ म्हणतांना अगर श्रवण करतांना जर एकचित्त नसेल-मन स्थिर नसेल तर त्या पाठाचा कांहीहि उपयोग नाही. नित्यपाठ याच करिता करावयाचा असतो कीं त्यायोगे आपले उच्छृंखल मन माया-विषय-विकारापासून निवृत्त होत जावून हळू हळू सद्विचाराकडे-परमेश्वरभक्तीकडे प्रवृत्त होत जाईल. संसारकार्यात मनुष्यास अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. त्यास-त्याच्या मनास अनेक विकारांच्या आहारीं जाण्याची पाळी येते. अनेक अपराध माणसाच्या हातून घडण्याची वेळ येते. मनुष्यावर मनीं मानशीं कल्पना नसतांना अचानक कांहीं संकटे सुद्धा येतात अशावेळी हा नित्यपाठ आपलें कार्य घडवीत असतो. कारण अनेंक संकटांनी आशा आकांक्षांनी, माया विकारांनीं त्रिविध तापाच्या योगाने अधःपतीत होऊ पाहणाऱ्या मनास सावरण्याचें-त्यापासून परावृत्त करण्याचें कार्य हा नित्यपाठ-ज्ञानपाठ करीत असतो म्हणून जीवनांतील अग्रगण्य असलेल्या या साधनाचा नित्य निरंतर सद्विचार करून सद्‌गुरु वचन आपल्या चित्तात धारण करून या साधनाचा अवलंब करावा व जीवन सफल करावे. 'केल्याने होत आहे रे यत्न तो देव जाणावा' असे समर्थांचेहि वचन आहे.

श्री सद्‌गुरू महाराज सांगत आहेत की अहो परम प्रेमस्व-

रूप मुनिवर्य मुमुक्षु गण हो, आपल्या चित्तास प्रबोध देणारे, परम उज्वल शिकवण देणारे असे हे मनहर ज्ञान म्हणजे मनाला हरण करणारे, मनाचे कुविचार, कुबुद्धि आदि विकार नाहीसे करून त्यास शुद्ध व शांत स्थिर करणारे मनहरज्ञान किंवा सद्‌गुरूबोध–नित्यपाठ रूप साधन त्याचे दररोज नित्य नियमितपणे वाचन, श्रवण. पठण, मनन करून त्यायोगे आपलें चित्त निर्मल शान्त व स्थिर करून आपल्या अंतरात्म्याचा शोध घ्या. त्या अंतरात्म्याचा तुम्हास शोध लागला कीं सर्व व्यापी अशा परमात्म्याचा तुम्हास साक्षात्कार होईल व त्यायोगे तुमच्या सर्व संकुचित वृत्या समूळ नाश पावून तुम्ही विश्वरूप परमात्मरुप परमप्रेमस्वरूप बनून जाऊन परमात्म स्वरूपात लीन व्हाल.



ॐ श्री सद्‌गुरवे नम:

उपसंहार

मानवाचें मन व त्याचा सत्–असत् व्यापार.

"मन एव मनुष्याणां कारणं बन्धमोक्षयो :"

जुगमा चेतीने चालोजी । मरणा है रे जरुर ।।ध्रु।।
कायारो घट तारो खुप बनु है । पंचहि तत्वनो मुल ॥१॥
काया नगरमा मन है रे राजा । चेंतीने नुर माहे नुर ॥२॥
नुरस्वरुपी चेतन करी आणो । काया माया सर्वे कुड ॥३॥
काया नगरमा पाचे चोर वसे छे । चेतीने चालो मारा वीर ॥४॥
काया नगरपर भय एक भारी । काळ करे चकचूर ॥५॥
करो हुशीयारी सद्‌गुरु चेतावे । तो नाम लीजे निर्मल मन ॥६॥
दया सत्तावंत हरदम किजे । क्षमा धर्मनो मूल ॥७॥
कहेत इमामशहा सुणो मनवा मेरा । रहेजो सद्‌गुरुनें हजुर ॥८॥

— श्री सतपंथ ज्ञान पद संग्रह,

पंच महाभूतांच्या पंचिकरण रुप मिश्रणाने तयार झालेल्या या नरदेह रुप नगरात सर्व इंद्रियांवर व त्यांच्या क्रियावर सत्ता चालविणारे मन हे राजा आहे. पंचेन्द्रियद्वारा घडणाऱ्या सर्व क्रिया कर्मांचा कर्ता व भोक्ता हे मनच आहे. त्याच्या सत्–असत् क्रियाचरणावरच जीवात्म्याचें बंध अथवा मोक्ष अवलंबून असल्यानें जीवात्म्याने प्रथमच या मनास ओळखून जिंकावयास–मांडलिक

करावयास हवे आहे. मन आत्म्याच्या स्वाधीन झाल्यांशिवाय मनुष्यास परमात्म प्राप्ति होऊं शकत नाही. जगताच्या सत्-असत् व्यापारापासून–मिथ्या माया, मोह, ममत्वापासून मन परावृत्त केल्यानेच ते आत्म्याच्या स्वाधीन होते. या करितां जीवात्म्याने सदैव जागृत राहून ईश्वराचे सतत नामस्मरण ध्यान, चिंतन, निदीध्यासन करुन दया, क्षमा. सत्य, अहिंसा, सदाचार या तत्वांचा सतत अवलंब करावा आणि सद्‌गुरुंच्या–सत्पुरुषांच्या सतत सान्निध्यात वचनात नियमांत राहून परमात्म प्राप्तीच्या मार्गाचे अनुसरण करावे.

परब्रम्ह परमात्मस्वरुप प्राप्त करुन घेण्यासाठी कोणता मार्ग आहे? या विषयी सद्‌गुरु महाराज सांगतात कीं,

जगदीश जगत् जगमाही जगदीश । अेवी बुद्धि राखो तमे सालस ।।

हे तत्व अंगी बाणविल्याशिवाय म्हणजे **' वसुधैवकुटूंबकम् ' ' हे विश्वची माझे घर '** ही भावना मनुष्याची झाल्याशिवाय त्यास परमात्म स्वरुप ओळखता येत नाही. तें स्वरुप पाहण्यासाठी मनुष्याने आपल्या देहामधील शुद्ध स्वरुप पहावे. या तत्वांशी निगडीत असलेल्या सर्व क्रिया मनुष्यानें प्रथम स्वतःच्या देहावरच करावयाच्या असतात. आपणास आपल्याच शरीरात परमात्म्याच्या स्वरुपाचा अनुभव आला म्हणजे सर्वत्र सर्व ब्रम्हरुपच आपणास दिसेल. हा परमात्मा शुद्ध प्रेमाच्या एकनिष्ठपणाच्या योगानेच म्हणजे सतत ध्यान योगानेच पाहता येतो.

एकाग्रतेने चिंतन करणे यास ध्यान म्हणतात. ध्यानावस्थेत जेथे मन लागलेले असेल अथवा ते जो व्यापार करीत असेल त्याचेच ते ध्यान मानता येईल. मनुष्य परमात्म्याचें ध्यान करा-

वयास बसेल पण डोळे मिटले म्हणजे मन एखाद्या रुपवती स्त्री कडे अथवा द्रव्याकडे धाव घेईल व ते मला कसे प्राप्त होईल? ते मिळविण्यासाठी मी काय यत्न करुं. ते मला मिळाल्यास मी कसा सुखी होईल अशा-प्रकारचें संकल्प करील तर ते ध्यान परमात्म्याचे नसून विषयांचेच म्हणता येईल. ह्या विषयापैकी एकावर लक्ष लागलें असतां ते अनेक दुसऱ्या नविन विषयाकडे जातें व त्यावरुन परावृत्त करण्याची अंगी शक्ति नसल्यामुळे मनुष्याचें अखेर पतन होते. म्हणून मनुष्याने प्रथम आपल्या मनासच ओळखावे व वश करावे म्हणजे सर्व कार्ये सिद्धीस जातात भक्ति, ज्ञान, चिंतन मी तू पणाचा अभिमान व सारासार विचार ही सर्व केवळ मनुष्याच्या मनाच्या शुद्ध अशुद्ध स्थितीवर अवलंबून असतात. जेथे मन आहे तेथें ती सर्व आहेत. ज्या प्रकारचे संकल्पात्मक मन असेल त्या प्रकारचे संकल्प मनांत स्फुरण पावत असतात. मन पवित्र असलें तर मनांत पवित्र विचार येतात व पवित्र विचार आले असता तें पवित्र मार्गीनेंच फिरते मन पूर्ण पवित्र झाले असता पूर्ण ज्ञान होतें व त्या योगानें तरुन जाता येते.

शरीरातील कर्मे करविणारीं व ज्ञान प्राप्त करविणारी दहा इंद्रिये मनाच्याच स्वाधीन असतात. सर्वांचा राजा मन आहे. "काया नगरमां मन है रे राजा।" राजा ज्याप्रमाणें आपल्या प्रजेस हुकूम सोडतो तेवढेच त्याची प्रजा ऐकते. त्या प्रमाणें मन सांगते तेवढेच ती इंद्रिये कामे करीत असतात. समजा एखाद्या मनुष्यास एखाद्याचा वध केल्याबद्दल देहांत दंडाची शिक्षा होऊन त्याची मरणाची वेळ अगदी जवळ येऊन ठेपली आहे; अशावेळी निरनिराळ्या प्रकारच्या सुंदर पक्वांन्नाचें भोजन तयार करुन त्यास जेवण्याचा आग्रह करण्यात आला तर त्या मनुष्यास ते

जेवण गोड लागेल काय? एखाद्या नवयौवना सौंदर्यवती स्त्रीच्या हावभावांनी तो त्या समयीं मोहून जाणार नाही कोमल स्वर-युक्त गायनाने त्यास त्याच्या मोठ्या चिंतेचा विसर पाडता येणार नाही. त्यावेळी तो दुसऱ्या कशाचेहि चिंतन करणार नाही अथवा त्याच्या स्तुतीपर भाषणांनी उल्हसीत होणार नाही. माने-वर तलवार ठेऊन तोंडात साखर घातली तर कशी बरे गोड लागेल त्या मनुष्याचें सर्व कर्मेन्द्रियें आणि ज्ञानेन्द्रियें जेथल्या तेथेच गुणयुक्त आणि पूर्वी प्रमाणेंच कार्यक्षम असतांना तो त्या इंद्रियांच्या द्वारे ते ते विषय कां बरे भोगू शकत नाही? कारण कीं त्यावेळेस त्या इंद्रियांचा अधिष्ठाता जे मन ते त्या इंद्रियावर लक्ष्य देत नाही. ते केवळ मरणाच्या चिंतेत एकाग्र होऊन राहते. त्यामुळे त्यास या गोष्टी रुचत नाहीत. यावरुन ज्या विषयावर मन असते तो विषयच इंद्रियेंहि ग्रहण करुं शकतात. जेथे मन नसेल तेंथे इंद्रियेंहि स्वतंत्रपणें कार्य करुं शकत नाहीत. ज्यास्थळी मन स्वतंत्र स्थिर व दृढ असते तेच ध्यान सिद्ध होते व दृढ-ध्यानी असेल त्याने ईश्वराच्या पूजनानंदात किंवा आपली सर्वेंद्रियें आत्म्याच्या व परमात्म्याच्या शोधनांत जाऊं दिल्यानेच तो पूर्ण-स्वाम पावतो.

पूर्ण श्रद्धायुक्त विशुद्ध मनाने केलेली भक्ति व आत्मज्ञान हाच कल्याणाचा श्रेष्ठ मार्ग होय. मोक्षाची इच्छा बाळगणाऱ्या जीवानें आत्मबळाचा विचार करुन निष्काम भक्तिवान होऊन पवित्र मनाने दृढश्रद्धा ठेऊनच स्वस्वरुप पाहावे. व्यवहारात राहिला तरी सदोदित त्यापासून दुर राहण्याचा प्रयत्न करीत राहावे घरात किंवा मंदिरात, एकान्तात किंवा समाजातहि परमात्म्यास आपल्या दृष्टीसमोरुन क्षणभर दूर होऊं न देता केवळ त्यांच्यातच

लय लावून ठेंवावी व आपल्या आत्म्याशीं आपणच विचार करावा कीं, मी कोण, कोठून आलो व मला कोठे जावयाचे आहे; याचें क्षणोक्षणी श्रवण, मनन व निदिध्यासन करुन प्रपंच सागरातून पार उतरुन जाण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

पवित्र जीवाने मन संकल्प विकल्प रहित दृढ करावे व परमात्म्याच्या ठायींच असे लक्ष्य लावून राहावे कीं, मी परमात्म्याचा आहे अथवा परमात्मा माझा आहे अथवा मी आणि परमात्मा एकच आहों तो तो मी व मी तो तो! हाच कल्याणाचा मार्ग होय. पण जो संशयखोर असतो तो अर्थात हें खरे कीं तें खरें अशा संकल्प विकल्पानीं भरलेला असतो तो पुरुष आत्मकल्याण करुं शकत नाही, आणि कोणीहि मनुष्य मन वश केल्यावाचून एकरूप होऊं शकत नाही, मन किती प्रबळ आहे व त्याचें गुण कसे आहेत ते बरोबर रीतीने समजल्यानंतर ते आपल्या ताब्यात ठवल्याशिवाय परमात्म्यास ओळखण्यासाठीं कोटयावधि वर्षे प्रयत्न केला तरीहि त्याचा तो सर्व प्रयत्न व्यर्थच जाईल म्हणून सर्व प्रथम मनोनिग्रह करावा.

मन हे कांहीं स्वतःसिद्ध वस्तु नाही. आपल्या दशेंद्रियासह ते कल्पित व जड रुप आहे. आणि आत्म्याच्या-चैतन्याच्या सत्तेनें ते प्रकाशित होत असते. ही वासना जरी मनाला होते तथापि याच्या मागे अलिप्त आत्माहि खेचला जातो पाण्यात जसे सूर्याचे प्रतिबींब पडते त्यामुळें पाणी प्रकाशीत होते. पण स्वतः पाणी तर जडरूप आहे. त्याच्यात प्रकाशण्याची शक्तिच नाही. त्याचप्रमाणे मन देखील जड आहे त्यास स्वतः असे कांहींच करता येत नाही, परंतु चेतन परमात्म्याच्या संबंधामुळे ते नाना

प्रकारचें विचार (संकल्प विकल्प) करतं व पाहिलेल्या वा ऐकलेल्या अनेक ठिकाणी जाऊं देखील शकते म्हणून सर्वभार आत्म्याच्या शिरावर असतो.

जरी मन आत्म्याच्या सत्तेने स्फुरण पावते तथापि त्याची शक्ति कांही कमी नसते. रथात बसून जाणारा अथवा युद्ध करणारा महारथी योद्धा ज्याप्रमाणें सर्व सत्ताधारी असतो खरा, तथापि त्याचा सर्व आधार सारथ्यावर असतो व तो जेथे रथ हाकून जातो तेंथे तो स्वतः जात असतो; त्याचप्रमाणें ह्या शरीररुपी रथात बसलेल्या महारथी आत्म्याचा सारथी मन आहे. ज्या मार्गांने हा सारथी इंद्रियरुपी अश्वास हाकतो त्या मार्गांनें देहरुपी रथ खेचला जातो. म्हणून आत्म्याच्या सत्तेखाली राहात असूनहि मन यथेच्छ गमन क्रीडा करते. मन एवढेकांहीं प्रबळ असतें कीं अतोनात प्रयत्न केले तरीहि तें वश होत नाही. ते सूक्ष्मातहि सूक्ष्म, मोठ्यात मोठे अपरंपार वेगवान अतिशय चंचल महाबलवान दृढ व सर्व इंद्रियास हालवून सोडणारे असल्यामुळें त्यास वश करणें फारच अशक्य आहे.

मन हे संसार बंधाचें कारण होय. मनाची अशी विचीत्र गति आहे कीं जर ते आपलें स्वाधिन झालें तर महान विद्वान करुं शकते, नाही तर अविद्येत–अज्ञानपणात लोळवून टाकते. मनाचा नाश झाला–ते स्वाधिन झालें–तर सगळ्या प्रपंचाचा लय होतो व अखंड सुखाची प्राप्ति होते. पण जर मनाचें बळ वृद्धि पावून ते स्वतंत्र झाले तर प्रपंच मात्राची वृद्धि होते. सुषुप्ति अवस्थेत मनाच्या सर्व क्रिया जरि बंद पडतात तरी त्या वासनारुपाने राहिलेल्या असतात. जर त्या वासनारुपाने राहिलेल्या

नसल्या तर निद्रावश पुरुष पुनः जागृत होणार नाही. पण निद्राधिन मनुष्यास हाक मारल्याने किंवा हाताने हालविल्याने तो जागा होतो त्याप्रमाणें कांही वेळपर्यंत बंद पडलेल्या मनाच्या वृत्ति वासनेच्या जोराने पुनः उद्भवतात. मनाच्या वृत्ति जेव्हां शांत असतात तेव्हा आत्मा ब्रह्मानंदात यथेच्छ रममाण होतो पण तो अविद्येच्या योगाने अखंड आनंदापासून बहिर्मुखच राहतो व त्यास चिरकालिक आनंद भोगता येत नाही. अविद्येच्या प्रकाशानेच अखंड आनंद भोगता येतो. शिवाय मन आणि आत्मा हे निरनिराळे आहेत. आत्मा चैतन्यरुप आहे व मन अन्नाच्या रसरुपानें घडले जात असल्यामुळें जड आहे.

मनोविजय झाला तर सर्व वस्तु प्राप्त होतात, कारण, हा संसार आत्म्याचा नसून ती मनःकल्पित आहे व जे मनःकल्पित असते ते वास्तविक नसते. यावरुन असे कळून येते कीं, ज्याप्रमाणें ढग उत्पन्न करणारा वायु असतो व ते वितळवून टाकणाराहि वायुच असतो, त्याचप्रमाणें संसार सत्य व सुखदायक असे मानावयास लावणारे मनच होय व संसाररुपी बंधनास तोडून टाकणारे, संसार असत्य–मिथ्या–नाशवंत व दुःखरुप दर्शविणारे किंवा मानावयास लावणारेहि मनच होय संसाराच्या प्रपंचातून मुक्त करणारेहि मनच होय व त्यांत बद्ध करणारेहि मनच होय. ते संसारातील परोक्ष व अपरोक्ष सर्वविषयात प्रेम उत्पन्न करते व हेच मन सर्व विषयांत वैराग्यहि उत्पन्न करते. जीवात्म्यांत मनाच्या प्रेरणेनें विवेकयुक्त वैराग्य वाढलें तर ते सिद्धि पाववून मुक्ति देण्यास समर्थ होते. पण जेव्हां जीवात्म्यांत रजोगुण व तमोगुण वाढतात तेव्हा हे मनच मलीन होऊन संसाराच्या रामरगाड्यात जीवात्म्यास चिरडून टाकते.

जीव जर मनःशुद्धिच्या मार्गांत पडला तर हळू हळू संसारांतील वस्तुवर त्याची अप्रीति होत जाते व तसतसे मनाचें वळण सत्यवस्तु कडे–आत्म तत्वाकडे–सुदृढ होत जाते. निरंकुश व यथेच्छ क्रिडा करणाऱ्या मनास नानाप्रकारच्या युक्ती प्रयुक्तीनें ज्ञानी पुरुष ताब्यात आणतात. जसे आपण ध्यानस्थ बसलेलें असतो, त्यावेळेस जरी मन एकाग्र केलें असलें तरीहि कदाचित् शेजारी गायन होत असलेलें किंवा गोंगाट, गडबड, फटाक्यांचें आवाज होत असलेले अथवा डफ, डमरु, ढोलक वाजत असलेले आपणास ऐकू येतात व तसे होताच 'हे काय असावे,' अशी मनाची वृत्ति डगमगू लागते. स्थुल देह जेथे असतो तेथेच पडलेला राहतो व मन तेथे जाऊन पोहचते व त्यांत बद्ध होऊन जाते म्हणून अशावेळी सावध राहून मन ताब्यात ठेऊन तेथे जाऊ न देण्याचा प्रयत्न करण्यास शिकले पाहिजे. तसे करण्याची नि्य संवय पाडली पाहिजे.

कोणी एखादा मनुष्य कुत्र्यास 'यु यु' करुन हाक मारीत असला आणि आपण त्या कुत्र्याजवळून जात असलो तर व ते आपणास ऐकू जरी आले तरी आपण त्या हाक मारणाराकडे धावत जात नाही किंवा त्याच्याकडे जाण्याचे मनातहि आणीत नाही. किंवा हरी रस्त्याने जात असतां त्यास गोविंदा म्हणून हाक मारली तर तो हाक मारणाराकडे पाहात नाही व जातही नाही. एखादा पोक्त वयाचा मनुष्य एखादे बालक पाळण्यात निजलेले किंवा खेळत असलेलें पाहून त्यास त्या प्रमाणें पाळण्यात निजण्याचें किंवा गोट्या वगैरे खेळण्याचें मनांत देखिल येत नाही त्याच प्रमाणें मनुष्याचें शब्ददेखिल पुरुषास कसेहि ऐकू आले व लोक हवे तसे बोलले तथापि आपला ज्या गोष्टींशीं संबंध नाही त्याविषयी जसे

आपण दुर्लक्ष करतो, तसेच ह्या असार संसारात राहूनसुद्धां जीवात्म्याने त्याविषयीं विरक्तता बाळगली तरच तो सुखी होतो सद्‌गुरु इमामशाहा महाराज सांगतात कीं,—

संसार सागर सफल छे झुटो । मत जाणो है मेरारे
छोडीने भ्रम तमे ब्रम्ह पछानो । खोज अंतर घट तेरारे ।।

"प्रपंच मारक नसून प्रपंचासक्ति मारक आहे." संसारात राहूनच परंतु आसक्ति सोडून ममत्वाचा त्याग करून मनुष्याने जगताचा जो भ्रम आहे – मिथ्याभास आहे तो सोडून देऊन आपल्या अंतरबाह्य व्यापलेल्या ब्रह्माची ओळख – जाणीव करुन घ्यावयास हवी आहे ही जाणीव होण्याकरितां 'मी पुरुष नाही, स्त्री नाही ब्राम्हण नाही शुद्र नाही पंचभौतिक देह मी नाहीं तर त्याहून अलिप्त असा अविनाशी परब्रम्ह रूप आहे असे नित्य ज्ञान दृष्टीने मनन करून आत्मज्ञ व्हावयास हवे आहे.

ह्या गोष्टीस सतत दृढ अभ्यासाची अत्यंत आवश्यकता आहे. अभ्यासाने हवी तशी अशक्य गोष्ट देखिल शक्य होऊन जाते. अर्जुनानें श्रीकृष्णास मनाच्या चंचल व अनिवार्य स्थितीविषयी विचारलें तेव्हा भगवंतांनी त्यास हेच सांगितले की 'अर्जुना ! मन निःसंशय वायुसारखे अनिवार्य आणि चंचल आहे पण त्यास अभ्यासाने वश करता यते.

असंशयं महाबाहो मनो दुर्निग्रहं चलम् ।
अभ्यासानें तु कौन्तेय वैराग्येण च गृहते ।। ६/३५

सद्‌गुरु इमामशहा महाराज देखील सांगतात कीं, ' हरदम करो

अभियास। करीनें देखो खास ॥' हरएक गोष्ट नियमाप्रमाणें दररोज करणें त्यास अभ्यास असे म्हणतात. अभ्यास करण्यातहि युक्ति पाहिजे प्रथम किंचित, नंतर जरा अधिक त्यानंतर त्यापेक्षा अधिक याप्रमाणें थोड थोडा वाढवीत गेल्याने तो अभ्यास दृढ होतो. मोठया पर्वतावर चढायचे असले तर एकदम उडी मारून नव्हे तर एक एक पायरीने चढता चढता थेट शिखरावर पोहोचतां येते त्याचप्रमाणें परम पुरुषाविषयींच्या ज्ञानांत देखील हळु हळु वृद्धि करतां येते. त्या करितां एका कवीने म्हटलें आहे कि 'केल्याने होत आहेरे आधी केलेची पाहिजे' त्यात देखील पुनः थोडया काळाच्या अभ्यासापेक्षा दीर्घकाळाचा अभ्याससुख साध्य असतो. केवळ शिखर गांठायचे आहे चढायचे आहे असे नुसते वाचेने बडबडत बसल्यास शिखरावर चढून जाता येत नाही तद्वत् मन चंचल आहे. ते अति चपल आहे असे म्हटल्यानें केवळ तें आपल्या स्वाधिन होत नाही ताब्यात येऊं शकत नाही, तर सद्‌गुरु इमामशाह महाराज एका भजनांत म्हणतात कीं,–

चंचल चित्त मन स्थिर करी धरो । तो जगमा जीवडानी चिंता करो ॥
काया काची गली जासे काल । तो आगळ जीवडा कोन हवाल ॥
जागो जागो मनखा देही तम धरी । पण जीवनी चिंता एक न करी ॥
हुं हुं करी सर्व जुग खोया मुरख तु अंध । पण हवे कलजुग छेली संध ॥
जुगो जुगना भुला कलजुगे मलीया । पन कल जुगना भुला ते नरगे जाइया ॥
जेना पूर्व संचे सतगुरु मलीया । तेना भवसागरना फेरा टलीया ॥
सतगुरु मलीया तो राखो इमान । तो एक चित्ते धरो स्वामीसु ध्यान ॥
कहेत इमाशहा सुणो मुनिवर । तो सत्संगमा मलता न किजे वार ॥

ह्या वाह्याकारने भासणाऱ्या एवढयाशा भजनांत सद्‌गुरु महाराजांनी मानवाच्या संपूर्ण जीवनक्रमांचा – जीवनधर्माचा परिचय

अगदी उद्बोदक स्वरूपाने सारांशानें दिलेला आहे. मन अतिशय चंचल आहे. हे आतापर्यंतच्या विवेचनावरून आपणास पूर्णांशाने नव्हे पण कांही अंशानें समजलेलेंच असेल परंतु त्या चंचल मनास सतत अभ्यासाच्या योगानें स्थिर व एकाग्र करणें हे आपलें कर्तव्य आहे. ज्याप्रमाणें एखादे दुःख झालेलें असलेल्या मनुष्याचे मन सतत त्या दुःखामध्येंच घुटमळत असते. त्याला सुखोपभोग मजा मौज चैनबाजी त्यावेळेस सुचत नाही. म्हणजें सुखोपभोगापासून तो पराङ्मुख असतो कारण त्याचे मन दुःखात केन्द्रीभुत झालेंले असते व त्यायोगे या दुःखातून ताबडतोब मुक्तता व्हावी यासाठी तो परमेश्वराची तळमळीनें आठवण करीत असतो म्हणून साधारणतः लोक व्यवहारात म्हटलें जाते कीं, परमेश्वराची तळमळीनें आठवण संकटातच येते. याकरिताच माता कुंती देवीनें श्रीकृष्णाजवळ " मला सतत संकटातच ठेव, त्या योगेच तुझी भक्ति, तुझे स्मरण सतत आम्हाला होत जाईल. " असा वर मागितला होता. तद्वत परमेश्वराचा प्रत्येक सद्भक्त संकटरूप महत् कसोटीच्या भट्टीतून चांगला तावून सुलाखून निघाल्यानंतरच परमेश्वरानें पावन केलेला आहे. सद्गुरु सांगतात–

' भाई करणीविना केम पामीये । जेणी कसणी सिधा भला काज ॥
भाई कसणी अमुलख ताजणो । अने कसणी खमीते भली जात ॥
आज कसणी क्रिया धरमनी । तेणें कळजुग ना लोपे कोये ॥
आगम सत्तगुरु भाकीया । तेणें दर्शन प्रभुका थाये ॥

कसणी – कसोटी हा जीवात्म्याच्या परिक्षणाचा एक अमुल्य ताजवा – तराजु आहे संसार आणि सद्धर्म (नीतीनियम पालन) हे त्याचे दोन पारडे आहेत. त्यांत सद्धर्म पालनाच्या योगाने जीवात्म्याच्या संसाराचे – व्यवहारांचे मापन केले जाते. ज्यानें व्यवहा–

रातसुद्धां भवदु:खाचा अपरिमित जाच सहन करून नीतितत्वाचे पूर्ण पालन केले तोच या संसाररूप भट्टींतून सुखरुप उत्तम प्रकारे पार पडला असे समजावे. ज्यांनीं ती कसोटी सहन केली त्यांना तावून सुलाखून निघालेल्या बावन्नकसीं सुवर्णाचें मोल मिळाले व ती आंस – संसार दु:खाचा जाच ज्यांनी सहन केला नाही – ज्यांना सहन करता येंत नाही त्यांना काळे ठिक्कर पडणाऱ्या पितळाचे मोल येत असतें परंतु ज्यांना कांही बुडच नाही, नीती तत्वांची बुज नाही व ती माहिती करवून घेण्याची आवड इच्छा नाही असे अधम जीवात्मे त्या संसाररूप भट्टीतच जळून खाक होतात त्यांना कशाचे बरें मोल येईल ? हे असे जरी असले तरी पण या कलियुगाचा महिमाच असा कांहीं चमत्कारिक आहे कीं, त्यांतील जीवात्म्यास परमेश्वर भक्ति करतांना–परमार्थ मार्गाचें आचरण करतांना थोडासा त्रास झाला तरीसुद्धां तो त्या कार्यापासून पराङ्मुख होतो, परावृत्त होऊन जातो. ज्याप्रमाणे अंधारांत एखादे ठिकाणी थोडेसें कांहीं खुट्ट झाले कीं, भित्र्या माणसाचे हृदय धडधडू लागते त्याचे मनांत भुताविषयींचे विचार सुरू होतात व अखेरपर्यंत त्याच्या मनांत तोच विचार घर करून बसतो - त्यास भूतबाधा होतें, तद्वतच त्या मनुष्यास संसारबाधा होते, परंतु सद्‌गुरु महाराज सांगतात त्यांत तुझे आत्मकल्याण नाही, आत्मकल्याण करून घ्यायचे असेल तर आपलें सत्व कायम ठेऊन कोणत्याहीं संकटातून पार पडण्याची आपली तत्परता, तिव्र जिज्ञासा दृढ राखली पाहिजे त्याच प्रमाणें संकट मुक्तिकरितां जशी आपण चिंता वाहतो तशी चिंता जर आपण आपल्या जीवित्वाविषयी म्ह. कल्याणमय श्रेय मार्गाच्या प्राप्तिविषयीं वाहिली म्हणजे एकाग्र दृष्टीने मनावर सतत

तसें वैराग्यपर विचार बिबविले तर मन सांसारिक भोगाच्या आसक्तीतून मुक्त होऊं शकते व त्यायोगे हळूं हळूं त्यास श्रेय-मार्गांची प्राप्ति होते.

आपलें शरीर काळाच्या योगाने नाश पावणारे आहे. हा काळ जीवात्म्यापुढे केव्हां व कसा येऊन ठेपेल हे समजणें अति कर्मकठिण आहे म्हणून समजा थोडयाच वेळाने आपण काळाच्या स्वाधिन होणार आहे तर मग आपल्या जीवाचे पुढें हालहवाल होतील हे आपण आपल्याच मनास विचारावयास हवे. सुखोप-भोगांत असतांना मनास हाच प्रश्न विचारल्यास त्या समयास ते हेंच सांगेल कीं, पुढे होईल ते होईल पण आता जो सुखोपभोग मिळत आहे तो कां सोडून द्यायचा ! अशा रीतीने ते उच्छृंखल होईल, पण दुःखोपभोगात हा वरील संकल्प मनांत उठला तर तो जीवात्म्यावर खचित वैराग्यपर विचारांचाच पगडा घालून जाईल. म्हणूनच सद्गुरु महाराज वारंवार जीवात्म्यास चेतावणी करतात की,–

उठ बैठ क्यूं सुतारे गाफल : सुता भला ना होयरे ॥
जागत स्वामी सब ओई पामे । सुतानारे लेसे कोइरे ॥
अंधे जनम गमाइये अपनो । घडी घडी घटका न आवेरे ॥
स्वामी जैसा साथे तेरा । करले सेवा कछु पावेरे ॥
जो तु जागे तो सुख पामे । सोता सोही गोतारे ॥
गअसो वेळा बहोड न आवे । किस निदमें तु सोतारे ॥
अति निंद कछु भले पन नही । एकहि अर्थ न सीझेरे ॥
अैसा काम कीजिये गहेरा । जिसथी प्रभुजी रीझेंरे ॥

त्रणना त्रुटा चवथे मळीया । जो मन लेजो ओळखीरे ॥
आजना त्रुटा प्रळा जासो । नेट ना रहेसो भाई रे ॥

सद्गुरु इमामशाह महाराज म्हणतात कीं, हे मुमुक्षुंनो उठा ! उठा !! जागृत व्हा !! तुम्हांला अनायसेच मानवदेह प्राप्त झालेला आहे ही संधी व्यर्थ दवडू नका. आतां नाही जागृत होणार तर का पुढे पशुपक्ष्यांच्या अथवा तिर्यक् योनीच्या जन्मात जाल तेव्हां जागृत व्हाल ? मी मी करून माया ममत्वात गोते खात खात तू आतापर्यंतची सर्व युगे गमाविलीस, युगामागुन युगे गेली पण तू जागृत झाला पण आता तर शेवटचेच कलियुग आहे हे ही जर तूं गमाविलेंस तर तुझ्या पदरी नरक प्राप्ति-शिवाय लाभ तो काय होणार ? याची सतत आपल्या मनांत बुज ठेव. अनायासे तुझ्याच पूर्व भाग्याने तुला जागृति देणाऱ्या सद्गुरुची प्राप्ति झालेलीं आहे, त्याच्या योगानै तूं तुझा संसार बंधाचा फेरा टाळण्याचा प्रयत्न कर.

सतगुरु समंदर बेलिया । अने संसार लहेरे पुर ॥
गुरुनर बेलिये बंठ चले । उपर वरसन लागा नूर ॥

सद्गुरुंच्या योगाने संसार सागरातून कशा प्रकारे तरुन जाता येते या विषयीं एक दृष्टांत आहे. समुद्रात पुष्कळ ठिकाणी लोहचुंबकाचे पहाड असतात. त्यांच्या जवळून जर कदाचित लोखंडी खिळ्यांनी व पट्ट्यांनीं जोडलेलें जहाज चालले तर ते चुंबकाच्या आकर्षणानें खेंचले जाते व नाश पावते पण तसे होण्यापूर्वीच जर कदाचित नौकापति आपल्या जहाजास परिसाचा स्पर्श करील म्हणजें जेथें जेथे लोखंड आहे तेथे तेथे परीस लावील तर

त्या योगानें त्यांतील लोखंड आपलें मुळरूप बदलून-सुवर्णरूप होऊन जाईल व त्यानंतर हव्या तशा लोहचुंवक पाषाणाच्या आकर्षणाचे त्यास बिलकूल भय राहात नाही व ते जहाज खुशाल पलिकडच्या किनाऱ्यास सुखरूप जाऊं शकते त्याच प्रमाणें या संसार समुद्रात विषय वासनारूप लोखंडाच्या खिळयांनी जोडलेले सूक्ष्म शरीररूप जहाज पंचविषयरूप (विष-यांचें पदार्थ गायन, श्रवण, स्त्री सेवन, उपवन वगैरेंचे निरीक्षण मिष्ठान्नभोजन, पुष्प अत्तराचा सुवास वगैरे) लोहचुंबक पाषा-णाच्या आकर्षणानें त्याजकडे घसडून जाते व त्या विषयरूप पाषाणावर आदळून संसाराच्या आसक्तीने नाश व जन्म मरणा-दिच्या फेऱ्यात पडते. पण जर सद्गुरु, वेद, शास्त्र इत्यादि-कापासून मिळालेल्या महाज्ञानरूपी परिसाचा त्या शरीररूप जहाजास अर्थात इंद्रियांच्या नियामक मनास-हितबुद्धीस स्पर्श झाला व यथार्थ ज्ञान कीं " मी ब्रह्म आहे, असंग आहे, शुद्ध आहे. हे विषय माझे नाहीत संसार सत्य नाही तो तर चिम-ण्यांचे घरटे आहे बेळ आल्यास सर्व उडून जातील धनमान कीर्ति सर्व मिथ्या आहेत. कोणी कोणाचे नाही. स्त्री, पूत्र, मित्र सहोदर सर्व स्वार्थासाठी जमा झालें आहेत. ऋणानुबंध आहे तेथपर्यंत सर्व आहेत पण ऋणानुबंध नाहींसा झाला की मी कोठे व ते कोठे, कोणी कोणाचे नाही व कोणी कोणाजवळ राहावयाचें नाही. धन तर माझा बाप ठेऊन गेला आहे. एके दिवशी मला त्यास सोडून जावयाचे आहे अथवा मला सोडून ते दुसऱ्याकडें जाईल पूर्वी ते माझे नव्हतें व भविष्यकाळीहि माझ्या पाशी राहावयाचे नाही. अरे हा देहच माझा नाही तर दुसरे माझे काय असणार ? मी पाहतों की देह तर येथे पडून

राहतो पण त्यांतील तत्व केव्हांच निघून जातें. माझ्या बरोबरच माझा देह या जगात आला आहे. माझ्या बरोबरच तो सदा राहतो. एक क्षणभरहि तो माझ्यापासून निराळा होत नाही. तथापि तो मजबरोबर येणार नाही. देह माझा असेल तर मजबरोबर येईल पण तो तर येथेच पडलेला राहतो." असे समजून अनुभवानें आपलें मन दृढ केले तर जीवरूप जहाजातील वासनारूप खिळे जे दुष्ट वासनांच्या आसक्तीमुळे लोखंडासारख्या नीच पदास पावलेले असतात त्यास हे दिव्यज्ञान सुवर्णरूप झाल्यामुळे म्हणजे वैराग्याच्या योगानें आसक्तिरूप मलरहित होऊन श्रेष्ठ ज्ञानाच्या योगानें उत्तमरूप प्राप्त झाल्यामुळे त्यावर त्या विषयरूप चुंबक पाषाणाचा जोर चालूं शकत नाही कारण कीं, जीव त्या सर्वांस मिथ्या समजून त्या विषयीं निरिच्छ होऊन जातो म्हणजें तो निर्विघ्नपणें संसारसागर तरून पैल तीरास पोहोचून परमपद पावतो.

विषय अत्यंत बलवान आहेत तथापि मनुष्यास त्या विषयीं वैराग्य उत्पन्न झाले तर मग त्यांचा जोर चालूं शकत नाही पण हे वैराग्य उत्पन्न कसे होईल या विषयीं शास्त्रांत सांगितलेलें आहे कीं ह्या जगातील ज्या वस्तूवर अतिशय आसक्ति–ममत्व असते ती वस्तू एखाद्या अपरिहार्य कारणामुळे नाहिशी झाली तर त्या दुःखाच्या अगर संकटाच्या झटक्याबरोबर खऱ्या संस्कारी जीवास वैराग्य उत्पन्न होतें. तो दुःखाचा कड ओसरल्यावर तो जीव हळू हळू चिंतन करूं लागतो कीं, विषय हे परिणा...वी ...च प्रमाणें रूप असल्यामुळे जीवाचा नाश करणारे असतात, ...व लोक हवे तसे आहेत, अनित्य आहेत व परिणामी दुःखक... ...बंध नाही त्याविषयी जसे

सत्य स्वरूप समजतें व मग तशा संस्कारी जीवात्म्यास जीवित– साफल्याचें सत्य ज्ञान प्राप्त होतें व विषयावरील प्रीति उडून जाते. आणि प्रीति उडून गेलीं म्हणजें वैराग्य उत्पन्न होते.

कित्येक जीवात्म्यास असे वैराग्य उत्पन्न होते पण ते कायम टिकाऊ स्वरूपाचे नसते. तसे कृत्रिम अथवा स्मशान वैराग्य कांही उपयोगाचे नाही. तशा तथाकथित वैतागामुळे उलट तशा जीवा-त्म्याचा सर्वनाश होतो, याकरितां कर्म, भक्ति, ज्ञान, प्रेम, वैराग्य या सर्वांचे यथार्थ संस्कार जीवात्म्यानें प्रथमपासूनच आपल्या मनावर बिंबवून घ्यावे ज्यानें या साधन सामुग्रीची प्रथमपासून चांगली जोपासना केली तर त्याचें जीवित सफल होतें. त्याच्या साधनेत दृढता – स्थिरता येऊन तो जीवात्मा इच्छित ध्येय गाठतो.

ज्याचे मरण सुधारलें त्याचे सारे जीवीत सफल झाले असे समजावे. कारण मरण सुधारण्यासाठीच म्हणजे ध्येय प्राप्तिसाठीच एवढें आयुष्याचें मोल द्यावे लागते त्यासाठी भगवंताने दिलेल्या डोळयांचा, जिव्हेचा, कानांचा सदुपयोग करा, संपत्तीचा सन्मार्गा-कडं विनियोग करा, निरिच्छ बुद्धीने परोपकाररत राहा, आपल्या कडून शक्य तेवढी जनताजनार्दनाची निस्वार्थतेने सेवा करा. म्हणजे अनायासे वैराग्याचे संस्कार तुमच्या चित्तात दृढ होतील.

जगतातील मिथ्या मायेचा संग क्षणिक सुगंधाचा चुटका आहे चार घटकेची ओली सुकी सावली आहे. " चार दिनकी चांदनी ...खिर अंधेरी रात है। मरना सभीको होगा रहनेंकी झुटी दिवशी ... " ही सर्व शोभा व आनंद भोगहि अखेर मिथ्याच ते दुसऱ्याकडे ...विषयीं मोह कसला ? हा देह व ह्या जगतातील माझ्या पाशी राहावयं... ...त. त्यावर मोहित होऊन जो जीव आपले दुसरे माझे काय असणार ? ...

आयुष्य फुकट घालवितो त्याचा नरजन्म व्यर्थ होय. सद्‌गुरु महाराज सांगतात, –

हरे मन भमरा तु लोभोयो । माया फुलडे तु लोभाये ॥
दन रे दो चार पेखना । अंते खाक मिल जाये ॥

हे मनरूपी भृंगा ! तूं मायेच्या या लोभस गोंडस व मधूर भासणाऱ्या फसव्या फुलावर मोहित होऊन आपला सर्वनाश करून घेंऊं नकोस. या मायारुप फुलातील विषयरुप मध चाखतां चाखतां केव्हां हे कमळ मिटून जाईल व त्यांत केव्हां तुझा अंत होईल हे सांगता येत नाही, जगत हे चार दिवसांचे नाटक आहे. हे स्वप्न-वत नाटक क्षणभंगूर आहे. गवताच्या पानावर असलेल्या दंवबिंदू-प्रमाणें अथवा मेघाच्छादित आकाशात चमकणाऱ्या विजेप्रमाणें क्षणिक चमक आहे पण तरीही या नाटकात आपणा सर्वांना आपा–पल्या भुमिका सुयोग्य रितीने बजावून अंतिम ध्येय गाठायचें आहे.

या चार दिवसांच्या नाटयमय घटकेत राहून मनुष्याने आपलें आत्मकल्याण कसे करुन घ्यावे ? आणि मानवाने इतिकर्तव्य काय आहे ? या विषयीचें विवेचन सद्‌गुरु महराजांनी सदरहू ग्रंथाद्वारे केलेंले आहे. सद्‌गुरु महाराजांचा अत्यंत संक्षिप्त पण महत्तम व्यापक तत्वोपदेश सूज्ञ व अधिकारी वाचकांच्या नजरेसमोर यावा म्हणून भारवाही हमालाचें हे कार्य केलेले आहे. ' फोडिलें भांडार धन्याचा हा माल । मी तव हमाल भारवाही ॥" या कार्याप्रित्यर्थ हमाली म्हणुन एकच अपेक्षा आहे ती म्हणजे सर्वांनी हा ग्रंथ सदैव जवळ बाळगून त्यातील तत्वोपदेश निर्मळ विशुद्ध मनाने ग्रहण करुन यथामति अंगी बाणविण्याचा प्रयत्न करावा हा

तत्वोपदेश मानवाच्या जीवनांत जेव्हां प्रत्यक्ष उतरेल तीच आमची हमाली वसुल झाली असें आम्हांस मानतां येंईल. म्हणून सर्वांना आमचें कळकळीचें सांगणें आहे कीं सद्‌गुरु महाराजांचा प्रत्येक सच्छिष्य असाच हवा हेच आहे कीं त्यांच्या प्रत्येक वचनावर त्यानें आपल्या अंतःकरणाच्या वृत्ति लावून त्या अमुल्य तत्वोपदेशाचें सतत मनन करुन आचरणांत आणावयास हवे आहे. सद्‌गुरु महाराजांचें प्रत्येक वचन अवश्य मनन करण्यायोग्यच आहे. प्रत्यक्ष ब्रह्मस्वरुप सद्‌गुरु महाराजांच्या अमृतमय मुखकमलशांतून निघालेंली ही ज्ञानगंगा; मायोपाधींतून मन हरण करुन भगवंताच्या अनंत चैतन्य स्वयंप्रकाश चित्स्वरुपांत त्याचा लय करविणाऱ्या तत्वबोधरुप अमृतवाणीलाच प्रणाम करुन हा कल्पनेबाहेर लांबलेला उपसंहार आटोपतो.

ॐ प्रणाम ! प्रणाम !! प्रणाम !!!



किंवा
त्याच प्रमाणें
व लोक हवे तसे
संबंध नाही त्याविषयी जसे

प्रकाशित झालेलें मौल्यवान ग्रंथ

१) महात्मा सद्गुरु श्री इमामशहा महाराज

(जीवन वृत्तान्त)

मराठी) – आणि – (गुजरार्थी

–० लेखक ०–

श्री. पुरुषोत्तम गुरु धर्मा महाराज

मुल्य ५ रुपये

२) नित्यपाठ व शिक्षापत्री

(आवृत्ती २ री)

–० प्रकाशक ०–

श्री. जगन्नाथ गुरु पुरुषोत्तम महाराज

मुल्य १ रुपया

३) श्री सत्पंथ ज्ञान–पद-संग्रह (भजनावळी)

(आवृत्ती २ री)

–० प्रकाशक ०–

श्री. जगन्नाथ गुरु पुरुषोत्तम महाराज

मुल्य ७ रुपये

४) मनहर ज्ञान (श्री सद्गुरु बोधामृत)

–० प्रकाशक ०–

श्री. पुरुषोत्तम गुरु धर्मा महाराज

मुल्य ४ रुपये

५) अमृतवाणी (श्री सद्गुरुंचे श्लोक–दोहावळी)

–० प्रकाशक ०–

श्री. जगन्नाथ गुरु पुरुषोत्तम महाराज

पुस्तके मिळण्याचे ठिकाण :–

श्री सत्पंथी मंदिर फैजपूर,

मु. पो. फैजपूर ता. रावेल जि. जळगांव.